CMYK



विनम्र अभिवादन
हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची आज जयंती


सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

लातूर | गुरुवार, १९ फेब्रुवारी २०२६ । वर्ष ३ रे अंक ३५० । पाने १२ । किंमत रु. ६/- | ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com


## भारताने सलग चौथा सामना जिंकला

वर्ल्डकपमध्ये शिवम दुबेची पहिली फिफ्टी



अहमदाबाद : भारताने विश्वचषकात सलग चौथा सामना जिंकला आहे. बुधवारी झालेल्या तिसऱ्या सामन्यात भारताने नेदरलँड्सचा १७ धावांनी पराभव केला. भारताने १९३ धावा केल्या. प्रत्युत्तरात नेदरलँड्स १७६ धावाच करू शकला. शिवम दुबेने ६६ धावा केल्या.

# पायलटच्या मदतीनेच अजितदादांचा घातपात?

### रोहित पवारांचा थेट आरोप; अपघात नसून नियोजित कट

**मुंबई, दि.१८ फेब्रुवारी-**

अजित पवारांचा अपघात ही केवळ दुर्घटना नसून यामागे घातपात असू शकतो, अशी शंका राष्ट्रवादीचे नेते रोहित पवार यांनी व्यक्त केली आहे. गेल्या काही दिवसांपासून त्यांनी या प्रकरणी अनेक मुद्दे उपस्थित केले असून मुंबई आणि दिल्ली येथे पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका स्पष्ट केली होती. बुधवारी मुंबईतील वाय.बी. चव्हाण सभागृहात घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी पुन्हा एकदा हा दावा केला आहे की, हा अपघात नसून नियोजित कट केला आहे. पायलटच्या मदतीनेच हा घातपात घडवण्यात आला असावा, असा गंभीर आरोप पवार यांनी केल्याने खळबळ उडाली आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारी रोजी बारामतीजवळ झालेल्या विमान दुर्घटनेत निधन झाले. मुंबईहून सभेसाठी निघालेल्या त्यांच्या विमानाने बारामती विमानतळाजवळ येताना अचानक एका बाजूला झुकत खाली कोसळल्याची माहिती समोर आली होती. विमान जमिनीवर आदळल्यानंतर मोठा स्फोट झाला आणि त्यानंतर आगीने भीषण रूप घेतले. या दुर्घटनेत अजित पवार यांच्यासह त्यांचे सुरक्षारक्षक विदीप जाधव, पायलट सुमीत कपूर, शांभवी पाठक आणि विमान परिचारिका पिंकी माळी यांचा मृत्यू झाला. या घटनेने संपूर्ण राज्याला मोठा धक्का बसला होता. रोहित पवार यांनी सांगितले की, अपघाताच्या ठिकाणाची पाहणी केल्यावर काही बाबी संशयास्पद वाटतात. एखादा चेंडू मऊ मातीत पडला तर कमी उसळी घेतो, पण कठीण रस्त्यावर पडला तर जास्त उड्या घेतो, असे उदाहरण देत त्यांनी सांगितले की विमान धावपट्टीवर न पडता बाजूच्या कठीण पृष्ठभागावर आदळले. त्यामुळे त्याचा धक्का अधिक तीव्र झाला. स्फोटाचे मुख्य कारण विमानातील जादा इंधन असू शकते, अशी शंका त्यांनी व्यक्त केली.



त्यांच्या मते, या विमानातील इंधन टाक्या नेहमीपेक्षा जास्त भरलेल्या होत्या. सामान्यतः अशा विमानांमध्ये प्रसाधनगृहाजवळ इंधन टाक्या असतात आणि त्याच्या जवळच उड्डाण नोंद यंत्र असते, अशी माहिती त्यांनी दिली. मुंबईहून बारामतीकडे जाताना इंधन पूर्ण क्षमतेने भरले गेले होते. मात्र बारामतीला पोहोचल्यानंतर विमान पुढे जाणार होते, तर तेथेच पूर्ण इंधन भरण्याची गरज काय होती, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.रोहित पवार यांनी पुढे सांगितले की, जर महाराष्ट्रात इंधन स्वस्त आहे म्हणून ते भरले असेल, (उर्वरित वृत्त पान २ वर)



### व्हीएसआर कंपनीवर तात्काळ बंदी घालावी



विमान अपघातात ब्लॅक बॉक्स सहजपणे नष्ट होऊ शकत नाहीत. महाराष्ट्रातील जनतेला आपल्या रुदयाला हादरवून टाकणाऱ्या या दुर्घटनेचे संपूर्ण, पारदर्शक आणि निर्विवाद सत्य जाणून घेण्याचा अधिकार आहे. व्हीएसआरला तात्काळ उड्डाणे चालविण्यास बंदी घालून, त्यांच्या विमानांच्या देखभालीत झालेल्या संभाव्य गंभीर गैरव्यवहाराबद्दल सखोल आणि निष्पक्ष चौकशी केलीच पाहिजे.

**- जय पवार,**
**स्वर्गिय अजित पवारांचे पुत्र.**

# तथ्य असल्याशिवाय कुठल्याही आरोपांना उत्तर देणे योग्य नाही

### प्रफुल पटेलांची भूमिका, रोहित पवारांच्या आरोपांवर सावध प्रतिक्रिया

**मुंबई, दि.१८ फेब्रुवारी-**


पायलटने अजितदादांचे विमान मुद्दामहून खाली पाडले, असा खळबळजनक आरोप आमदार रोहित पवार यांनी केला होता. यावर प्रफुल पटेल यांनी अत्यंत सावध आणि जबाबदार प्रतिक्रिया दिली. मी एक जबाबदार व्यक्ती आहे. अनेक वर्षांच्या राजकारणात आणि सरकारमध्ये माझा अनुभव राहिलेला आहे. मी जे काही बोलेन ते संयमाने आणि जबाबदारीने बोलेन. माझ्याकडे तथ्य असल्याशिवाय कुठलाही आरोप-प्रत्यारोपचे उत्तर देणे मला योग्य वाटत नाही, असे म्हणत त्यांनी रोहित पवारांच्या आरोपावर थेट भाष्य करणे टाळले.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या विलीनीकरणाबाबत राजकीय वर्तुळात सुरू असलेल्या चर्चांना प्रफुल पटेल यांनी पूर्णविराम दिला आहे. दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणावर कोणतीही चर्चा होणार नाही, असे स्पष्ट करत त्यांनी पक्षाच्या भविष्यातील नेतृत्वाबाबत मोठी घोषणा केली. आगामी २६ फेब्रुवारी रोजी सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड होईल, असे पटेल यांनी आज माध्यमांशी बोलताना सांगितले.

अजित पवार यांच्या निधनानंतर निर्माण झालेली नेतृत्वाची पोकळी भरून काढणे ही पक्षाची जबाबदारी असल्याचे पटेल यांनी नमूद केले. ते म्हणाले, अजितदादांच्या निधनानंतर ही वेळ विलीनीकरणावर चर्चा करण्याची नाही. आज आमचा पक्ष स्वतंत्र आहे आणि आमची संघटनात्मक पदे किंवा विधिमंडळ नेतृत्वाची जागा भरण्याची जबाबदारी आमच्यावर आहे. ती प्रक्रिया आम्ही पूर्ण करत आहोत. अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत बोलताना प्रफुल पटेल यांनी थेट विमान कंपनीला जबाबदार धरले आहे. या दुर्दैवी घटनेत विमान कंपनीची जबाबदारी सर्वात मोठी आहे. पायलटकडून काही दुर्लक्ष झाले असेल, तर ते सीबीआयच्या चौकशीत निश्चितपणे समोर येईल. मात्र, सकृतदर्शनी विमान कंपनी या दुर्घटनेला मोठ्या प्रमाणात जबाबदार असल्याचे मला वाटते, असे त्यांनी स्पष्ट केले.

**शेतकऱ्यांच्या' कामासाठीच शेवटचा फोन!**

अजित दादांचा अपघात होण्यापूर्वी पूर्व विदर्भातील एका नेत्याचा त्यांना फोन केला होता, असा आरोप रोहित पवार यांनी केला होता. यावर प्रफुल पटेल यांनी प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, अजित पवारांच्या निधनाच्या आदल्या दिवशी मी त्यांना फोन केला होता. पण शेतकऱ्यांसाठी केला होता. कुणाची खासगी फाईल किंवा कुणाला मदत करण्यासाठी केला नाही. एक उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री म्हणून त्यांनी त्या दिवशी माझा फोनसह अनेक लोकांचे फोन त्यांना आले असतील. अनेकांनी त्यांना वेगवेगळ्या कामांची निवेदने दिली असतील. याचा अर्थ मी कुठल्याही कारणाने त्यांना थांबवण्याचे काम केले असा होत नाही. (उर्वरित वृत्त पान २ वर)



# मुस्लिमांचे पाच टक्के आरक्षण रद्द

### न्यायिक आणि तांत्रिक अडचणींमुळे घेतला निर्णय

**◆ मुंबई, १८ फेब्रुवारी**

महाराष्ट्र सरकारने शिक्षण आणि शासकीय सेवांमध्ये मुस्लिम समाजाला देण्यात आलेले पाच टक्के आरक्षण रद्द करण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. यासंदर्भातला राज्य सरकारने सुधारित शासन निर्णय जारी केला. या निर्णयामुळे सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग चौकटीअंतर्गत मुस्लिम समाजाला दिले जाणारे लाभ तत्काळ प्रभावाने बंद करण्यात आले आहेत.



जुलै २०१४ मध्ये तत्कालीन काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी सरकारने मराठा समाजाला १६ टक्के आणि मुस्लिम समाजाला पाच टक्के आरक्षण जाहीर केले होते. मुस्लिम समाजासाठी 'विशेष मागास प्रवर्ग-अ' हा स्वतंत्र प्रवर्ग तयार करण्यात आला होता. या अंतर्गत शासकीय व निमशासकीय सरळ सेवा भरती तसेच शैक्षणिक संस्थांतील प्रवेश प्रक्रियेत पाच टक्के आरक्षणाची तरतूद करण्यात आली होती. यासंदर्भातील अध्यादेश ९ जुलै २०१४ रोजी काढण्यात आला होता.

या अध्यादेशाविरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. १४ नोव्हेंबर २०१४ रोजी न्यायालयाने शासकीय नोकऱ्यांमधील पाच टक्के आरक्षणाच्या तरतुदीला अंतरिम स्थगिती दिली होती. दरम्यान, हा अध्यादेश २३ डिसेंबर २०१४ पर्यंत विधिमंडळात कायद्यात रूपांतरित न झाल्याने तो आपोआप निष्प्रभ ठरला. अध्यादेश कालबाह्य ठरल्याने त्याअनुषंगाने काढलेले शासन निर्णय व परिपत्रके देखील आपोआप रद्दबातल ठरले.

घेण्यात आलेल्या या निर्णयामुळे राज्यातील राजकारण तापण्याची शक्यता आहे. मात्र, सरकारने हा निर्णय कायदेशीर व प्रक्रियात्मक कारणांवर आधारित असल्याचे स्पष्ट केले असून, अध्यादेशाचे कायद्यात रूपांतर न झाल्यामुळेच ही कारवाई करणे आवश्यक ठरल्याचे नमूद केले आहे. ◀ *(तभा वृत्तसेवा)*

# राज्यसभेच्या ३७ जागांसाठी १६ मार्चला निवडणूक

### महाराष्ट्रातील सात जागांचा समावेश

**नवी दिल्ली, १८ फेब्रुवारी-**

राज्यसभेच्या ३७ जागांसाठी १६ मार्चला निवडणूक होणार आहे. यात महाराष्ट्रातील सात जागांचाही समावेश आहे.


निवडणूक आयोगाने आज या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला. १० राज्यांतील राज्यसभेच्या ३७ सदस्यांची मुदत एप्रिल महिन्यात संपत आहे, त्यामुळे याठिकाणी निवडणूक घ्यावी लागत आहे. १६ मार्चला निवडणूक होणार असून त्याचदिवशी सायंकाळी मतमोजणी होऊन निकाल जाहीर केला जाईल. महाराष्ट्रातून भाजपाचे डॉ. भागवत कराड, राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार, फौजिया खान, काँग्रेसच्या रजनी पाटील, शिवसेनेच्या प्रियांका चतुर्वेदी, धैर्यशील पाटील आणि रिपब्लिकन पक्ष आठवले गटाचे रामदास आठवले यांची मुदत संपत आहे.



२६ फेब्रुवारीला या निवडणुकीची अधिसूचना जारी केली जाणार असून ५ मार्चपर्यंत अर्ज भरण्याची मुदत आहे. ६ मार्चला उमेदवारी अर्जांची छाननी होणार असून ९ मार्चला उमेदवारी अर्ज मागे घेता येतील. आवश्यकता पडली तर १६ मार्चला सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळात मतदान होईल. त्याचदिवशी सायंकाळी निकाल जाहीर केला जाईल. बिहार, आसाम, ओडिशा, हरयाणा, तेलंगणा, महाराष्ट्र, तामीळनाडू, छत्तीसगड, पश्चिम बंगाल आणि हिमाचलप्रदेश या राज्यात ही निवडणूक होत आहे. महाराष्ट्रातील सर्वाधिक म्हणजे ७, तामीळनाडू ६, बिहार आणि पश्चिम बंगालच्या प्रत्येकी ५, ओडिशा ४, आसाम ३ तसेच हरयाणा, तेलंगणा आणि छत्तीसगडमधील प्रत्येकी दोन तर हिमाचलप्रदेशमधील एका जागेसाठी ही निवडणूक होणार आहे.

## ४४ माओवादी स्मारके उद्ध्वस्त

**गडचिरोली** : गडचिरोली जिल्हा हा माओवाददृष्ट्या अतिसंवेदनशील असून जनतेच्या मनात दहशत निर्माण करण्यासाठी माओवाद्यांकडून अतिदुर्गम भागांमध्ये माओवादी स्मारकांची निर्मिती केली जात होती. याच पृष्ठभूमीवर गडचिरोली पोलिस दलाकडून माओवाद्यांच्या दहशतीचे प्रतीक असलेले जिल्हाभरातील एकूण ४४ माओवादी स्मारके आज बुधवारी नष्ट करण्यात आले आहेत. माओवाद्यांनी अनेक ठिकाणी स्मारक उभारले असल्याचे निदर्शनास आले.



## विदर्भात ४ अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालये

**मुंबई** : राज्यातील महसूल विभागावरील वाढता कामाचा ताण आणि वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन, राज्यात ११ नवीन अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालये आणि ६९ तहसीलदार कार्यालये सुरू करण्याच्या हालचालींना शासनस्तरावर वेग आला आहे. शासनाने घेतलेल्या या निर्णयामुळे ग्रामीण आणि दुर्गम भागातील नागरिकांना जिल्हा किंवा तालुका मुख्यालयापर्यंत वारंवार जावे लागणार नाही. प्रशासन अधिक वेगाने आणि लोकाभिमुख पद्धतीने काम करेल, अशी अपेक्षा आहे. नवीन कार्यालये सुरू करताना सरकारने काही निकष ठरवले आहेत.




सोलापूर : शिवजन्मोत्सवानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोर झालेल्या पाळणा कार्यक्रमाप्रसंगी देखाव्याद्वारे जिजाऊंना मुजरा करताना शिवबा. (सविस्तर वृत्त पान २ वर)

# सामाजिक समरसतेसाठी वैयक्तिक, कौटुंबिक पातळीवर प्रयत्न करावेत : मोहन भागवत

**लखनौ, १८ फेब्रुवारी**

मंदिरे, विहिरी आणि स्मशानभूमी सर्व हिंदूंसाठी समान असावीत आणि त्यांच्यात कोणताही भेदभाव नसावा, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी निरालानगर येथील सरस्वती विद्या मंदिराच्या माधव सभागृहात आयोजित 'कार्यकर्ता कुटुंब मिलन' कार्यक्रमाला संबोधित करताना केले. सामाजिक समरसतेसाठी वैयक्तिक-कौटुंबिक पातळीवर प्रयत्न करावे, असे त्यांनी सांगितले.

करीअर म्हणजे नेमके काय, हे आपण आपल्या मुलांना सांगायला पाहिजे. पोट भरणे, जास्त कमाई करणे किंवा उपभोग घेणे हे करीअर नाही. करीअर म्हणजे कमाईपेक्षा वाटून घेणे. मुलांना असे शिक्षण द्या, जे त्यांना इतरांसाठी देण्यास आणि जगण्यास प्रेरित करेल. आपण आपल्या घरात अशी मूल्ये रुजवली पाहिजेत, जी मुलांना समजण्यास मदत करतील की, आपले हित आपल्या देशाशी आहे. आपल्यासाठी आपला देश प्रथम येतो. आपण आपल्या देशासाठी ज्ञान आणि संपत्ती कमावली पाहिजे, असे डॉ. मोहनजी भागवत म्हणाले. सामाजिक सौहार्द वाढवण्यासाठी वैयक्तिक आणि कौटुंबिक पातळीवर प्रयत्न केले पाहिजेत, असे सरसंघचालक म्हणाले. संघ संपूर्ण हिंदू समुदायाला एक मानतो. म्हणून आपण वैयक्तिक आणि कौटुंबिक पातळीवर परस्पर संवाद वाढवला पाहिजे. सामाजिक सौहार्द भाषणातून नाही तर, कृतीतून येईल. संघात जातिव्यवस्था नाही. समाजातही तेच केले पाहिजे, असे सरसंघचालक म्हणाले. वस्त्या आणि शाखांमध्ये व्हावेत कौटुंबिक मेळावे वस्त्या आणि शाखा पातळीवर ७० ते १०० पर्यंत कुटुंब मेळावे आयोजित केले पाहिजेत. आपण गरिबीत राहू नये. परंतु, आपण कोणाच्याही प्रभावाखाली येऊ नये. आपले जीवन संघासारखे असले पाहिजे. पंच परिवर्तन कार्यक्रमांमध्ये महिलांची भूमिका खूप महत्त्वाची आहे, असे सरसंघचालकांनी सांगितले.



CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# सोलापूर विद्यापीठाचा ६१ कोटींचा तुटीचा अर्थसंकल्प अधिसभेत मंजूर

## ४९२ कोटींच्या अर्थसंकल्पात विद्यार्थी विकास, संशोधन आणि नवोपक्रमांना प्राधान्य



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ फेब्रुवारी-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी ४९२ कोटी ३५ लाख ६२ हजार रुपयांच्या अंदाजपत्रकास अधिसभेने दुरुस्तीसह एकमताने मंजुरी दिली. ४३० कोटी ७४ लाख ९८ हजार रुपये इतकी अपेक्षित जमा गृहीत धरून सादर करण्यात आलेल्या या अर्थसंकल्पात ६१ कोटी ६० लाख ६४ हजार रुपयांची तूट दर्शविण्यात आली आहे. विद्यार्थी विकास, संशोधन आणि नवोपक्रमांना यंदा विशेष प्राधान्य देण्यात आले आहे.

बुधवारी, विद्यापीठाच्या मुख्य सभागृहात कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांच्या अध्यक्षतेखाली अधिसभेची बैठक पार पडली. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा यांच्यासह अधिसभेचे सदस्य उपस्थित होते. प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे यांनी सदस्य सचिव म्हणून काम पाहिले. वित्त व लेखा अधिकारी सीए डॉ. महादेव खराडे यांनी हे अंदाजपत्रक सादर केले. अंदाजपत्रकाची मांडणी देखभाल-दुरुस्ती, वेतन, ऋण व अनामत, विकास योजना भाग-१ (शासन अनुदान) आणि विकास योजना भाग-२ (विद्यापीठ निधी) अशा पाच टप्प्यांत करण्यात आली. सादरीकरणानंतर सदस्यांनी सविस्तर चर्चा करून काही दुरुस्त्या सुचवल्या. त्यानंतर अंदाजपत्रकास एकमताने मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या प्रारंभी मागील इतिवृत्तांत कायम करण्यात आला. प्रश्नोत्तराचा तास पार पडल्यानंतर विविध ठरावांवर चर्चा करून निर्णय घेण्यात आले. विद्यार्थी विकास व संशोधनाभिमुख नाविन्यपूर्ण योजना यंदाच्या अर्थसंकल्पात केंद्रस्थानी असल्याचे चित्र अधिसभेतील चर्चेतून स्पष्ट झाले. यावेळी व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजाभाऊ सरवदे, प्रा. सचिन गायकवाड, डॉ. प्रशांत पवार, डॉ. समाधान पवार, डॉ. प्रभाकर कोळेकर, सिनेट सदस्य डॉ. बी. पी. रोंगे, डॉ. वीरभद्र दंडे, डॉ. भगवान आदटराव, प्राचार्य डॉ. शंकर नवले, रोहिणी तडवळकर, यतिराज होनमाने, गणेश डोंगरे, अजितकुमार संगवे, चन्नवीर बंकुर, डॉ. जैनोद्दीन मुल्ला, ड. उषा पवार, ॲड. मल्लिनाथ शहाबादे, ॲड. नीता मंकणी, ॲड. सुनंदा भगत, माधव देशपांडे, डॉ. सीमा गायकवाड, सिद्धेश्वर स्वामी, डॉ. राजेंद्र सूर्यवंशी, डॉ. मंगेश वेदपाठक, सुदर्शन यादव, अनिल घनवट, सौ. गवळी आदीनी प्रश्नोत्तरे व प्रस्तावाच्या चर्चेत भाग घेतला.

**यापूर्वी सुशीलकुमार शिंदे, माशेलकर सन्मानित**

यापूर्वी २०१५ मध्ये पद्मभूषण डॉ. रघुनाथ अनंत माशेलकर यांना डॉक्टर ऑफ सायन्स (डी. एससी.) आणि माजी केंद्रीय मंत्री सुशीलकुमार शिंदे यांना डॉक्टर ऑफ लिटरेचर (डि.लीट.) ही मानद पदवी प्रदान करण्यात आली होती.

### प्रोफे. जोर्शीना डीएससी तर प्रभुणेंना डिलीट पदवी

पद्मभूषण प्रोफेसर जे. बी. जोशी यांना डॉक्टर ऑफ सायन्स (डी. एससी) व पद्मश्री गिरीश यशवंत प्रभुणे यांना डॉक्टर ऑफ लिटरेचर(




डि.लीट.) ही मानद पदवी देण्याचाही ठराव आधिसभेने सर्वांनुमते मंजूर केला. नवीन शासन निर्णयानुसार ही नावे शिफारस करण्याचा अधिकार कुलगुरूंना असल्यामुळे त्यांनी ही दोन नावे राज्यपाल तथा कुलपती यांच्या मंजुरीसाठी पाठवली होती. त्यांनी मंजुरी दिली असल्यामुळे हा ठराव व्यवस्थापन परिषदेनंतर आधिसभेनेही मंजूर केला आहे. त्यामुळे येत्या दीक्षांत समारंभामध्ये त्यांना या पदवी प्रदान करण्यात येणार आहेत.

### अण्णाभाऊ साठे, नितीन गडकरी व शरदचंद्र पवार यांचे प्रस्ताव प्रलंबितच

यापूर्वी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना मरणोत्तर, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि माजी केंद्रीय मंत्री शरदचंद्र पवार यांना डिलीट पदवी देण्याबाबतचा ठराव अधिसभा व व्यवस्थापन परिषदेने केला होता. या ठरावाचे काय झाले असा प्रश्न अधिसभेने उपस्थित केला होता. हे सर्व प्रस्ताव राज्यपाल कार्यालयास पाठविले होते. परंतु त्यांच्याकडून मंजुरीने आली नसल्याचे कुलगुरू प्राध्यापक महानवर यांनी सभेत सांगितले. यांचे प्रस्ताव परत पुढील वर्षी पाठविण्याचे आश्वासन त्यांनी अधिसभेस दिले. त्यानंतरच कुलगुरूंनी शिफारस केलेल्या दोन नावांना सर्वांनुमते मंजूरी देण्यात आली.

### ठळक तरतुदी

✻ डाटा सेंटरसाठी ६ कोटी ✻ अहिल्यादेवी स्मारक लेझर शो साठी २ कोटी ✻शिक्षकांच्या संशोधनाला चालना देण्यासाठी 'सीड मनी' उपक्रमासाठी ३५ लाख रुपये. ✻मुलींच्या उच्च शिक्षणातील प्रमाण वाढवण्यासाठी 'मुली शिकवा, समाज घडवा' उपक्रमासाठी ५ लाख रुपये. ✻'कमवा व शिका' योजनेसाठी २० लाख रुपये. ✻आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग १.२५ कोटी ✻ खेळाडूंसाठी वैद्यकीय खर्च परतावा २ लाख ✻शिक्षक व कर्मचाऱ्यांसाठी वैद्यकीय प्रतिपूर्ती योजनेसाठी २० लाख रुपये. ✻विद्यार्थी संशोधन शिष्यवृत्ती आणि ४० गरजू विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके देण्यासाठी भरीव तरतूद. ✻इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँड लिंकेजेससाठी विद्यापीठ हिस्सा म्हणून ५० लाख रुपये. ✻स्पर्धा परीक्षा अभ्यास कक्ष, विद्यार्थी क्षमता संवर्धन कार्यक्रम, नवीन लेखक-प्रकाशक प्रोत्साहन योजना आणि 'माझे विद्यापीठ' उपक्रमासाठी विशेष निधी.

# शिवजन्मोत्सवाचा उत्साह

**आज उगवला सूर्य नभी नव्या नवलाईचा...**

**हजारो महिलांच्या गर्दीने फुलला छत्रपती शिवाजी महाराज चौक**

**'न भूतो न भविष्यती' असा राज्यातला देखणा कार्यक्रम**

**पारंपरिक वेशभूषा परिधान करून महिला उपस्थित**

**गुलाब पाकळ्यांची उधळण अन् फटाक्यांची आतषबाजी**

**गर्दीवर नियंत्रणासाठी पोलिसांचा चोख बंदोबस्त**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ फेब्रुवारी -**

आज उगवला सूर्य नभी नव्या नवलाईचा....श्र हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्माचा पाळणा गात हजारो सोलापूरकर शिवभक्त महिलांनी बुधवारी रात्री बारा वाजता 'न भूतो न भविष्यती' असा शिवजन्मोत्सव सोहळा साजरा करून आपल्या लाडक्या राजाला मानवंदना दिली.

छत्रपती शिवाजी महाराज चौकात आजवर अनेक कार्यक्रम झाले. परंतु, बुधवारी रात्री झालेल्या शिवजन्मोत्सव सोहळ्याने नवा इतिहास घडवला. रात्री दहा वाजण्याच्या सुमाराला छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवभक्तांची दाटी झाली होती. पाळणा सादरीकरणाचे यंदाचे हे पाचवे वर्ष आहे.

छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये मोठ्या प्रमाणात महिलांची गर्दी झाली होती. छत्रपतीं शिवाजी महाराज चौक ते एसटी स्टँड पासून ही गर्दी पुणे नाक्यापर्यंत गेली होती. तर इकडे छत्रपती शिवाजी महाराज चौक ते नवी पोलीस चौकी पर्यंत महिलांची गर्दी होती.

या गर्दीतून जय जिजाऊ, जय शिवरायचा जयघोष होत होता. शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्याजवळ राजमाता जिजाऊंचा पुतळा ठेवण्यात आला होता. या पुतळ्याच्या अगदी समोरच सजवून ठेवलेला पाळणा होता. त्यात बाळशिवबांची मूर्ती होती. दूरूनच या पाळण्याचे छायाचित्र टिपण्यासाठी महिलांची धडपड सुरू होती. रात्री १२ वाजता 'झुलवा पाळणा.. पाळणा बाळ शिवाजीचा' हे पाळणा गीत सुरू झाले आणि हजारो महिला, शिवभक्तांनी जल्लोष केला. ज्या क्षणाची सर्व जण वाट पाहत होते तो पाळण्याचा कार्यक्रम सुरू झाला. जमलेल्या महिला, मुले टाळ्या वाजवीत पाळण्याच्या गीताला दाद देऊ लागली. फुले उधळू लागली. आकाशात फटाक्यांची आतषबाजी सुरू झाली. 'जय जिजाऊ-जय शिवराय', 'छत्रपती शिवाजी महाराज की जय'चा जयघोष गगनात दुमदुमला. हवेत भगवा झेंडा गरगर फिरला आणि पुन्हा जय शिवरायचा जयघोष झाला.

गुलाब पाकळ्यांची उधळण अन् फटाक्यांची आतषबाजी सुरूच होती. पाळणा झाल्याबरोबर उपस्थितांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यावर गुलाब पाकळ्यांचा वर्षाव केला. हर हर महादेव, जय शिवाजी, जय भवानीच्या घोषणा सुरू झाल्या. सोहळ्यासाठी मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त होता.

यंदाचे उत्सव अध्यक्ष जयवंत सलगर, कार्याध्यक्ष उत्तरा बरडे - बचुटे, कृष्णा सुरवसे, अनिरुद्ध पाटील, नामदेव पवार, रमेश जाधव, किरण भंडारी, संतोष जाधव, ब्रह्मदेव पवार, संजीवनी मुळे, चारुशीला जगदाळे, पुरुषोत्तम बोबडे, अंबादास सपकाळ, संदीप काशीद, सुजित चौगुले, विजय पुकाळे, लक्ष्मण भोसले, दीपक शेळके कृष्णकांत चव्हाण, प्रभाकर जाधव, प्रभाकर भोजरंगे, जलपेश घुले, राम दादा सुरवसे, बाबा बनसोडे, सचिन स्वामी, बबलू जांभळे, नागेश वडणे, तुषार गायकवाड, कृष्णा भुरळे यांनी या पाळणासोळ्याचे उत्कृष्ट नियोजन केले होते.

### पाळणा सोहळ्याला उपस्थिती...

देवकी रत्नाकर हडपद, रेखा शावरेप्पा नावी, रत्नाबाई बाबुराव चांदोडे, सुषमा दत्तात्रय माने यांच्यासह महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षा उत्तीर्ण झालेल्या शहरातील शिवकन्या संजीवनी ज्योतीराम भोजने, सरोजिनी ज्योतीराम भोजने, अमृता ब्रह्मदेव ननवरे, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, गुन्हे शाखेच्या पोलीस उपायुक्त अश्विनी पाटील, सोलापूर महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त विना पवार, श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या ट्रस्टी सुषमाताई मुरलीधर घाडगे, यशोदा ताई अर्जुनराव सुरवसे, सीताबाई धर्माजी भोसले, लताताई विजयराव फुटाणे, सरोजिनीताई शिवाजीराव घाडगे मंगलताई दिलीप कोल्हे आधी जास्त पाळणा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाकरिता श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाचे ट्रस्टी अध्यक्ष पद्माकर काळे उपाध्यक्ष श्रीकांत डांगे कार्याध्यक्ष श्रीकांत घाडगे ट्रस्ट सचिव प्रीतम परदेशी ट्रस्टी खजिनदार जयवंत शेळके सदस्य शिवाजीराव गाडगे गुरुजी दिलीप कोल्हे पुरुषोत्तम बर्डे राजन जाधव नागेश टाकमोगे महादेव गवळी विनोद भोसले, प्रभाकर रोडगे विक्रांत वानकर ज्ञानेश्वर सपाटे अनिकेत पिसे विवेक फुटाणे बजरंग जाधव प्रकाश ननवरे अमोल केकडे शिवकुमार कामाठी देविदास घुले आधी जर उपस्थित होते.

### पायलटच्या मदतीनेच...

पान १ वरुन

तर गुजरातमध्ये त्याहून स्वस्त इंधन उपलब्ध होते, असा युक्तिवादही त्यांनी मांडला. त्यामुळे एवढ्या अल्प अंतराच्या प्रवासासाठी टाक्या पूर्ण भरण्याचा निर्णय का घेतला गेला, हे तपासले पाहिजे, असे त्यांनी म्हटले. जादा इंधन असल्यास स्फोटाची तीव्रता वाढते, ही शंका आता खरी ठरत असल्याचे ते म्हणाले.

**अपघात तपासाकडे राज्याचे लक्ष**

या सर्व बाबींचा विचार करता हा अपघात नसून नियोजित कट असण्याची शक्यता नाकारता येत नाही, असा ठाम दावा रोहित पवार यांनी केला. पायलटची भूमिका संशयास्पद असल्याचे सांगत त्यांनी सखोल आणि निष्पक्ष चौकशीची मागणी केली. या प्रकरणातील प्रत्येक तांत्रिक बाबीची तपासणी झाली पाहिजे, तसेच इंधन भरण्याच्या निर्णयामागील कारणांचा शोध घेतला पाहिजे, असे ते म्हणाले. अजित पवार यांच्या आकस्मिक निधनानंतर आधीच राज्यात भावनिक वातावरण निर्माण झाले आहे. त्यात आता घातपाताच्या आरोपांमुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. रोहित पवार यांनी केलेल्या दाव्यांमुळे या प्रकरणाला नवे वळण मिळाले असून, पुढील तपासातून नेमके काय निष्पन्न होते, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

**व्हीएसआर कंपनीला वाचवण्याचा प्रयत्न**

आमदार रोहित पवार यांनी अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या (घातपाताच्या) मुद्द्यावर प्रश्न उपस्थित केल्यानंतर ते म्हणाले की, इतर राजकीय पक्षाशी संबंधित ट्रोलर्स त्यांना लक्ष्य करत आहेत. सलग दुसऱ्यांदा व्हिडिओ सादरीकरण करत त्यांनी व्हीएसआर कंपनीला वाचवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा गंभीर दावा केला. विमानाची नोंदणीही बेकायदेशीर असल्याचे त्यांनी म्हटले. ट्रोल करणारे लोक एका राजकीय पक्षाच्या मोठ्या नेत्यांशी संबंधित असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

**मी अजितदादांना दिल्लीहून फोन केला होता**

मी तेव्हा दिल्लीत होतो आणि अजित पवार कुठे आहेत हे मला माहीत नव्हते. मी त्यांना दिल्लीतून फोन केला होता.

**सीबीआय चौकशीची मुख्यमंत्र्यांकडे मागणी**

अजित दादा यांचे जाणे ही फार दुर्दैवी घटना आहे. या घटनेच्या सखोल तपास विविध यंत्रणेद्वारे होत आहे. राज्य सरकार सुद्धा तपास करत आहेत. परंतु यामध्ये अनेक लोकांनी शंका कुशंका व्यक्त केल्या आहेत. त्यामुळे याची सखोल तपासणी होणे आवश्यक आहे. अचानकपणे एवढी मोठा दुर्घटना कशी होऊ शकते, याची सीबीआय द्वारा चौकशी करण्यात यावी आणि ही महाराष्ट्रात घटना झाल्यामुळे महाराष्ट्र सरकार याबाबत सीबीआयला चौकशी करण्यात सांगू शकते. म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस तर्फे आम्ही काल निवेदन देऊन या प्रकरणाची सीबीआय चौकशी करण्याची मागणी केली आहे, असे वक्तव्य प्रफुल पटेल यांनी केले.

# आयटीआयच्या दोन लाख विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण

● कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांची माहिती ● अनिरुद्धाज् ॲकॅडमी ऑफ डिजास्टर मॅनेजमेंट सोबत सामंजस्य करार

**◆ मुंबई, १८ फेब्रुवारी**

राज्यातील सुमारे दोन लाख आयटीआय विद्यार्थ्यांना टप्प्याटप्प्याने आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्याचा महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेण्यात आला असून, यासाठी अनिरुद्धाज् ॲकॅडमी ऑफ डिजास्टर मॅनेजमेंट आणि कौशल्य विभागांतर्गत व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांच्यात सामंजस्य करार करण्यात आल्याची माहिती कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिली.



मंत्री लोढा यांनी सांगितले की, राज्यातील ४१९ शासकीय आयटीआयमधील विद्यार्थ्यांना विनाशुल्क, प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण दिले जाणार आहे. नैसर्गिक तसेच मानव निर्मित आपत्तींचा सामना करण्यासाठी विद्यार्थ्यांना सक्षम बनवणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

आपत्ती कधीही आणि कोणत्याही स्वरूपात येऊ शकते. अशा परिस्थितीत मानवी जीविताचे संरक्षण सर्वोच्च प्राधान्य असते. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेला सहाय्य करणारी प्रशिक्षित युवा पथके तयार करणे आवश्यक आहे. प्रत्येक नागरिकाने आपत्ती व्यवस्थापन व बचावकार्याचे मूलभूत प्रशिक्षण घेतले पाहिजे, असेही त्यांनी नमूद केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'सशक्त भारत' संकल्पनेचा हा भाग असून, राज्यात पारंपरिक खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी आयटीआयमध्ये 'क्रीडा महाकुंभ' आयोजित केला जातो. त्याचप्रमाणे आता जनसेवेच्या भावनेतून आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षणाची नवी भर घालण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. वातावरणातील बदलांमुळे गेल्या काही वर्षांपासून केवळ भारतातच नव्हे तर जगभरात नैसर्गिक आपत्ती कोसळत आहे. आग, पूर, दरड कोसळणे, दुष्काळ यासारख्या घटना वारंवार घडत आहेत. यात जगभरात हजारो नागरिकांचा मृत्यू झाला तर संपत्तीची हानी मोजण्या पलीकडची आहे. अशा संकटाच्या काळात मदतीसाठी धावून जाणे आवश्यक आहे. याच विचारातून विद्यार्थ्यांची मदत घेतली जात आहे, असे लोढा यांनी सांगितले.

◂(तभा वृत्तसेवा)

### सक्षम आणि सज्ज युवा शक्तीची निर्मिती

» या उपक्रमामुळे राज्यातील आयटीआय विद्यार्थी केवळ कौशल्याधारित शिक्षणातच नव्हे, तर समाजहिताच्या कार्यातही पुढाकार घेतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. आपत्तीच्या काळात तत्पर, प्रशिक्षित आणि जबाबदार युवकांची फळी तयार करण्याच्या दृष्टीने हे महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे. ■

# रावी नदीचे पाणी मार्चपासून रोखणार



**नवी दिल्ली, १८ फेब्रुवारी**

जम्मू-काश्मिरातील रावी नदीवरील शाहपूर कांदी धरणाचे बांधकाम पूर्ण होण्याच्या मार्गावर असून, सीमापार जाणारे नदीचे पाणी ३१ मार्चपासून रोखणार आहे. यामुळे पाकिस्तानात पाण्याचे संकट निर्माण होण्याची शक्यता आहे. उन्हाळ्याची चाहूल लागली असताना भारताचा हा निर्णय पाकिस्तानसाठी मोठा धक्का मानला जात आहे. केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांनी सांगितले की, काश्मिरातील रावी नदीवरील शाहपूर कांदी धरणाचे बांधकाम निश्चित कालावधीच्या तीन महिने आधीच पूर्ण होणार आहे. ३१ मार्चपासून सीमापार जाणारे नदीचे पाणी अडवले जाईल. या नदीवर बांधण्यात आलेले धरण सिंधू जल करार रद्द करण्याच्या निर्णयाचा भाग आहे.

# डॉ. सिंगच्या बँक खात्यातून १८ कोटींचे व्यवहार

## किडनी विक्री प्रकरण

**चंद्रपूर, १८ फेब्रुवारी**

बहुचर्चित किडनी विक्री प्रकरणी दिल्लीतील डॉ. रवींद्रपाल सिंग यास मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठातून तात्पुरता अटकपूर्व जामीन मिळाला असला, तरी चंद्रपुरात हजेरी लावण्याचे आदेश दिले गेले आहे. दरम्यान, डॉ. सिंगने पोलिसांच्या अनेक प्रश्नांबाबत मौन बाळगले. पोलिसांनी दिलेल्या प्रश्नावलीला लेखी उत्तर डॉ. सिंग यांनी दिले. मागील काही महिन्यात त्याच्या खात्यातून तब्बल १८ कोटींचे व्यवहार झाल्याची माहिती तपासात समोर आली. नागभीड तालुक्यातील मिंथूर येथील पीडित शेतकऱ्याच्या तक्रारीनंतर, किडनी तस्करीच्या तपासासाठी चंद्रपूर पोलिसांनी एसआयटी गठित केली असून 'थोटा' कायद्यांतर्गत शासनाने प्राधिकृत अधिकारी म्हणून एसआयटी प्रमुख तथा अपर पोलिस अधीक्षक ईश्वर कातकडे यांची नियुक्ती केली आहे. डॉ. सिंगने उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात जामीन मिळविण्यासाठी धाव घेतली होती. याप्रकरणी सुनावणी झाल्यानंतर सशर्त जामीन देण्यात आला व चंद्रपूर पोलिसांसमोर हजेरी लावण्याचे आदेश दिले गेले. त्यानुसार डॉ. सिंग चंद्रपुरात आला होता.

**२४ फेब्रुवारीला पुन्हा सुनावणी**

मुंबई उच्च न्यालयाच्या नागपूर खंडपीठातून डॉ. सिंगला सशर्त अटकपूर्व जामीन मिळाला होता. बुधवारी न्यायालयात सुनावणी झाली. पुढची सुनावणी २४ फेब्रुवारीला होणार आहे. त्यावेळी जामीन नाकारला तर आम्ही तत्काळ अटक करू आणि पोलिस कोठडीची मागणी करू, असे काचोरे यांनी सांगितले.

### अभिनेता सिद्धार्थ मल्होत्रा यांच्या वडिलांचे निधन

**मुंबई:** बॉलिवूडचा अभिनेता सिद्धार्थ मल्होत्रा याच्या वडील सुनील मल्होत्रा यांचे निधन झाले. अभिनेता सिद्धार्थने समाज माध्यमांवर वडिलांच्या निधनाची माहिती शेअर केली. अत्यंत अशा दु:खद प्रसंगी त्यांच्यासोबत पत्नी कियारा आडवाणी आणि कुटुंबीय देखील दिल्लीमध्ये दाखल झाले असून त्यांनी आपल्या वडिलांना शेवटचा निरोप दिला. ते एक खरे, प्रामाणिक आणि पारंपारिक मूल्ये सांभाळणारे व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात कधीच तत्त्वांशी तडजोड केला नाही. काटेकोर शिस्तीचे पालन करून सुद्धा ते कधी कठोर नव्हते आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वात जबाबदारी असूनही अहंकाचा अंशही नव्हता, अशी पोस्ट सिद्धार्थने केली आहे.

# पुढाऱ्यांनी बंधुत्व जोपासावे; सर्वोच्च न्यायालयाने टोचले कान

## द्वेषपूर्ण भाषणांना आळा घालण्याचे निर्देश

**नवी दिल्ली, १८ फेब्रुवारी**

भाषणाचा उगम विचारातून होतो. आपण संवैधानिक नीतिमत्तेच्या विरुद्ध जाणारे विचार पुसून टाकले पाहिजे. द्वेषपूर्ण भाषणांना आळा घालण्यासाठी आधी विचार सुधारण्याची गरज असून, राजकीय नेत्यांनी देशातील बंधुत्व जोपासावे, अशा शब्दांत द्वेषपूर्ण टिप्पणी करणाऱ्या नेत्यांचे कान सर्वोच्च न्यायालयाने टोचले.

राजकीय पक्ष आणि उच्च संवैधानिक पदांवर असलेल्या अधिकाऱ्यांनी देशात बंधुत्व जोपासले पाहिजे, अशी टिप्पणी सरन्यायाधीश सूर्यकांत, न्या. बी. व्ही. नागरत्ना आणि न्या. जॉयमाल्या बागची यांच्या न्यायासनाने नऊ जणांनी दाखल केलेल्या याचिकेवरील सुनावणीवेळी केली. सरन्यायाधीश म्हणाले, सर्व राजकीय पक्षांना आमचे आवाहन आहे की, तुम्ही संवैधानिक नैतिकता, मूल्ये, परस्पर आदर आणि आत्मसन्मान या तत्त्वांचे पालन करावे. तुम्ही वैचारिक तत्त्वांवर आधारित निवडणुका लढवता. परंतु, एकमेकांचा आदर करणे देखील महत्त्वाचे आहे. तुच्याकडून अशा प्रकारच्या वर्तनाची अपेक्षा नाही. आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्वा सरमा यांच्या अलिकडील भाषणांची आणि आसाममधील भाजपाच्या माध्यम विभागाने जारी केलेल्या एका व्हिडीओची दखल घेत याचिका दाखल करण्यात आल्या.

### मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्याची मागणी

व्हिडीओ ध्ये एका विशिष्ट समुदायाला लक्ष्य केल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला. द्वेषपूर्ण भाषणे रोखण्यासाठी संवैधानिक पदांवरील लोकांसाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्याची मागणी याचिकेत करण्यात आली. न्यायालयाने याचिकेवर आक्षेप घेतला. सरन्यायाधीश म्हणाले की, ही याचिका एका व्यक्तीविरोधात आहे. त्यामुळे संबंधित याचिका मागे घेऊन नवीन याचिका दाखल करावी, ज्यात सर्व राजकीय पक्षांचा उल्लेख असेल.



एकनाथ शिंदे आमचे विरोधक असले तरी ते राज्याचे उपमुख्यमंत्री आहेत. तसेच राज ठाकरे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख आहेत. त्यामुळे राज ठाकरेंनी कोणाला भेटायला जावं, जाऊ नये, यावर आम्ही काही बोलू शकत नाही.
- **सुषमा अंधारे**, उबाठा नेत्या

तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
गुरुवार, १९ फेब्रुवारी २०२६


मराठा समाजाच्या आरक्षण लढ्याला आम्ही समर्थन दिले होते, त्याचप्रमाणे मुस्लिम समाजालाही आरक्षण मिळाले पाहिजे. मुस्लिम समाजातही अनेक घटकांना आरक्षणाची नितांत गरज आहे. यासाठी आता समाजातील सर्व धर्मगुरूंनी एकत्र येणे आवश्यक आहे.
- **इम्तियाज जलील**, माजी खासदार



# इराणविरोधात बळाचा वापर करणार

### चर्चा निष्फळ ठरल्याने व्हान्स यांचा इशारा
### अण्वस्त्र करार धुडकावणे भोवणार
### विध्वंस झाल्यास खामेनेई जबाबदार



**◆ जीनेव्हा, १८ फेब्रुवारी**

अमेरिका आणि इराण यांच्यातील चर्चेच्या दुसऱ्या फेरीत कोणताही निष्कर्ष निघाला नाही. इराणने अणुकरारासंदर्भातील अटी मान्य करण्यास नकार देत अमेरिकेचा प्रस्तावित करारच धुडकावून लावला. या नकाराची किंमत तेथील सत्ताधाऱ्यांना चुकवावी लागेल. अमेरिका आता इराणमध्ये बळाचा वापर करेल आणि विध्वंसासाठी सर्वोच्च नेते खामेनेई जबाबदार असतील, असा इशारा अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जे. डी. व्हान्स यांनी दिला.



दोन्ही देशांच्या शिष्टमंडळाने मंगळवारी अणुप्रश्नाबाबत जीनेव्हा येथे चर्चा केली. ही बैठक सुमारे तीन तास चालली. चर्चेनंतर व्हान्स यांनी समाज माध्यमावरील पोस्टमध्ये म्हटले की, इराण अणुकरारासंदर्भातील अटी स्वीकारण्यास तयार नाही. मात्र, दोन्ही देशांनी वाटाघाटी सुरू ठेवण्यास सहमती दर्शविली. इराणला याची किंमत चुकवावी लागेल. अमेरिका बळाचा वापर करण्यासाठी सज्ज आहे. भविष्यात विध्वंस झाल्यास खामेनेई जबाबदार असतील.

ट्रम्प यांनी राजनैतिक तोडग्यासाठी ठेवलेल्या काही अटींमध्ये महत्त्वाचा मुद्दा अणुकार्यक्रमाशी संबंधित आहे. इराण त्या मान्य करण्यास तयार नाही. वाटाघाटींतून मुद्दा न सुटल्यास इराणच्या सत्ताधीशांना मोठी किंमत चुकवावी लागेल, असे व्हान्स यांनी म्हटले. *(वृत्तसंस्था)*

### ...तर ताकदीने प्रत्युत्तर : खामेनेई



पुन्हा उभे राहणे शक्य होणार नाही, इतक्या ताकदीने जगातील सर्वांत शक्तिशाली सैन्यावर हल्ला केला जाईल, असे इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनेई यांनी समाज माध्यमावरील पोस्टमध्ये म्हटले आहे. अणुऊर्जा हा आमचा अधिकार आहे आणि आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्थेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्येही याचा समावेश आहे. सर्व देशांना अण्वस्त्रे बाळगण्याचा आणि अण्वस्त्र समृद्ध करण्याचा अधिकार आहे. अमेरिकेला यात हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही, असे त्यांनी म्हटले.

### पश्चिम आशियात पाठवली ५० लढाऊ विमाने

**इराणसोबत दुसऱ्या फेरीतील चर्चा निष्फळ ठरल्यानंतर अमेरिकेने पश्चिम आशियातील हवाई तळांवर ५० पेक्षा जास्त लढाऊ विमाने पाठवली आहेत. यामुळे दोन्ही देशांत संघर्ष उफाळण्याची शक्यता आहे. इराणची नाकेबंदी करण्यासाठी अमेरिकेचे नौदल आणि वायुदल आधीच सागरी सीमेवर तैनात आहे.**

### इराण-रशिया करणार युद्धसराव

**मध्य पूर्वेत अमेरिका आणि इराणमधील तणाव शिगेला पोहोचला असताना, इराण आणि रशिया ओमान समुद्र आणि उत्तर हिंद महासागरात गुरुवारी संयुक्त युद्धसराव करणार असल्याचे वृत्त इराणच्या फार्स न्यूज एजन्सीने दिले. दोन्ही देशांमधील समन्वय वाढवणे आणि सागरी कारवाया रोखणे हा सरावाचा उद्देश आहे.**

# भारत-नेपाळमध्ये कायदेशीर सहकार्य करार

### गुन्हेगारी प्रकरणाच्या तपासात सहकार्य
### दोन्ही देशांच्या प्रतिनिधींची दस्तावेजांवर स्वाक्षरी

**◆ नवी दिल्ली, १७ फेब्रुवारी**

दहशतवाद, गुन्हेगारी प्रकरणांमध्ये परस्पर कायदेशीर सहकार्य भारत-नेपाळ यांच्यात करारावर स्वाक्षरी झाली. या करारामुळे दोन्ही देशांच्या अधिकाऱ्यांना गुन्हेगारी तपास आणि कायदेशीर कार्यवाहीत सहकार्य करण्यास मदत होणार आहे.

परराष्ट्र मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, चार वर्षांच्या वाटाघाटींनंतर करार प्रत्यक्षात येणार आहे. जुलै २०२५ मध्ये राजधानी दिल्ली येथे गृहसचिवस्तरीय बैठकीत या करारावर सहमती झाली. तथापि, काठमांडूमध्ये बुधवारी दोन्ही देशांच्या अधिकाऱ्यांनी करारावर स्वाक्षरी केली. आर्थिक आणि गैरआर्थिक गुन्ह्यांचा तपास, तसेच दहशतवादाविरोधातील प्रकरणात कारवाईसाठी हा करार महत्त्वाचा असेल.

नेपाळच्या कायदा, न्याय आणि संसदीय कामकाज मंत्रालयाचे सहसचिव विनोद कुमार भट्टराई आणि नेपाळमधील भारतीय राजदूत नवीन श्रीवास्तव कायदा यांच्या उपस्थितीत कराराच्या दस्तावेजावर स्वाक्षरी झाली. गुन्हेगारी प्रकरणांच्या तपासादरम्यान, पुरावे गोळा करणे आणि त्यांची देवाणघेवाण करण्यासाठी या करारमुळे कायदेशीर चौकट उपलब्ध होईल, असेही निवेदनात म्हटले आहे. *(वृत्तसंस्था)*




### आर्थिक गुन्हे कमी करण्यास मदत

कराराच्या अंमलबजावणीमुळे आर्थिक गुन्हे कमी करणे आणि दोन्ही देशांच्या केंद्रीय अधिकाऱ्यांमधील सहकार्य आणखी मजबूत करण्यास मदत होणार आहे. हा करार मनी लॉण्ड्रिंग आणि दहशतवादी वित्तपुरवठा रोखण्याशी संबंधित परस्पर मूल्यांकनात देखील मदत करेल. दुसरीकडे नेपाळच्या परराष्ट्र मंत्रालयाने एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले की, 'भारतासोबत झालेल्या करारामुळे नेपाळला जागतिक मनी लॉण्ड्रिंग विरोधी संस्था, 'फायनान्शियल ॲक्शन टास्क फोर्स' च्या 'ग्रे लिस्ट'मधून बाहेर पडण्यास मदत होईल.

# गामिनीने दिला तीन शावकांना जन्म

### भारतातील चित्त्यांची संख्या ३८



**◆ शिवपूर, १८ फेब्रुवारी**

मध्यप्रदेशातील कुनो राष्ट्रीय अभयारण्यात गामिनी या मादी चित्त्याने तीन शावकांना जन्म दिला. यासह भारतातील चित्त्यांची संख्या ३८ झाली आहे, अशी माहिती केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांनी बुधवारी दिली.

चित्त्यांना भारतात पुनर्स्थापित करण्यासाठी सरकारने हाती घेतलेल्या महत्त्वाकांक्षी कार्यक्रमाला मिळालेले हे एक अभूतपूर्व यश असल्याचे यादव यांनी सांगितले. देशाच्या दृढनिश्चयी आणि ऐतिहासिक संवर्धन प्रयत्नांचे एक शक्तिशाली प्रतीक आहे, असे यादव म्हणाले.

दशकांपूर्वी नामशेष झालेल्या भारतातील चित्त्यांना पुनर्स्थापित करण्यासाठी सप्टेंबर २०२२ मध्ये सुरू केलेल्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचा एक भाग म्हणून गामिनीला दक्षिण आफ्रिकेतून भारतात स्थलांतरित करण्यात आले. कुनोत तीन नवीन शावकांचे स्वागत आहे. दक्षिण आफ्रिकेतून चित्त्यांच्या आगमनाला तीन वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त कुनो येथे एक नवीन अध्याय सुरू झाला आहे. दक्षिण आफ्रिकेतील चित्ता आणि दुसऱ्यांदा आई बनलेली गामिनीने जगात तीन पिले आणल्याने कुनो राष्ट्रीय उद्यानात आनंदाचे वातावरण आहे, असे यादव यांनी 'एक्स'वर म्हटले आहे.

### पुनर्प्रसारासाठी मध्यप्रदेश शक्तिशाली केंद्र

**मध्यप्रदेश हे चित्त्यांच्या पुनर्प्रसारासाठी एक शक्तिशाली केंद्र आहे, असे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी नमूद केले. वन्यजीव संवर्धन, जैवविविधता आणि पर्यावरण संतुलनाच्या दिशेने संपूर्ण देशासाठी ही एक ऐतिहासिक कामगिरी आहे, असे यादव यांनी स्पष्ट केले.**

तीन शावकांच्या आगमनासह भारतात जन्म घेतलेल्या शावकांची संख्या २७ आणि देशातील चित्त्यांची एकूण संख्या ३८ झाली आहे. हे देशाच्या दृढ आणि ऐतिहासिक संवर्धन प्रयत्नांचे एक शक्तिशाली प्रतीक आहे, असे यादव यांनी अधोरेखित केले. प्रत्येक चित्त्याच्या जन्मातून चित्ता प्रकल्पाचा पाया मजबूत होत आहे.

कुनो आणि भारतासाठी हा अभिमानाचा क्षण आहे. गामिनी आणि तिचे तीन लहान धावपटू बळकट होतील आणि देशाच्या चित्ता पुनरुज्जीवनाची कहाणी वेगाने समोर नेतील, असे यादव यांनी म्हटले आहे. *(वृत्तसंस्था)*

### बुधवार पेठेतून ११ विदेशी तरुणी ताब्यात

**◆ पुणे, १८ फेब्रुवारी**

बुधवार पेठेतील वेश्यावस्तीत पुणे पोलिसांनी कारवाई केली. आठवडभरात पोलिसांनी वेश्यावस्तीत दुसरी कारवाई करुन २२ तरुणींना ताब्यात घेतले. त्यापैकी ११ तरुणी बांगलादेशी असल्याची माहिती प्राथमिक तपासात मिळाली आहे. बुधवार पेठेत बांगलादेशी तरुणी बेकायदा वास्तव्य करत असल्याची माहिती मिळाल्यानंतर फरासखाना आणि ख़डक पोलिसांच्या पथकाने संयुक्त कारवाई केली. पोलिसांनी संशयावरुन २२ तरुणींना ताब्यात घेतले. त्यापैकी ११ तरुणींनी नागरिकत्वाची कागदपत्रे सादर केली. उर्वरित ११ तरुणींची चौकशी केली असता त्या बांगलादेशी असल्याचे आढळले. *(वृत्तसंस्था)*

# बांगलादेशसोबत संबंध सुधारण्यावर भारताचा भर

### विक्रम मिस्री यांची स्पष्टोक्ती, विरोधी पक्ष नेत्याची घेतली भेट

**◆ नवी दिल्ली, १८ फेब्रुवारी**

बांगलादेशातील नवीन सरकारच्या शपथविधी समारंभात जमात-ए-इस्लामीचे अध्यक्ष शफीकुर रहमान यांची विरोधी पक्षनेते म्हणून निवड झाली. भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी रहमान यांची भेट घेतली आणि बांगलादेशसोबत संबंध सुधारण्यावर भारताचा भर असल्याचे सांगितले.

नवीन सरकारच्या शपथविधी समारंभासाठी मिस्री बांगलादेश येथे गेले असता, त्यांनी विरोधीपक्षनेते आणि जमात-ए-इस्लामीचे प्रमुख शफीकुर रहमान यांची भेट घेतली. त्यांनी विरोधी पक्षनेत्याचे अभिनंदन केले आणि दोन्ही देशांमधील संबंध सुधारावे या अनुषंगाने चर्चा केल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाने दिली. या भेटीत मिस्री यांनी भारत-बांगलादेश संबंधांवर लक्ष केंद्रित केले, तर जमात प्रमुखांनी संबंध आणखी मजबूत होण्याची आशा व्यक्त केली. दरम्यान निवडणूक जाहीरनाम्यात, जमातने परस्पर आदर आणि निष्पक्षतेवर आधारित भारतासह शेजारील देशांशी शांततापूर्ण आणि सहकार्यात्मक संबंध निर्माण करण्याचे आश्वासन दिले होते. बीएनपीचे अध्यक्ष तारिक रहमान यांनी मंगळवारी बांगलादेशचे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली. ते ३५ वर्षांत बांगलादेशचे पहिले पुरुष पंतप्रधान आहेत. *(वृत्तसंस्था)*



# राहुल गांधी देशाच्या सुरक्षेसाठी धोकादायक : किरेन रिजिजू

**◆ नवी दिल्ली, १८ फेब्रुवारी**

केंद्रीय संसदीय कार्यमंत्री किरण रिजिजू यांनी संसदेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. राहुल गांधी हे भारताच्या सुरक्षेसाठी सर्वात धोकादायक व्यक्ती आहेत. ते भारतविरोधी शक्तीशी संबंध ठेवतात. ते नक्षलवादी, अतिरेकी विचारवंत आणि जॉर्ज सोरोस सारख्या लोकांशी विदेशात आणि देशात भेटतात, असे आरोपही त्यांनी केले.


संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान होणाऱ्या गोंधळावर मंत्री रिजिजू पुढे म्हणाले, संसदीय लोकशाहीत नेहमीच विरोधक गोंधळ घालतात. प्रत्येक पक्षाचा स्व:ताचा अजेंडा असतो. तो सभागृहात पुढे नेण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. गदारोळासोबतच आपण केलेल्या कृतींकडे लक्ष द्यायला हवे. जेव्हा आम्ही विरोधी पक्षात होतो तेव्हा लोकसभा अध्यक्षांवर कागदपत्रे फेकली नाहीत. *(वृत्तसंस्था)*




महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे नवनियुक्त अध्यक्ष विवेक बिमनवार यांना बुधवारी राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. यावेळी उपस्थित मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## चित्रपट वार्ता

### ए. आर. रहमान राहणार समाज माध्यमांपासून दूर



**मुंबई** : दिग्दर्शक नितेश तिवारी यांच्या आगामी बहुप्रतिक्षित चित्रपट 'रामायण' बद्दल समाज माध्यमांसह सर्वत्र जोरदार चर्चा सुरू आहे. चित्रपटाच्या संगीताची जबाबदारी ए.आर. रहमान यांनी स्वीकारली आहे. चित्रपटाच्या म्युझिक लाँचिंग इव्हेंटच्या तयारीत असताना संगीताची गुणवत्ता सुनिश्चित करण्यासाठी ए.आर. रहमान यांनी ४० दिवसांसाठी समाज माध्यम आणि इंटरनेटपासून स्वतःला दूर ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे त्यांचे संपूर्ण लक्ष संगीतावर केंद्रित राहील. ए.आर. रहमान यांनी चेन्नईमध्ये झालेल्या एका कार्यक्रमात याबाबत सांगितले. यावर चाहत्यांकडून मिश्र प्रतिक्रिया मिळाल्या आहेत.

### 'माया' चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित




**मुंबई** : अभिनेते गिरीश ओक, अभिनेत्री मुक्ता बर्वे, रोहिणी हट्टंगडी आणि सिद्धार्थ चांदेकर यांच्या दमदार अभिनयाने सजलेला 'माया' चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाला आहे. प्रेम, नाते आणि नात्यात आलेला दुरावा असा हा भावना प्रधान चित्रपट आहे. सिद्धार्थ चांदेकरने हाऊस फादरची भूमिका साकारली आहे. विजय केंकरे आणि रोहिणी हट्टंगडी यांचे अभिनय देखील उत्तम आहेत. गिरीश ओक यांची भूमिका लक्षवेधी दिसते. ते एक रुग्ण म्हणून उपचार घेत असतात आणि मुक्ता त्यांच्यावर उपचार करत असते. शालिनी सिनेमाज आणि नितीन वैद्य प्रॉडक्शन्स निर्मित या चित्रपटाचे निर्माते डॉ. सुनील दातार, अलका मधुकर दातार आणि नितीन प्रकाश वैद्य आहेत. आदित्य इंगळे दिग्दर्शित 'माया' चित्रपट २७ फेब्रुवारीला प्रदर्शित होणार आहे.

### विक्रांत मेस्सीने शेअर केले 'अनसीन' फोटो



**मुंबई** : राष्ट्रीय पुरस्कार विजेता अभिनेता विक्रांत मेस्सी आणि त्यांची पत्नी शीतल ठाकूर यांनी लग्नाचा चौथा वाढदिवस साजरा केला. या खास प्रसंगी, विक्रांतने त्याच्या समाज माध्यम खात्यावर पत्नीसाठी एक खास पोस्ट शेअर केली. विक्रांतने लग्नाचे अनेक न पाहिलेले फोटो इंस्टाग्रामवर शेअर केले. त्याने त्याच्या पत्नीसाठी एक गोड आणि भावनिक संदेश देखील शेअर केला. विक्रांतने या फोटोच्या कॅप्शनमध्ये लग्नाच्या वाढदिवसाच्या माझ्या 'ए वनला डे वन'पासून शुभेच्छा, असे लिहीले आहे. दोघांनी अनेक वर्षे डेटिंग केली आणि २०२२ मध्ये हिमाचल प्रदेशात एका छोट्या, खाजगी समारंभात लग्न केले. चित्रपटाच्या आघाडीवर, विक्रांत सध्या 'ओ रोमियो' मध्ये दिसतो आहे.

### अमित शाहांनी इस्कॉन मुख्यालयाला दिली भेट

**कोलकाता** : केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी बुधवारी पश्चिम बंगालमधील मायापूर येथील इस्कॉन मुख्यालयाला भेट दिली. कोलकाता विमानतळावर त्यांचे भाजपा प्रदेशाध्यक्ष समिक भट्टाचार्य आणि विधानसभेतील विरोधी पक्षनेते शुभेंदू अधिकारी यांनी स्वागत केले. त्यानंतर सर्व जण मायापूर येथे नियोजित कार्यक्रमांसाठी हेलिकॉप्टरने नादिया जिल्ह्यातील कृष्णनगर येथे आले. भ्रष्टाचारी आणि राष्ट्रविरोधी टीएमसी सरकारला उलथवून पश्चिम बंगालमध्ये राष्ट्रवादी सरकार स्थापन करण्याच्या आमच्या प्रयत्नांना मार्गदर्शन करणारे, असे गतिमान नेतृत्व आमच्यासाठी नेहमीच प्रेरणादायी आहे, असेही अधिकारी यांनी म्हटले आहे.

# जादूटोण्याच्या संशयावरुन बाळासह मातेला जाळले

**◆ सिंहभूम, १८ फेब्रुवारी**

झारखंडच्या पश्चिम सिंहभूम जिल्ह्यात एका ३२ वर्षीय महिलेला तिच्या बाळासह जाळून टाकले. ही धक्कादायक घटना मंगळवारी रात्री उशिरा कुमारडुंगी पोलिस स्टेशन परिसरातील एका गावात घडली. याप्रकरणी चार जणांना अटक करण्यात आली आहे. तो घटनास्थळावरुन पळून जाण्यात यशस्वी झाल्यामुळे त्याचा जीव वाचला. त्याने बुधवारी सकाळी पोलिस स्टेशन गाठून घटनेची माहिती दिली.

पतीने तक्रारीत म्हटले की, मंगळवारी मध्यरात्री काही लोक मला आणि माझ्या पत्नीला हाक मारत असल्याचे ऐकून मी उठलो. मी बाहेर गेलो असता सुमारे एक डझन लोक दिसले. ते माझ्या पत्नीवर जादूटोण्याचा आरोप करत होते. त्यांनी जादुटोण्यावरून आमच्याशी वाद घातला. यादरम्यान, जमावाने माझ्या पत्नीवर रॉकेल ओतून तिला पेटवून दिले. त्यावेळी तिच्या हातात एक वर्षांचे बाळ होते.

**नातेवाईकाच्या मृत्यूला धरले जबाबदार**

पोलिसांनी सांगितले की, तक्रारीत नाव असलेल्या चार जणांना आम्ही अटक केली आहे. केवळ अंधश्रद्धेमुळे ही घटना घडली आहे. या गुन्ह्यात सहभागी असलेल्या महिलांची ओळख पटवण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत. त्याच गावात राहणाऱ्या पीडित कुटुंबाच्या एका नातेवाईकाचे निधन झाले. त्यांनी त्याच्या मृत्यूसाठी तक्रारदाराच्या पत्नीला जबाबदार धरले. *(वृत्तसंस्था)*

# हृदय थांबल्यानंतरही मेंदू राहतो सक्रिय

**◆ अल्बानी, १८ फेब्रुवारी**

मानवाच्या हृदयाचे ठोके थांबल्यानंतरही मेंदू काही काळ सक्रिय राहू शकतो. यामुळे मृत्यूनंतरच्या क्षणांमध्ये काय घडते याबाबत प्रश्न निर्माण होतात, असे एका अभ्यासातून दिसून आले आहे. 'रिसुसिटेशन' नियतकालिकेमध्ये प्रकाशित झालेल्या या संशोधनातून नवी बाब उघड झाली आहे.

डॉ. सॅम पर्निया यांच्या पथकाने यूनायटेड स्टेट्स आणि युनायटेड किंग्डममधील २५ रुग्णालयांमधील हृदयविकाराचा झटका येऊन गेलेल्या ५३ रुग्णांची तपासणी केली. हृदय



अचानक काम करणे बंद करते तेव्हा 'कार्डियाक अरेस्ट' येतो. प्राणवायूच्या कमतरतेमुळे सुमारे १० मिनीटांत मेंदूचे कायमचे नुकसान होते. दरम्यान अभ्यासात पुनरुत्थान प्रयत्नांदरम्यान मेंदूच्या हालचालीची चिन्हे आढळून आली. विशेष म्हणजे हृदय बंद पडल्यानंतर एका तासानेही मेंदूमध्ये हालचाल दिसली. सुमारे ४० टक्के रुग्णांनी वैद्यकीयदृष्ट्या मृतावस्थेत आठवणी किंवा जाणीवपूर्वक विचार येत असल्याचे सांगितले. काहींनी त्यांना भूतकाळातील घडलेल्या घटना आठवत असल्याचे सांगितले. यामध्ये वैद्यकीय कर्मचाऱ्यांमधील संभाषणांचा देखील समावेश असल्याचे न्यू यॉर्क पोस्टने म्हटले आहे.

ब्रेन स्कॅनिंगमध्ये विचार आणि जागरुकतेशी संबंधित वेगवेगळ्या प्रकारच्या मेंदू लहरींमध्ये वाढ झाल्याचे दिसून आले. काही प्रकरणांमध्ये हृदयविकाराच्या झटक्यानंतर ३५ ते ६० मिनिटांमध्ये हे नमुने आढळून आले. हा अनुभव अद्वितीय आणि वैश्विक असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. तो अनुभव स्वप्ने, भ्रम आणि आभास यांच्यापेक्षा वेगळा आहे. *(वृत्तसंस्था)*

### तज्ज्ञांमध्ये सुरू झाला वाद

**मेंदू पूर्वीच्या विश्वासापेक्षा अधिक लवचिक असू शकतो. हे संशोधन सीपीआर पद्धती आणि हृदयविकाराच्या झटक्याने होणाऱ्या मेंदूच्या दुखापतींवर उपचार सुधारण्यास मदत करू शकते, असे निष्कर्षांवरून असे दिसून येत असल्याचे डॉ. पर्निया म्हणाले. या अभ्यासामुळे चेतना खरोखर कशी आणि केव्हा संपते याबद्दल आता तज्ज्ञांमध्ये वादविवाद सुरू झाला आहे.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# दहशतीच्या अंताचा निर्धार आणि आपण सारे...

जम्मू-काश्मीर आणि ईशान्य भारत २०२९ सालापर्यंत दहशतवाद आणि बंडखोरीमुक्त होणार असल्याची घोषणा करून केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सरकारची अदम्य इच्छाशक्ती जाहीर केली आहे. ३१ मार्च २०२६ पर्यंत माओवाद्यांचा पूर्णतः नायनाट करण्याचा पुनरुच्चारही त्यांनी केला आहे. शाह यांच्या या दोन्ही इशाऱ्यांना हलक्यात घेण्याचे कारण नाही. अलिकडच्या काही वर्षांत सरकारने ज्या ताकदीने नक्षलवाद्यांचे कंबरडे मोडले, ते पाहता जम्मू-काश्मीर आणि ईशान्य भारतालाही दहशतवादमुक्तीकडे नेण्याचा मार्ग त्यांनी भक्कम करून ठेवला असेल, याबाबतच्या शंकेला जागा उरत नाही.

शस्त्र सोडून मुख्य प्रवाहात या, अन्यथा सरकारचे कणखर हात तुम्हाला शोधून काढतील, हा केवळ इशारा नसून भारताच्या बदलत्या सुरक्षा धोरणाचे वैशिष्ट्य आहे. २०१४ पूर्वीपर्यंत देशाच्या नकाशावर जम्मू-काश्मीरमधील हिंसाचार, ईशान्य भारतातील फुटीरतावाद्यांचे थैमान आणि लाल 'कॉरिडॉर'च्या नक्षलवादाचा विळखा यामुळे देशाची एकात्मता आणि अखंडता धोक्यात असल्याचे जाणवायचे. तत्कालीन केंद्रीय सरकारच्या बोटचेपेपणाकडे पाहिले की चिंता वाढायची. गेल्या दशकभरात केंद्र सरकारने फक्त उक्ती नव्हे तर कृतीतून निर्धाराचे दर्शन घडविले आहे. सध्याचा काळ हा दहशतीप्रति 'झिरो टॉलरन्स'चाच आहे, हे मोदी सरकार वारंवार सिद्ध करीत आहे. माओवाद्यांच्या आक्रमकता संपत असल्याचे दृष्टिक्षेपात असतानाच, अमित शाह यांनी जम्मू-काश्मीर आणि ईशान्य भारताबाबत २०२९ पर्यंतचे नवे लक्ष्य निर्धारित केले आहे. दहशतवादमुक्तीचा उचललेला हा विडा नव्या भारताच्या सामर्थ्याचे दर्शन घडवणारा आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान अमित शाह चंद्रपुरात आले असताना त्यांनी ३१ मार्च २०२६ पर्यंत देशातून नक्षलवाद संपवू अशी घोषणा केली होती. तिचा पुनरुच्चार ते वारंवार करीत राहिले आणि आपल्या सुरक्षा दलांना प्रोत्साहन देत राहिले. जवानांनीही त्यांना निराश केले नाही. त्यांनी जोरदार मोहिमा राबवल्या. छत्तीसगडच्या बिजापुरात ३१ नक्षलवाद्यांना कंठस्नान घातले गेले. महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्हा एकेकाळी नक्षलवाद्यांचा गड मानला जायचा. मात्र, 'सी-६०' या विशेष कमांडो दलाने नक्षलवाद्यांच्या मनात धडकी भरवली. मिलिंद तेलतुंबडे याच्यासह २६ नक्षलवाद्यांचा खात्मा केला. सुमारे पाचशेहून अधिक जवानांच्या मृत्यूस कारणीभूत असलेला अत्यंत जहाल माओवादी माडवी हिडमा यास १८ नोव्हेंबर २०२५ रोजी सुरक्षा जवानांनी यमसदनी पाठवले. या चकमकीत हिडमाची पत्नी राजक्का हिच्यासह अन्य सहा नक्षलवादीही ठार झालेत. २१ मे २०२५ रोजी छत्तीसगडच्या बस्तर भागात झालेल्या चकमकीत माओवाद्यांचा तत्कालीन सर्वोच्च नेता बसवराजू याच्यासोबत २७ माओवाद्यांचा खात्मा केला गेला. त्याचा परिणाम म्हणून ६ जूनला १२ माओवाद्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत गडचिरोलीमध्ये आत्मसमर्पण केले. लगेच १८ जूनला आंध्र प्रदेशातील अल्लुरी सीतारामराजू जिल्ह्यातल्या चकमकीत माओवाद्यांच्या केंद्रीय समितीचा सदस्य गजरला रवी ठार झाला. धास्तावलेला केंद्रीय समिती सदस्य भूपतीने ३ ऑक्टोबरला शस्त्रसंधी लढा थांबविण्याची भूमिका जाहीर केली. पुढे त्याने १५ ऑक्टोबरला ६१ माओवाद्यांसह आत्मसमर्पणही केले. अशा अनेक प्रमुख माओवाद्यांचे कंबरडे मोडले गेले. एकेकाळी ४२ सदस्य असलेल्या माओवाद्यांच्या केंद्रीय समितीत या घडीला केवळ पाचच सदस्य उरले असल्याची माहिती आहे. हे खरे असेल तर ही चळवळ मरणपंथाला लागली आहे, असे समजायला हरकत नाही. या पृष्ठभूमीवर, काश्मीर व ईशान्य भारत येथील दहशतवाद २०२९ पर्यंत संपेल, या गृहमंत्र्यांच्या घोषणेला गांभीर्य प्राप्त झाले आहे. आज काश्मीरपासून ते मणिपूरपर्यंत आणि बस्तरपासून ते गडचिरोलीपर्यंत न्याय पोहोचत असल्याचा विश्वास तयार होत आहे. त्यामुळे २०२९ पर्यंत दहशतवाद संपवण्याच्या घोषणेला बळ मिळणार आहे. रस्त्यांचे जाळे, ५-जी इंटरनेट आणि एकलव्य शाळांच्या माध्यमातून विकासाचा प्रकाश दुर्गम भागात पोहोचला की, दहशतीचा अंधार आपोआप नष्ट होऊ लागतो. बाह्य सुरक्षेचे आव्हान वाढत असताना, अंतर्गत सुरक्षा व्यवस्थेत झालेली सुधारणा महत्त्वाची आहे. सरकारचा निर्धार असे सांगतो की, जे लोक भारताला तुकड्या तुकड्यांत विखुरलेला पाहू इच्छितात त्यांच्यासाठी पुढचा 'काळ' कठीण असणार आहे. हेच केंद्र सरकारच्या विद्यमान धोरणाचा आणि कणखर अंमलबजावणीचा इतिहास सांगतो. २०१४ पूर्वी जम्मू-काश्मीरमध्ये तिरंग्याचा अपमान होणे, पाकिस्तानच्या झेंड्याचे जाहीर प्रदर्शन मांडले जाणे, दगडफेक होणे, जवान हुतात्मा होणे ही रोजची बातमी होती. फुटीरतावाद्यांचे दुकान जोरात चालत होते आणि दिल्लीतील सत्ताधारी त्यांना चिंता व्यक्त करण्यापलीकडे काहीच करीत नव्हते. मात्र, ५ ऑगस्ट २०१९ रोजी मोदी सरकारने एका झटक्यात कलम ३७० इतिहासजमा केले. त्यानंतर दगडफेकीच्या घटना जवळजवळ शून्यवत् झाल्या आहेत. दहशतवादी घटनांमध्येही ७० टक्के घट झालेली दिसते. एक काळ होता, जेव्हा श्रीनगरच्या लाल चौकात जाणे म्हणजे मरणाला आमंत्रण देणे समजले जायचे. पण आज तिथे रात्री उशिरापर्यंत पर्यटक 'आईस्क्रीम'चा आनंद घेतात. काश्मीर खोऱ्यात हळूहळू सकारात्मक परिवर्तन येताना दिसते आहे. तसाच बदल ईशान्य भारतात भविष्यात होईल, हे शुभचिन्ह आहे. पूर्वीच्या सत्ताधीशांना तर ईशान्य भारताचा अनेक दशके विसर पडला होता. तिथला दुर्गम भाग बंडखोर गटांच्या ताब्यात गेला. पण शाह यांनी सातत्याने ईशान्येचा दौरा करून तिथल्या बंडखोर गटांशी संवाद साधला. बोडो करार, ब्रू-रियांग आणि कार्बी आंगलाँग करारांसारखे २० हून अधिक शांतता करार झाले. त्याचाच परिणाम म्हणून १० हजारपेक्षा अधिक युवकांनी हातातली शस्त्रे सोडून भारताच्या तिरंग्याला सलामी दिली. शांतता प्रस्थापित झाल्यामुळे अनेक भागांतून 'आर्म्ड फोर्सेस स्पेशल पॉवर्स ॲक्ट' मागे घेण्यात आला आहे. ही भारतासारख्या खंडप्राय व लोकतांत्रिक देशासाठी सकारात्मक घटना होय. पूर्वी मणिपूर किंवा नागालँडमध्ये सायंकाळनंतर रस्ते ओस पडायचे. आज तिथे पायाभूत सुविधांचे जाळे पसरले आहे. 'लुक ईस्ट'चे रूपांतर 'ॲक्ट ईस्ट'मध्ये झाल्याचा हा परिणाम आहे.

मात्र, कोणतेही युद्ध केवळ बंदुकीच्या जोरावर जिंकता येत नाही, हेही खरे आहे. त्यासाठी जनमानसाची साथ लागते. २०२९ पर्यंत दहशतवादमुक्त भारत हे लक्ष्य गाठण्यासाठी सजग नागरिक हा या मोहिमेचा साथीदार आहे, हे नाकारून चालणार नाही. ज्या भागात अशी दहशत आहे आणि त्यामुळे तेथील विकास खुंटला आहे, तेथील जनतेला सरकारच्या निर्धाराला पाठबळ द्यावे लागेल. जनतेला विश्वासात घेणे ही अशा कुठल्याही मोहिमेची पहिली पायरी असते, याची जाण सरकारलाही असेलच. नक्षलवादी असो की दहशतवादी, ते कायम स्थानिक लोकांमध्ये सरकारबद्दल गैरसमज पसरवण्याचे काम करीत असतात. अशा अपप्रचाराला बळी न पडता सरकारच्या विकास योजनांवर विश्वास टाकणे या बिकट प्रसंगी महत्त्वाचे असते. एखादा स्थानिक नागरिक सुरक्षा दलांना संशयास्पद हालचालींची माहिती देतो, तेव्हा त्यालाही शांतता हवी आहे हे सिद्ध होते. जनतेचा सरकारी यंत्रणेला पाठिंबा असणे व दुर्गम भागात विकास पोहोचणे हे अशा संघर्षातील मोठे व महत्त्वाचे आयुध असते. दुर्गम भागात जेव्हा रस्ते, पूल किंवा भ्रमणध्वनीचे मनोरे उभे राहतात, तेव्हा दहशतवादी किंवा नक्षलवादी त्यास विरोध करतात. या भागात विकास पोहोचला तर आपले अस्तित्व संपेल, याची जाण त्या समाजकंटकांना असते, हे सर्व नागरिकांनी लक्षात ठेवले पाहिजे. भरकटलेले जे युवक शस्त्रे सोडून पुन्हा समाजाच्या मुख्य प्रवाहात येऊ इच्छितात, त्यांना तिरस्कार न करता, त्यांना मोठ्या मनाने स्वीकारले पाहिजे, जेणेकरून इतरही आत्मसमर्पणासाठी प्रवृत्त होतील. राष्ट्राला केवळ सीमारेषेने आकार येत नसतो. नागरिकांच्या प्रबळ इच्छाशक्तीने राष्ट्र अस्तित्वात येते. नागरिकांकडून व्यापक सहकार्याची सरकारला गरज आहे. त्याच भरवशावर शाह यांनी २०२९ पर्यंत भारताला दहशतवादमुक्त करण्याची महत्त्वाकांक्षी घोषणा केली आहे आणि तिला सक्रिय पाठबळ देणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.

## प्रासंगिक

### आशुतोष अडोणी


# वर्तमानकालीन बोध : युगंधर शिवराय

आज शिवजन्मोत्सव! छत्रपती शिवरायांचे नुसते स्मरणही मनाला उभारी देते. अनेक प्रतिभावंतांनी शिवचरित्राच्या महासागरात बुडी घेऊन त्यातील अनमोल रत्ने आपल्या हातात दिली. असे हे लोकोत्तर शिवचरित्र एखाद्या आयुष्याला किती आणि कसे भारून टाकते, याचे उदाहरण म्हणजे शिवगंधर्व स्व. डॉ. सुमंत टेकाडे! अल्पकाळासाठी भूतलावर येऊन आपल्या प्रतिभेने आसमंताला मोहित करणाऱ्या गंधर्वांच्या कथा आपल्या पुराणांत विखुरल्या आहेत. सुमंत हा असाच एक गंधर्व! शिवगंधर्व ! जणू फक्त आणि फक्त शिवचरित्र गायनासाठीच तो आला. त्यासाठी स्वतः वेडा झाला आणि जगालाही वेड लावून गेला.

लहानपणी संघशाखेतील कथाकथनातून शिवचरित्रातील छोट्या मोठ्या प्रसंगांचे जे गारूड सुमंताच्या मनावर झाले ते त्याला झपाटून टाकणारे होते. तिथूनच सुरू झाला शिवचरित्राचा अखंड ध्यास. विविध शिवचरित्रांचे वाचन, प्रमाणग्रंथांचा सखोल अभ्यास, इतिहासकारांची मतमतांतरे, नामवंतांची भाषणे अन् प्रत्यक्ष किल्ल्यांवरून फिरत घेतलेला अनुभव. या तपश्चर्येनंतरच सुमंतने आपले पहिले व्याख्यान सादर केले. पुढे जवळपास दहा वर्षे तो आवाज देशाच्या कानाकोपऱ्यात निनादत राहिला. दिल्लीपासून बंगलोरपर्यंत, मुंबईपासून गडचिरोलीपर्यंत. अल्पावधीतच शिवचरित्राचा बुलंद व्याख्याता म्हणून त्याची वेगळी ओळख तयार झाली. शेकडो तरुण त्याच्या भाषणांमुळे शिवचरित्राकडे आकृष्ट झाले. अचानक या शिववाणीवर काळाचा घाला आला. कोरोनाने या प्रतिभेचा बळी घेतला. हजारो-लाखो शिवप्रेमींना आपलासा वाटणारा, लाघवी, लोभस सुमंत अचानक निघून गेला. शिवकथा पोरकी झाली. मागे राहिला तो फक्त प्रत्येक व्याख्यानाच्या शेवटी घुमणारा त्याचा तो बुलंद जयघोष-

''प्रौढप्रताप पुरंदर, क्षत्रियकुलावतंस, सिंहासनाधीश्वर, महाराजाधिराज, राजा शिवछत्रपती कीऽऽऽ जय!''

''वेडात मराठे वीर दौडले सात'' या ओळी इतिहासात अमर आहेत; सुमंतही शिवचरित्राने झपाटलेला असाच वेडा! वेडात मारली नोकरीवर लाथ! शिवचरित्राचा वाढता प्रभाव आणि व्याख्यानांची वाढती मागणी यामुळे त्याने टेक्नोमॅनेजमेंट कॉलेजमधील प्राध्यापकपदाचा राजीनामा दिला. व्यवस्थापनशास्त्रात डॉक्टरेटपर्यंतचे शिक्षण असल्याने, त्याने अभ्यासाचा केंद्रबिंदू ठरवला- छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यवस्थापन. आधुनिक व्यवस्थापनशास्त्राची तत्त्वे आणि महाराज यांच्या यशस्वी नियोजनाचा अभ्यासपूर्ण संगम त्याने प्रभावीपणे मांडला. याच वैशिष्ट्यामुळे विद्यापीठे, महाविद्यालये आणि नामांकित कंपन्यांमध्ये टेडएक्स स्पीकर म्हणून त्याची शेकडो व्याख्याने झाली. मोठा चाहतावर्ग तयार झाला. युवकांपर्यंत शिवविचार पोहोचावा म्हणून त्याने 'शिवभारत' हे युट्यूब चॅनल सुरू केले. रेडिओ आणि दूरदर्शनवरूनही त्याचा शिवगजर अखंड सुरू राहिला. वृत्तपत्रांतूनही सुमंत सातत्याने लिहित राहिला. 'तरुण भारत'मधील 'शिवदीपस्तंभ' हे साप्ताहिक सदर तर वाचकांच्या विशेष पसंतीस उतरले. ते पूर्ण झाल्यानंतर त्याचे पुस्तक रूप यावे, अशी सुमंताची मनीषा होती. वडील दत्ताजी टेकाडे यांच्या प्रयत्नातून आणि डॉ. श्याम माधव धोंड यांच्या समर्थ संपादनातून हा अक्षर ठेवा आता ''नियोजन व व्यवस्थापनाचे दीपस्तंभ : युगंधर शिवराय'' या पुस्तकरूपाने वाचकांसमोर आला आहे. हा ग्रंथ एका अर्थाने सुमंताचे चिरकालिक वाङ्मयीन स्मारक आहे. शिवोदय, स्वराज्यावरील संकटे, शिवरायांचे सर्जिकल स्ट्राईक्स, स्वराज्याला ग्रहण, आग्र्याचे आक्रीत, वाढते स्वराज्य, शिवराय छत्रपती झाले, शिवकल्याणराजा, शिवाचे त्रिनेत्र, स्वराज्यनिष्ठांची मांदियाळी, शिवसंकीर्तक या अकरा प्रकरणांतून सुमंताने संपूर्ण शिवचरित्र साधार प्रमाणांसह मांडले आहे. त्याने अभ्यासलेल्या ग्रंथांची संदर्भसूची वाचली तरी या लेखनामागील व्यासंगाची आणि परिश्रमांची कल्पना येते. त्यामुळे हे पुस्तक विविध क्षेत्रांत कार्यरत व्यक्ती, विद्यार्थी आणि संस्थांसाठीही प्रेरक आणि मार्गदर्शक झाले आहे.




जिजाऊंनी शिवरायांना घडवताना उपसलेल्या कष्टांचा संदर्भ सुमंत आजच्या पालकत्वाशी जोडतो. शिवरायांनी घेतलेले कठोर परिश्रम सांगताना तो दैववाद नाकारतो. अफजलखानाचे वर्णन करताना लेखक अहंकार हा कर्तृत्वाचा शत्रू कसा ठरतो त्यावर विवेचन करतो. जीवनात यशस्वी होण्यासाठी अत्यावश्यक गुणांपैकी एक गुण म्हणजे नियोजन! अफजलखानाच्या गोटातून माहिती आणणे, खानाच्या स्वभावाचा अंदाज घेणे, त्याची मानसिकता ओळखणे, स्वतःच्या अन् खानाच्या शक्तीचा अंदाज घेणे, त्याचे कच्चे दुवे शोधणे, आपल्या लोकांचे मनोबल वाढविणे, भेटीची तयारी, बोलणी, सेनेची रचना, हल्ल्याची योजना, संकेत, स्वतःची तयारी... अशा कितीतरी महत्त्वाच्या गोष्टी आपल्या लक्षात येतील. शाहिस्तेखान प्रकरण हे हिंदुस्थानच्या इतिहासातील पहिलं सर्जिकल स्ट्राईक होतं. या स्ट्राईकमधील आपल्याला माहिती नसणारा कितीतरी बारीक तपशील सुमंतने चित्तवेधक शब्दात मांडला आहे.

सुरतेची स्वारी हेही असेच एक साहसपर्व. सुमंत इथे ती लूट नव्हती तर प्रतिलूट होती, हे साधार, सयुक्तिक विवेचनाद्वारे आपल्याला पटवून देतो. राजांना प्रजेची किती काळजी होती, हे आपल्याला सांगताना सुमंत त्यांच्याच एका पत्राचा संदर्भ देतो. या पत्रात महाराज आपल्या एका सुभेदाराला सांगतात की, ''सरकारी अधिकाऱ्याने स्वतः गावोगावी जाऊन तिथले कुणबी गोळा करावेत. त्यांच्याशी संवाद साधावा. शेती करण्यास उत्सुक असलेल्यांना जमीन द्यावी. आवश्यकता असल्यास त्यांना बैल, बी-बियाणे, नांगरही द्यावे. अर्थात लगेच त्यांच्याकडे उत्पन्न येणार नाही. त्यामुळे त्यांच्या उदरनिर्वाहासाठी सरकारातून धान्य दिले जावे. अशा शेतकऱ्यांना त्यांच्या शक्तीनुसार शेत कसण्यासाठी द्यावे. यावर जो खर्च झाला असेल त्याच्यावर व्याज न आकारता काही वर्षांमध्ये केवळ मुद्दल वसूल होईल याचा प्रयत्न करावा.'' किती ही प्रजावत्सलता! सुमंतच्या प्रस्तुत ग्रंथातून शिवराय असे समग्र स्वरूपात आपल्यासमोर येतात. शिवचरित्रातील प्रेरणादायी प्रसंगाना उजाळा देतात. त्याचबरोबर त्या घटनांचा अन्वयार्थ समजावून सांगतात. सुमंतची भाषा अतिशय प्रासादिक, शब्दसंपदा समृद्ध. शाहिराची रसाळ कथनशैली, शब्दाशब्दातून प्रत्ययाला येणारी भावोत्कटता यामुळे हे शिवचरित्र हातात घेतल्यानंतर पूर्ण वाचून झाल्याशिवाय सोडवत नाही. शिवचरित्र तरुणांच्या मनामनात रुजावे यासाठीची त्याची तळमळ आणि तगमग प्रत्येक वाक्यातून जाणवते. हा ग्रंथ म्हणजे शिवआख्यानाचा भावकल्लोळ! लालित्य आणि विचारगर्भता इथे हातात हात घालून शिवचरित्राचा डौल फुलवत नेते. शिवछत्रपतींच्या अवघ्या पन्नास वर्षांच्या पण युगानुयुगे समाजाला दीपस्तंभासारखे मार्गदर्शन करणाऱ्या, प्रेरणादायी, चित्तथरारक आणि बोधप्रद इतिहासाला या ललित लेखनातून वेधकपणे रेखाटण्यात लेखक स्व. डॉ. सुमंत टेकाडे कमालीचे यशस्वी झाले आहेत. या यशात या ग्रंथाचे संपादक डॉ. श्याम माधव धोंड यांच्या साक्षेपी संपादनाचे मोल फार मोठे आहे. दीर्घ प्रस्तावनेच्या रूपाने डॉ. श्याम धोंड सरांनी दिलेले अर्घ्य आस्वादक रसग्रहणाचे उत्तम उदाहरण आहे. युगंधर शिवराय हे एका कृतिशील, सर्वार्थाने झपाटलेल्या, प्रखर राष्ट्रभक्त कार्यकर्त्याचे भावचिंतन आहे. ते वाचकाला शिवछत्रपतींच्या इतिहासाचा जाज्वल्य बोध, वर्तमानाची सावध जाण आणि भविष्याचा वेध घेण्यास बाध्य करतं, आत्मभान आणि आत्मगौरवासोबतच विलक्षण अंतर्मुखही करत जातं. केवळ जयजयकारात न अडकता तरुणांना शिवछत्रपतींच्या पायवाटेवर पहिले पाऊल टाकण्यास प्रेरित करणे, हे या साहित्यकृतीचे अलौकिक सामर्थ्य आहे आणि तेच वैशिष्ट्यही!

## दिल्ली वार्तापत्र

### श्यामकांत जहागीरदार

# मोदींचे पीएमओ झाले 'सेवातीर्थ'

राजधानी दिल्लीतील रायसिना हिलवर असलेले आणि देशातील सत्तेचे सर्वोच्च केंद्र म्हणून ओळखले जाणारे पंतप्रधान कार्यालय (पीएमओ), नॉर्थ ब्लॉक आणि साऊथ ब्लॉक आता तेथून स्थानांतरित करण्यात आले आहे. पंतप्रधान कार्यालय म्हणजे पीएमओ सेवातीर्थ या नवीन जागेत तर नॉर्थ ब्लॉक आाणि साऊथ ब्लॉकमधील मंत्रालय कर्तव्य भवन एक आणि दोनमध्ये हलवण्यात आले आहे. सेवातीर्थमध्ये पंतप्रधानांचे कार्यालय, कॅबिनेट सचिवालय आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांचे कार्यालय आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या महत्त्वाकांक्षी सेंट्रल व्हिस्टा प्रकल्पांतर्गत आता राष्ट्रपती भवनाचा एकमेव अपवाद वगळता संसदभवन, पीएमओ, नॉर्थ ब्लॉक, साऊथ ब्लॉक आणि अन्य मंत्रालयांना नवीन अत्याधुनिक इमारती मिळाल्या आहेत. मागील शुक्रवारी म्हणजे १३ फेब्रुवारीला जुन्या पीएमओत मंत्रिमंडळाची शेवटची बैठक घेत पंतप्रधान मोदी यांनी या ऐतिहासिक वास्तूचा निरोप घेतला.

पीएमओ देशातील सर्वोच्च सत्ताकेंद्र आहे. सर्व मंत्रालयांवर पीएमओची भक्कम पकड असते. पीएमओच्या मंजुरीशिवाय सामान्यपणे मंत्रालयांना कोणतेच महत्त्वपूर्ण निर्णय घेता येत नाही. १९११ मध्ये ब्रिटिशांनी राजधानी कोलकातावरून दिल्लीत आणली. दिल्लीत नवी राजधानी उभारण्यासाठी २० वर्षे लागली. भारतासारख्या अवाढव्य देशाचा कारभार चालवण्यासाठी इंग्रजांनी १९३१ मध्ये राजधानीतील रायसिना हिल या टेकडीवर व्हाईसरॉय हाऊस, जे आता राष्ट्रपती भवन म्हणून ओळखले जाते, संसदभवन तसेच नॉर्थ ब्लॉक आणि साऊथ ब्लॉकची उभारणी केली. साऊथ ब्लॉकलाच लागून पंतप्रधान कार्यालयाची म्हणजे पीएमओची इमारत होती. १३ फेब्रुवारी १९३१ ला नॉर्थ ब्लॉक, साऊथ ब्लॉक, पीएमओ, संसद भवन तसेच तेव्हाच्या व्हाईसरॉय हाऊसचे उद्घाटन झाले होते. त्यामुळे नवीन पंतप्रधान कार्यालयाच्या म्हणजे सेवातीर्थच्या उद्घाटनासाठी मोदी यांनी जाणीवपूर्वक १३ फेब्रुवारी ही तारीख निवडली होती. पंतप्रधान मोदी कोणतीही गोष्ट सहज करत नाहीत, तर त्यामागे मोठी दृष्टी असते.

१५ ऑगस्ट १९४७ ला देशात पहिल्यांदा पंतप्रधान सचिवालय अस्तित्वात आले. देशाचा गाडा चालवण्यासाठी भारतीय मानसिकतेची शासकीय यंत्रणा आवश्यक होती. देशाचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी इंग्लंडचे तत्कालीन पंतप्रधान एटली यांना विनंती केली की, मंत्रिमंडळ तसेच पंतप्रधान कार्यालय स्थापन करण्यासाठी मला अभ्यास करण्यासाठी मदत करा. त्यानुसार एटली यांनी इंग्लंडचे तत्कालीन कॅबिनेट सचिव लॉर्ड नॉर्मन ब्रुक आणि माजी कॅबिनेट सचिव लॉर्ड एडवर्ड ब्रिजेस यांच्यावर ही जबाबदारी सोपवली. भारतातील पंतप्रधान कार्यालयाची रचना १० डाऊनिंग स्ट्रीट या इंग्लंडच्या पंतप्रधान कार्यालयाच्या धर्तीवर तेव्हा तयार करण्यात आली होती.

सुरुवातीला आपल्या देशातील पंतप्रधान सचिवालयाची रचना पंतप्रधानांना त्यांच्या शासकीय कामाच्या दृष्टीने मदत करण्यासाठी करण्यात आली होती. त्यावेळी कॅबिनेट सेक्रटरी हे पद नव्हते. तर पंतप्रधानांना त्यांच्या कामात मदत करण्यासाठी प्रिन्सिपल प्रायव्हेट सेक्रेटरी हे पद होते. नेहरू यांना पंतप्रधान सचिवालय अधिक मजबूत करायचे होते, पण सरदार वल्लभभाई पटेल यांनी त्यांचा तो प्रयत्न हाणून पाडला. लालबहादूर शास्त्री पंतप्रधान झाल्यानंतर त्यांना एल. के. झा यांना प्रिन्सिपल प्रायव्हेट सेक्रेटरी बनवायचे होते. पण पंतप्रधान सचिवालयाला अन्य मंत्रालयाप्रमाणे स्वतंत्र दर्जा मिळावा, वॉरंट ऑफ प्रेसिडेन्समध्ये आपले स्थान कॅबिनेट सेक्रेटरीच्या दर्जाएवढे असावे तसेच आपण पंतप्रधानांचे सचिव म्हणून ओळखले जावे, अशी अट झा यांनी घातली आणि शास्त्री यांनी ती मान्य केली. त्यानंतर पंतप्रधान सचिवालयाचा विस्तार करण्यात आला. इंदिरा गांधी पंतप्रधान असताना पंतप्रधान सचिवालय खूप शक्तिशाली झाले. सुपर कॅबिनेट म्हणून ते ओळखले जाऊ लागले. १९७७ मध्ये जनता पक्षाच्या राजवटीत मोरारजी देसाई पंतप्रधान झाल्यानंतर त्यांनी पंतप्रधान सचिवालयाचे महत्त्व आणि अधिकार कमी करण्यासाठी त्याचे नाव पंतप्रधान कार्यालय (पीएमओ) असे केले.

रायसिना हिलवरील पंतप्रधान कार्यालयाने आतापर्यंत १८ पंतप्रधान पाहिले. यात दोन कार्यवाहक आणि १६ पूर्णकालीन पंतप्रधानांचा समावेश होता. गुलझारीलाल नंदा यांनी दोनवेळा कार्यवाहक पंतप्रधान म्हणून काम केले. एक महिला पंतप्रधान, इंदिरा गांधी यांच्या कार्यशैलीचाही पंतप्रधान कार्यालयाने अनुभव घेतला. राजीव गांधींसारखा सर्वांत तरुण पंतप्रधानही या कार्यालयाने पाहिला. तर मोरारजी देसाई यांच्यासारखा सर्वांत ज्येष्ठ म्हणजे ८१ वर्षांचा पंतप्रधानही पीएमओने पाहिला. देसाई भारतातील पहिले गैरकाँग्रेसी पंतप्रधान होते. दक्षिण भारतातील पहिले पंतप्रधान म्हणून पी. व्ही. नरसिंहराव यांच्या कामाचाही अनुभव पीएमओने घेतला. डॉ. मनमोहनसिंग हे देशातील पहिले शीख पंतप्रधान होते. जवाहरलाल नेहरू यांनी सर्वाधिक म्हणजे १७ वर्षे पंतप्रधानपद भूषविले. नेहरूनंतर सर्वाधिक काळ पंतप्रधानपद भूषविण्याचा विक्रम इंदिरा गांधी यांच्या नावावर आहे. इंदिरा गांधी तीनदा देशाच्या पंतप्रधान होत्या. पण सलग तीनवेळा पंतप्रधानपद भूषवण्याचा विक्रम नेहरूंनंतर नरेंद्र मोदी यांच्या नावावर आहे. अटलबिहारी वाजपेयी यांनीही तीनदा पंतप्रधानपद भूषवले, पण वाजपेयी सलग तीनदा पंतप्रधान नव्हते. पण पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करणारे वाजपेयी देशातील पहिले गैरकाँग्रेसी पंतप्रधान होते. अविश्वास प्रस्तावामुळे पद सोडावे लागणारे विश्वनाथप्रतापसिंह हे पहिले पंतप्रधान होते, तर एकही दिवस संसदेत येऊ न शकणारे चौधरी चरणसिंहही पीएमओने पाहिले. इंद्रकुमार गुजराल आणि एच. डी देवेगौडा यांच्यासारखे पंतप्रधानही या कार्यालयाने अनुभवले.

भारताच्या अलिप्त राष्ट्र चळवळीचा साक्षीदारही हेच पंतप्रधान कार्यालय होते. १९६२ च्या भारत-चीन युद्धाच्या वेळी तेव्हाचे पंतप्रधान साऊथ ब्लॉकमध्येच ठाण मांडून बसत होते. १९६५ च्या भारत-पाक युद्धाच्या वेळी तत्कालीन पंतप्रधान लालबहादूर शास्त्री साऊथ ब्लॉकमध्येच मुक्कामाला होते. १९७१ ला भारत-पाक युद्धाच्या व्यूहरचनेला तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी याच साऊथ ब्लॉकमधील वॉर रुममधून अंतिम रूप दिले होते. पंतप्रधान कार्यालय म्हणजे देशाशी संबंधित अनेक ऐतिहासिक तसेच आंतरराष्ट्रीय घडामोडींचे केंद्र राहिले आहे. या कार्यालयाने जसे इतिहास घडवणारे पंतप्रधान पाहिले, तसेच इतिहासात आपला ठसा उमटवू न शकणाऱ्या पंतप्रधानांच्या कार्यशैलीचाही अनुभव घेतला. विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवा इतिहास घडवला आहे, जो आतापर्यंत कोणत्याच पंतप्रधानाला घडवता आला नाही. मोदी यांनी देशाच्या राजधानीचा कायाकल्प केला, चेहरामोहरा बदलून टाकला. जुना इतिहास बदलत नवा इतिहास रचला आहे. हा फक्त पंतप्रधान कार्यालयाच्या इमारतीत झालेला बदल नाही तर देशाच्या मानसिकतेत झालेला सकारात्मक बदल आहे, आत्मविश्वासाने ओतप्रोत देशाने नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात विकसित भारताच्या दिशेने टाकलेले दमदार आणि आश्वासक पाऊल आहे.

९८८१७१७८१७

## वेध

### विजय कुळकर्णी

# पोलिस भरतीसाठी उच्चशिक्षित मैदानावर

प्रदीर्घ कालावधीनंतर राज्यात पोलिस भरती सुरू झाली आहे. शिपाई पदासाठी होत असलेल्या या भरतीसाठी उमेदवार बारावी उत्तीर्ण ही शैक्षणिक पात्रता आहे. मात्र, मोठ्या संख्येत डॉक्टर, अभियंता पदवीप्राप्त उच्चशिक्षित उमेदवार या पोलिस भरतीमध्ये उतरले आहेत. हे पाहून एकीकडे पोलिस विभाग अशा उमेदवारांमुळे सक्षम होणार असल्याचे समाधान वाटत असले तरी, डॉक्टर, अभियंत्यांना पोलिस शिपाई पदाची नोकरी पत्करावी लागणे म्हणजे त्यांच्या गुणवत्तेचा उपयोग योग्य ठिकाणी होत नसल्याने मन खिन्न होते.

नागपूरच्या पोलिस दलाचा विचार केल्यास ५९५ पदांसाठी होत असलेल्या या भरती प्रक्रियेत तब्बल ३६ हजार २२२ तरुण-तरुणींनी अर्ज केले आहेत. पोलिस सहआयुक्त नवीनचंद्र रेड्डी आणि मुख्यालय उपायुक्त दीपक अग्रवाल यांच्या मार्गदर्शनात दररोज ८०० उमेदवारांची मैदानी चाचणी होत आहे. चार दिवसांपासून राज्यात ही पोलिस भरती सुरू असून १७ हजार जागांसाठी राज्यातील सर्वच जिल्ह्यांत मैदानी चाचणी सुरू आहे. मुंबई आणि पुणे नंतर सर्वाधिक उच्चशिक्षित उमेदवार नागपूरच्या पोलिस भरतीत सहभागी झाल्याचे पाहायला मिळत आहे. तब्बल ९ हजार ७७५ पदवीधर युवक-युवती व १ हजार ७२९ पदव्युत्तर उदेवारांचा यात समावेश आहे. यात अभियंत्यांची संख्या ४०० पेक्षाही जास्त असून १२७ एमबीए, ८०१ एमए, ४ हजार ७४१ बीए आणि १ हजार ७०० बी. एस्सी झालेले उमेदवार आहेत. विशेष म्हणजे ७ एलएलबी व ३ एलएलएम शिक्षण घेतलेल्या उमेदवारांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. यापूर्वी महिला पोलिस पदांसाठी फार प्रतिसाद मिळत नव्हता. मात्र, या पोलिस भरतीत ९ हजार ९७३ तरुणींनी नागपूर पोलिस भरतीसाठी अर्ज सादर केले आहेत. त्यापैकी २ हजार ७११ महिला उमेदवार पदवीधर तर, ६८५ पदव्युत्तर पदवी घेतलेल्या आहेत. ६ हजार ५७७ बारावी उत्तीर्ण महिला उमेदवार पोलिस भरतीसाठी सज्ज आहेत. यापूर्वी देखील पोलिस भरती झाली आहे. पण, त्यात अशाप्रकारे उच्चशिक्षित उमेदवार कधी तरल्याचे उदाहरण अभावानेच बघायला मिळत होते. कदाचित काही आयपीएस अधिकारी होण्यासाठी डॉक्टर, अभियंत्यांनी अर्ज केले असतील. त्यापैकी काही पोलिस अधिकारी देखील झाले असतील. पण, पोलिस शिपाई पदासाठी प्रथमच एवढ्या मोठ्या संख्येत उच्चशिक्षितांनी तयारी केली असावी. पोलिस शिपाई पदासाठी यापूर्वी फारसे कोणी इच्छुक नसायचे. कारण, या पदासाठी असलेली वेतनश्रेणी. कामाचे तास, त्यातही कामात असलेली जोखीम. चोवीस तास कर्तव्यावर हजर राहावे लागणे. शिवाय लोकांचा पाहण्याचा दृष्टिकोन. या सर्वांचा विचार करता उच्च शिक्षण घेतलेले उमेदवार या पदाच्या भरतीसाठी कधी उतरले नव्हते. फार तर एमपीएससीमार्फत पोलिस उपनिरीक्षक व तत्सम पदांच्या नोकर भरतीसाठी मोठ्या संख्येत उमेदवार इच्छुक असतात. मात्र, वाढलेली सुशिक्षित बेरोजगारांची संख्या, अभियांत्रिकीची पदवी घेतल्यावरही नोकरीसाठी मंबई, पुणे, छत्रपती संभाजी नगर, नागपूर, बंगळुरूर इत्यादी शहरातच जावे लागत असल्याने त्या शहरात राहण्याचा खर्च व मिळणारे पॅकेज याचा मेळ न बसणे. तर, काही उमेदवारांच्या कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करता त्यांनी पोलिस शिपायाची नोकरी पत्करणेही मान्य केले असावे. आज केंद्र आणि राज्य सरकार कौशल्याधारित शिक्षणावर भर देत आहे. विविध कंपन्या व कारखान्यांमध्ये लागणाऱ्या कामगारांना आवश्यक कौशल्य अवगत असावे म्हणून कौशल्य शिक्षण शासनाने सुरू केले आहे. पण, आज सर्वांची अपेक्षा सरकारी नोकरी मिळावी, अशी आहे. हे देखील कारण पोलिस भरतीत उच्चशिक्षितांची संख्या वाढण्यामागे असावे, असे वाटते. दुसऱ्या बाजूने विचार केल्यास पोलिस विभागात आता अभियांत्रिकी पदवीधारक भरती होत असल्याने पोलिस विभाग टेक्नोसॅव्ही होण्यास मदत होणार आहे. संगणक व आंतरजालचा वापर करून गुन्हेगारांकडून सायबर गुन्हे केले जात आहेत. हे गुन्हे शोधण्यासाठी पोलिसांनी सायबर सेल स्थापन केला आहे. मात्र, त्यात काम करणारे त्या क्षेत्रातील तज्ज्ञ नाहीत. अभियांत्रिकी पदवीधारक त्या पदावर काम करतील तर, सायबर गुन्ह्यांचा शोध व गुन्हेगारांचा छडा लावण्यास पोलिसांना मदत होणार आहे. इच्छुक महिला उमेदवारांची संख्या देखील लक्षणीय असल्याने महिला विषयक गुन्ह्यांच्या तपासासाठी मदत होणार आहे. पोलिस सहआयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी देखील उच्चशिक्षित तरुण-तरुणींचा कल मोठ्या प्रमाणात पोलिस भरतीकडे असल्याने पोलिस दलाला सक्षम कर्मचारी मिळतील. ही पोलिस दलासाठी सकारात्मक बाब असल्याचे म्हटले आहे. उच्चशिक्षित उमेदवार पोलिस दलात भरती झाल्यावर नागरिकांनाही सुरक्षेबरोबरच चांगली वागणूक मिळण्याची अपेक्षा आहे. तेव्हा, उच्चशिक्षित उमेदवार पोलिस दलात भरती होणे ही नक्कीच सकारात्मक बाब आहे.

८८०६००६१४९

### छत्रपती शिवाजी महाराज : आदर्श आणि परिवर्तनाची प्रेरणा

छत्रपती शिवाजी महाराज हे समस्त मानवजातीसाठी स्वाभिमान, शौर्य आणि न्यायाचे प्रतीक आहेत. दरवर्षी १९ फेब्रुवारीला त्यांची जयंती महाराष्ट्रासह देशभर उत्साहात साजरी केली जाते. मात्र शिवजयंतीचा खरा अर्थ केवळ मिरवणुका आणि घोषणाबाजी नसून, त्यांच्या विचारांचा अंगीकार करण्यात आहे. शिवरायांनी स्थापन केलेले स्वराज्य हे न्याय, समता, सर्वधर्मसमभाव आणि लोककल्याण यावर आधारलेले होते. स्त्रियांचा सन्मान, शेतकऱ्यांचे रक्षण, पारदर्शक प्रशासन आणि अन्यायाविरुद्ध कठोर भूमिका ही त्यांच्या राज्यकारभाराची वैशिष्ट्ये होती. आजच्या सामाजिक परिस्थितीत ही मूल्ये अधिक महत्त्वाची ठरतात. शिवजयंतीच्या निमित्ताने व्याख्यानमाला, विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा, समाजसेवकांचा सन्मान, शेतकरी मार्गदर्शन व पर्यावरण उपक्रम राबविले तर तोच खरा अभिवादनाचा मार्ग ठरेल. उत्सव साजरा करूया; पण त्याहीपेक्षा शिवमूल्ये अंगीकारू या.

**अरुण कराळे**/९०९६३२६२७२

### संघटित होणे काळाची गरज



आज बहुसंख्य हिंदू असलेल्या आपल्या देशात हिंदू समाज असुरक्षित असल्याचे दर्शवणाऱ्या घटना वारंवार घडताना दिसत आहेत. धार्मिक भावना दुखावण्याचे प्रकार, मंदिरांवरील हल्ले, मंदिरांचे सरकारीकरण, लव्ह जिहाद, भूमी जिहाद, वक्फ बोर्डाचा विळखा, साम्यवादी विचारसरणीचे हल्ले तसेच अर्बन नक्षलवाद यांसारख्या विविध समस्यांना हिंदू समाजाला सामोरे जावे लागत आहे. या सर्व घटनांमुळे समाजात अस्वस्थता आणि असुरक्षिततेची भावना निर्माण होत आहे. याचबरोबर, येणाऱ्या पिढीसमोर भारताचा गौरवशाली इतिहास योग्य स्वरूपात पोहोचू नये, अशी परिस्थिती निर्माण केली जात आहे. एनसीईआरटीसारख्या केंद्रीय पाठ्यपुस्तकात छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, महाराणा प्रताप यासारख्या शूरवीरांना ४ ओळी दिल्या गेल्या आहेत; उलट इस्लामी राज्यकर्त्यांचा पानेच्या पाने भरून इतिहास शिकवला जात आहे. याचा अर्थ असा की, हिंदूंचा आणि प्राचीन भारताचा वैभवशाली इतिहास नव्या पिढीपासून लपवला जात आहे.

## वाचक पत्रे

इतिहास हा केवळ भूतकाळाचा लेखाजोखा नसून तो राष्ट्राच्या आत्मसन्मानाचा पाया असतो. म्हणूनच आज आवश्यकता आहे समाजातील तरुण पिढीत आपल्या संस्कृतीचा, परंपरेचा अभिमान जागृत करण्याची, अन्यायाविरुद्ध कायदेशीर आणि लोकशाही मार्गाने आवाज उठवण्यासाठी संघटित प्रयत्नांची! या पृष्ठभूमीवर हिंदू जनजागृती समिती आयोजित 'हिंदू राष्ट्र जागृती सभा' होत असल्याची माहिती देणारे पत्रक वाचण्यात आले. अशा प्रकारच्या सभांमधून समाजप्रबोधन, आणि संघटनशक्ती निर्माण होण्यास मदत मिळू शकते. आजच्या परिस्थितीत सर्व हिंदूंनी एकत्रितपणे उभे राहणे, सजग राहणे आणि संघटितपणे कार्य करणे ही काळाची गरज आहे. समाजहित, संस्कृतिरक्षण आणि राष्ट्रभक्ती या मूल्यांच्या जपणुकीसाठी होणाऱ्या या सभेस मन:पूर्वक शुभेच्छा!

**डॉ. स्वाती देशमुख**/नागपूर

### जीवन एक रहस्य

लोकांच्या अपेक्षा उंचावणे, तोंडातून निघालेल्या शब्दावर ठाम राहणे, अपयशाने न खचता ध्येय गाठावे, कर्मयोग आणि नि:सीम सेवा करणे, उत्कृष्टतेचा ध्यास असणे, हजरजबाबी असणे, उतारवयात जनमानसात आपुलकी असणे, वाचनाची आवड आणि सहनशीलता या गोष्टी बघताना मोदींसारखा नेता देशाला अखंडपणे लाभावा. खरे तर नवीन पिढीने अशा नेत्यांकडून अनेक गोष्टी शिकण्यासारख्या आहेत.

पुरुषांनी शेफ तर मुलींनी कराटे शिकावे, मोबाईलला स्क्रीन गार्ड घालण्यापेक्षा डोक्याला हेल्मेट घालावे, उपक्रम आणि कार्यपद्धतीच्या माहितीचा बोलबाला करून अपयश पदरात पाडून घेऊ नये. कुणाचाही अपमान व विनयभंग करू नये.

भाव, श्रद्धा आणि अंतःकरणातील शुद्धता ही केव्हाही बाह्य कर्मकांडापेक्षा कल्याणकरी असते. या जगात रक्ताच्या नात्यांशिवाय माणुसकीची नाती जपायला शिकायचे असते त्यासाठी श्रीमंती नसली तरी चालते, पण माणूस म्हणून असावे लागते. आनंदाने एकटे राहायला शिकावे कारण सावलीसुद्धा आपली साथ सोडते तेव्हा मृत्यूसुद्धा एकाकीच असतो. स्वतःला एक चांगला माणूस म्हणून घडवावे कारण एक दिवस जीवनाचा हिशेब संपतोच

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

## रमजान महिन्याची आजपासून सुरुवात; देशभर चंद्रदर्शन

### शहर काझींची अधिकृत घोषणा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ फेब्रुवारी -**

पवित्र रमजान महिन्याची बुधवारपासून सुरुवात झाली असून सोलापूरसह भारतातील विविध भागात चंद्रदर्शन झाल्याची अधिकृत माहिती समोर आली आहे. शहर काझी मुफ्ती सय्यद अमजदअली काझी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे चंद्रदर्शन झाल्याची घोषणा करत गुरुवारी पहिला रोजा सुरू होत असल्याचे जाहीर केले आहे.

रमजान हा इस्लाम धर्मातील अत्यंत पवित्र महिना मानला जातो. या महिन्यात मुस्लिम बांधव रोजा (उपवास) पाळून नमाज, कुरआन पठण, दानधर्म व इबादतीत अधिक वेळ घालवतात. सोलापूर शहरातही रमजानच्या स्वागताची तयारी पूर्ण झाली असून मशिदींमध्ये विशेष नमाज व तरावीह नमाजची व्यवस्था करण्यात आली आहे.

दरम्यान, रमजानच्या निमित्ताने शहरात धार्मिक वातावरण निर्माण झाले असून मुस्लिम बांधवांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

# ए.जी. पाटील पॉलिटेक्निकमध्ये विविध स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ फेब्रुवारी-**

विजापूर रोड सोलापूर येथील ए जी पाटील पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूट मध्ये कार्यरत जागृती महिला विचार मंच अंतर्गत वक्तृत्व स्पर्धा, फॅन्सी ड्रेस व मिमिक्री इत्यादी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

वक्तृत्व स्पर्धा मराठी व इंग्रजी भाषेतून घेण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी जागृती महिला विचार मंच नेहमीच कार्यरत असते. यामध्ये एकूण ४५ विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला होता. कार्यक्रमाची सुरुवात शारदा स्तवनाने करण्यात आली. सिव्हिल इंजिनिअरिंग विभागाच्या प्रा.कल्याणी मामड्याल यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. सर्व लेडीज स्टाफ व विद्यार्थिनी या कार्यक्रमाला उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता जागृती महिला विचार मंच च्या मुख्य समन्वयक स लक्ष्मी बिराजदार व विभागवार समन्वयक सुजाता डोके, करिष्मा शेख, जयश्री सचदेव, ऐश्वर्या सोलंकर व संज्योता मरेड्डी यांचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन कुमारी साक्षी उप्पीन, कुमारी राधिका पुजारी, कुमारी हबीब शेख व कुमार यशदा सोनकांबळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन कुमारी निकिता कणबस हिने मानले. संस्थेचे अध्यक्ष एस. ए. पाटील यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक केले. कार्यक्रम प्रसंगी कॅम्पस डायरेक्टर व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. ए. चौगुले, उपप्राचार्य प्रो. एस. के. मोहिते, शैक्षणिक समन्वयक एस. एन. गवंडी यासह कॉलेजमधील सर्व स्टाफ उपस्थित होते.




**स्पर्धेतील विजेते :**

* **वक्तृत्व स्पर्धा -** १. प्रथम : साक्षी उप्पीन, २. द्वितीय : श्रावणी लंके, ३. उत्तेजनार्थ पारितोषिक : हुमा सय्यद
* **फॅन्सी ड्रेस स्पर्धा -** १. प्रथम : श्रावणी सावंत, २. द्वितीय : प्राची तुरबे, ३. उत्तेजनार्थ : रागिनी बंडगर
* **मिमिक्री स्पर्धा -** १ प्रथम : सायली जाधव, २. द्वितीय : सुदिक्षा जाधव व ग्रुप, ३. उत्तेजनार्थ : नेहा कुलकर्णी व ग्रुप


**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**सूचना**

सूचना क्रमांक SUR/P/GAZ/CMP/KWV/2026 दिनांक 17/02/2026 नुसार, वर नमूद केलेल्या ठिकाणी, जे आधी असेल ते, आवश्यकता पूर्ण होईपर्यंत, मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात करारावर अर्धवेळ कंत्राटी वैद्यकीय व्यवसायी (अंशवेळ सीएमपी) नियुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. उपविभागीय रेल्वे रुग्णालय, कुर्डवाडी, सोलापूर विभाग, मध्य रेल्वे येथे अर्धवेळ कंत्राटी वैद्यकीय व्यवसायी (अंशवेळ सीएमपी) नियुक्तीसाठी अधिसूचना. खुल्या बाजारातील/निवृत्त सरकारी डॉक्टर इच्छुक उमेदवार 25/02/82026 रोजी सकाळी 11:00 वाजता विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालय, कार्मिक शाखा, सोलापूर, 413001 येथे त्यांच्या अर्जासह, मूळ प्रमाणपत्रे/कागदपत्रे, प्रयत्न प्रमाणपत्र आणि संबंधित कागदपत्रांसह मुलाखतीसाठी उपस्थित राहू शकतात. समितीकडून 25/02/2026 रोजी सकाळी 11:00 वाजता वॉक-इन मुलाखत घेतली जाईल.

इच्छुक उमेदवार/निवृत्त व्यक्ती त्यांचे अर्ज आणि संबंधित कागदपत्रे तसेच त्यांचे परीक्षा प्रमाणपत्र srdposur@gmail.com या ईमेल आयडीवर पाठवू शकतात. मुलाखतीला उपस्थित राहण्याचा खर्च उमेदवार स्वतः करतील.

सविस्तर सूचनांसाठी, कृपया वेबसाइटला भेट द्या - www.cr.indianrailways.gov.in टॅब अंतर्गत -> आमच्याबद्दल विभाग -> सोलापूर -> कर्मचारी -> सूचना.
ANJ-17
सुरक्षित प्रवास करा, फूटबोर्डवरून प्रवास करणे टाळा.



**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**अभियांत्रिकी कामे**

भारताच्या राष्ट्रपतींच्यावतीने मध्य रेल्वे, सोलापूरचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम) यांनी खालील कामांसाठी नामांकित कंपन्या / कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवल्या आहेत. 1. निविदा सूचना क्रमांक: 02-2026-SrDENC कामाचे नाव: 1) KWV-MRJ विभागात TRR(P) -32.705 किमी, Sr.DEN(C) विभागात KWV-LUR विभागात 15 किमी आणि सोलापूर विभागात TFR 39.8 किमी. 2) भिगवण स्थानकावर बॅलास्ट साइडिंगचा विस्तार आणि Sr.DEN(C) विभागात कवठेमहांकाळ स्थानकावर नवीन बॅलास्ट साइडिंगची निर्मिती कामाची अंदाजे किंमत: रु. 5,85,95,067.17 बयाणा रक्कम रु. 4,43,000.00 काम पूर्ण करण्याचा कालावधी: 18 महिने देखभाल कालावधी: निविदा सूचना क्रमांक: 03-2026-SrDENC कामाचे नाव: दरमहा 1500 किमी अंतरासाठी पी वे मटेरियलच्या वाहतुकीसाठी 10 मेट्रिक टन क्षमतेचे ट्रक भाड्याने घेणे 1) एसएसई/पी.वे/जेएच आणि KWV(EZ) DEN/KWV(BG) अंतर्गत, 2) SSE/P.way/LUR & BTWDEN/LUR अंतर्गत आणि 3) SSE/P.way/PVR & MRJ अंतर्गत ADEN/PVR अंतर्गत 2 वर्षांच्या कालावधीसाठी सोलापूर विभागात सीनियर डीईएन/सी/एसयूआर विभाग अंतर्गत (2 वर्षांच्या कालावधीसाठी 10 मेट्रिक टन क्षमतेचे एकूण 06 ट्रक). कामाची अंदाजे किंमत: 1,47,21,237.51 बकाया रक्कम: रु. 2,23,600.00 काम पूर्ण करण्याचा कालावधी: 24 महिने देखभाल कालावधी: शून्य www.ireps.gov.in वेबसाइटवर कोट केलेल्या निविदा अपलोड करण्याची शेवटची तारीख आणि वेळ: 11/03/2026 दुपारी 3:00 वाजेपर्यंत www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ: 11/03/2026 दुपारी 3:30 वाजेपर्यंत संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइटला सतत भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे जेणेकरून या निविदेत कोणतेही बदल/शुद्धीपत्रक जारी केले आहे ते लक्षात येईल. वेबसाइट: www.ireps.gov.in.
ANJ-16
सुरक्षित प्रवास करा, फूटबोर्डवरून प्रवास करणे टाळा.



**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**अभियांत्रिकी कामे**

भारताच्या राष्ट्रपतींच्यावतीने मध्य रेल्वे, सोलापूरचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम), खालील कामांसाठी नामांकित कंपन्या / कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवत आहेत. 1. निविदा सूचना क्रमांक: 03-2026-SrDENS कामाचे नाव: 1. KWV-MRJ विभागात LC 22,24,31,49 वरील संपर्क रस्त्याची सुधारणा आणि KWV-MRJ विभागात LC 70 वर मानक उंची गेजची तरतूद 2. SUR-WD विभागात LC 61,74,82,91,3 वरील संपर्क रस्त्याची सुधारणा आणि SUR-WD विभागात LC 82, 91 आणि 3 वर मानक उंची गेजची तरतूद 3. Sr.DEN(S) विभागात रस्ते वापरकर्त्यांच्या सुरक्षिततेसाठी गेट लॉज आणि इतर विविध कामांमध्ये सुधारणा. कामाची अंदाजे किंमत: रु. 1,12,61,658.40 बयाणा रक्कम: रु. 2,06,300.00 काम पूर्ण करण्याचा कालावधी: 6 महिने देखभाल कालावधी: 12 महिने निविदा सूचना क्रमांक: 04-2026-एसआरडीईएनएस कामाचे नाव: एडीईएन/केएलबीजी उपविभागाच्या एमआर-एसडीबी विभागादरम्यान किमी 587/900-589/460=1560 मीटर (वरच्या बाजूने) पासून रिटेनिंग वॉल आणि साइड ड्रेनचे बांधकाम कामाची अंदाजे किंमत: रु. 3,87,66,722.43 बयाणा रक्कम: रु. 3,43,800.00 काम पूर्ण करण्याचा कालावधी: 12 महिने देखभाल कालावधी: 6 महिने www.ireps.gov.in वेबसाइटवर कोट केलेल्या निविदा अपलोड करण्याची शेवटची तारीख आणि वेळ: 09/03/2026 दुपारी 3:00 वाजेपर्यंत www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ: 09/03/2026 दुपारी 3:30 वाजेपर्यंत संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइटला सतत भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे जेणेकरून या निविदेत कोणतेही बदल/शुद्धीपत्रक जारी केले आहे ते लक्षात घेता येईल. वेबसाइट: www.ireps.gov.in.
ANJ-15
सुरक्षित प्रवास करा, फूटबोर्डवरून प्रवास करणे टाळा.


## जाहीर नोटीस

### खरेदीखत दस्त हरविल्याबाबतचे

तमाम लोकांस विशेषतः जिल्हा सोलापूर व माढा तालुक्यातील व आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर प्रसिध्दीकरणाद्वारे कळविण्यात येते की, अमीर शब्बीर मुजावर यांच्याकडून डि. सोलापूर सब. डि. व ता. माढा पैकी मौजे - टेंभूर्णी येथील गट नं. १०४९/३ब मधील क्षेत्रफळ ८१ आर. यापैकी ०६ आर. याबाबतचे श्री. सोमनाथ ढगे व सुदाम गोसावी यांच्यामध्ये झालेले रजिस्टर खरेदीखत मडस दस्त नं. ५३३५/२०१२ आणि सदर खरेदीखताचे इंडेक्स २ व आर.आर. पावती हे अनावधानाने सोलापूर येथील एम.आय.डी.सी. भागात दि. ०१/०२/२०२६ रोजी गहाळ होऊन हरविलेले आहे, त्याबाबत त्यांनी ऑनलाईन सोलापूर पोलिस स्टेशन येथे दि. १८/०२/२०२६ रोजी तक्रार अर्ज दिलेला आहे.

अमीर शब्बीर मुजावर यांना सदर जागा कर्ज प्रकरण करुन बँकेकडे तारण ठेवण्याकरीता खरेदी दस्त नं. ५३३५/२०१२ आवश्यक आहे. परंतु, सदर खरेदीखत हरविल्याने यदाकदाचित कोणास मिळाल्यास खालील दिलेल्या पत्त्यावर संपर्क साधून आणुन द्यावे अथवा आमचे अशिल मुळ खरेदी दस्त ऐवजी दुय्यम प्रत आधारे कर्ज प्रकरण करतील. यदाकदाचित याबाबत कोणाचीही काही हरकत अथवा सदर मिळकतीबाबत हक्क, हितसंबंध, गहाण, टाच, बोजा अशाप्रकारे हितसंबंध असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर प्रत्यक्ष भेटून कागदोपत्री पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. अन्यथा, मुदतीनंतर आमचे अशिल कोणाचीही कसलीही हरकत नाही, असे गृहीत धरुन सदरील मिळकत बँकेकडे तारण ठेवतील. नंतर कोणाचीही कसलीही हरकत आल्यास आमचे अशिलांच्या व बँकेच्या हक्कावर व अधिकारावर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. दि. १९/०२/२०२६

**अशिलातर्फे**
**सही/-**
**ॲड. श्री. संतोष गोपीनाथ गायकवाड**
**बी.ए., एल.एल.बी.**
**उपळाई रोड, चव्हाण प्लॉट,**
**बार्शी, ता. बार्शी जि. सोलापूर**
**मो. नं. ९८५०५८७७१५**

## जाहीर नोटीस

जन्म-मृत्यु प्रकरण
अर्ज क्र. २८/२०२५

### मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात

**१. राजश्री केशव लाखण** - **अर्जदार**
रा. कसबा पेठ, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील विजय न. कुलकर्णी)
विरुध्द
**२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी**
**तथा मुख्याधिकारी न.प. बार्शी** - **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, स्वतः अर्जदार रा. कसबा पेठ, बार्शी, ता. बार्शी यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी याठिकाणी दिनांक ०४ ऑगस्ट १९६९ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ०४ ऑगस्ट १९६९ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी याठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १७/०२/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

शिक्का

**सही/-**
**(एफ.आर. शेख)**
**तहसिलदार, बार्शी**

## जाहीर समन्स

### मा. उपनिबंधक, सहकारी संस्था (परसेवा)

**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर**
**११३ (अ), सिध्देश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया ट्रेझरी, शाखेशेजारी, सोलापूर-०१**

**व्यापारी सहकारी बँक लि. मर्यादित, सोलापूर** - **अर्जदार**
**विरुद्ध**
खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद - **जाब देणार**

| अ. क्र. | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार | जाब देणार यांचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ९३४/२०२५-२६ | ५,०७,०७७/- | १<br>२<br>३ | **शीतल मिलिंद महिमाने** रा. ७२४, रेणुका नगर, जुळे सोलापूर,<br>**राजशेखर लक्ष्मण नाटीकर** रा. बी.२९७, रेणुका नगर, जुळे सोलापूर<br>**आमसिध्द काशाप्पा खानापुरे** रा. २०५, चंद्रोदय नगर, विनायक नगर, सोलापूर |
| २ | ९३३/२०२५-२६ | ५,२१,८४७/- | १<br>३ | **शीतल मिलिंद महिमाने** रा. ७२४, रेणुका नगर, जुळे सोलापूर,<br>**आमसिध्द काशाप्पा खानापुरे** रा. २०५, चंद्रोदय नगर, विनायक नगर, सोलापूर |

या कामी अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमूद केलेल्या जाब देणार यांनी दिलेला पत्ता उपलब्ध होत नसल्याने सदर जाहीर समन्स देत आहोत.

**उपनिर्दिष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडणेसाठी स्वतः जातीने वार मंगळवार, दिनांक :- १०/०३/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.**

या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व निर्णय देण्यात येईल. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पुर्वी आपला संपुर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. १८/०२/२०२६ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

शिक्का

**सही/-**
**उपनिबंधक**
**सहकारी संस्था (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर**


**महापारेषण**
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

**सूचना**

सुशिक्षित बेरोजगार अभियंता (स्था) यांना लॉटरी पद्धतीने कामे वाटपाची योजना महापारेषण कंपनीचे परिपत्रक MSETCL/CO/TRO&M/SE-II/EE-VIII/12883 Dt. 05.12.2016 अन्वये लागू केली आहे. सदर परिपत्रकाला अनुसरून अधीक्षक अभियंता (स्था), अउदा, स्था.बां.नि.सु. मंडळ, महापारेषण पुणे या कार्यालयाने सुशिक्षित बेरोजगार अभियंता (स्था) यांची नोंदणी व नूतनीकरण सुरु आहे. सदरील ई–प्रकटन हे दिनांक १९.०२.२०२६ रोजी प्रसिद्धीस देण्यात येत असून प्रसिद्धीच्या दिनांकापासून २७.०२.२०२६ पर्यंत कंपनीच्या संकेतस्थळावर तसेच स्थापत्य कार्यालयाच्या सूचनाफलकावर प्रसिद्धीसाठी उपलब्ध असेल. योजनेमध्ये भाग घेऊ इच्छिणाऱ्या सुशिक्षित बेरोजगार (स्था) यांनी नमूद केलेल्या कागदपत्रासोबत नोंदणी मागणीचा अर्ज अंतिम दिनांक २७.०२.२०२६ पर्यंत अथवा त्यापूर्वी या कार्यालयात प्रत्यक्ष जमा करावा.

For further details visit our website **http://mahatransco.in**

**सही/–**
**अधीक्षक अभियंता (स्था), (प्र)**
**अउदा स्था.बां.नि.सु. मंडळ, पुणे**


## जाहीर नोटीस

जन्म-मृत्यु प्रकरण
अर्ज क्र. १३६/२०२५

### मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात

**१. इंदूबाई शामराव काळे** - **अर्जदार**
रा. मातोश्री निवास साई नगर, अंबेगाव बुद्रुक, पुणे
(असल्यास, तर्फे वकील विजय न. कुलकर्णी)
विरुध्द
**२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी**
**तथा मुख्याधिकारी न.प. बार्शी** - **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराचे पती शामराव जंगलु काळे, रा. मातोश्री निवास साई नगर, अंबेगाव बुद्रुक पुणे यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी याठिकाणी दिनांक १८ जुलै २०२३ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराचं पती शामराव जंगलु काळे यांचा दिनांक १८ जुलै २०२३ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी याठिकाणी मृत्यू झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १७/०२/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

शिक्का

**सही/-**
**(एफ.आर. शेख)**
**तहसिलदार, बार्शी**

## जाहीर नोटीस

बार्शी तालुका व विशेषतः मौजे श्रीपतपिंपरी येथील तमाम लोकांना आमचे अशिल लता पंडित पाटील, रा. खांडवी, ता. बार्शी यांनी दिलेल्या कागदपत्रावरून सांगितलेवरून जाहीर नोटीस देण्यात येते की, डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी, मौजे श्रीपतपिंपरी येथील जमीन गट नं १७४ व मौजे खांडवी येथील घर जागा या दोन्ही मिळकती आमचे अशिल यांचे दोन मुलींचे वडिलोपार्जित एकत्र हिंदू कुटुंबाचे मिळकती असून यामध्ये आमचे अशिल यांचे मुलींचा हक्क. हिस्सा होता व आहे. परंतु आमचे अशिल यांचे पती नामे पंडित कोंडीबा पाटील हे सदर दोन्ही मिळकतीचे अद्याप कोणतेही प्रकारे वाटप न झालेचा गैरफायदा घेऊन, पोकळ दप्तरी नाव असलेने दारूचे नशेच्या आहारी जाऊन लोकांचे फूस लावण्यावरून सदर वर नमूद मिळकती विक्री करण्याचे खात्रीलायकरित्या आमचे अशिल यांना समजले आहे. तरी सदर मिळकती मध्ये आमचे अशिल यांचा मुलींचा हक्क हिस्सा होता व आहे. तरी सदर मिळकती संदर्भात कोणीही गहाण, दान, लीन, खरेदीखत, साठेखत, लिलाव, बक्षीसपत्र इ. तत्सम पद्धतीचे व्यवहार करू नयेत, केलेस ते आमचे अशिलाचे मुलींचे वर नमूद मिळकती मधील कायदेशीर हक्क हिस्स्यावर बंधनकारक राहणार नाहीत. याउपरही कोणी व्यवहार केलेस घेणार देणार यांचे विरुद्ध आमचे अशिल अलहिदा वेगळी कारवाई करतील याची नोंद घ्यावी. सबब कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून हि खरेदीपूर्व जाहीर नोटिस दिली असे. ता. १६/०२/२०२६.

**सही/-**
**ॲड. रुपाली डी. तारके**
**बी.एसस्सी., एलएल.एम.**
**बार्शी. मो. ८६६९१३३१३२**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

## जाहीर नोटीस

जन्म-मृत्यु प्रकरण
अर्ज क्र. ३१/२०२५

### मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात

**१. सर्जेराव बाबू जाधव** - **अर्जदार**
रा. १५५० सुभाष नगर, बार्शी, ता. बार्शी
(असल्यास, तर्फे वकील विजय न. कुलकर्णी)
विरुध्द
**२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी**
**तथा मुख्याधिकारी न.प. बार्शी** - **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराची मुलगी सुनिता सर्जेराव जाधव, रा. १५५० सुभाष नगर, बार्शी ता. बार्शी यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी याठिकाणी दिनांक ११ ऑगस्ट १९८४ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराची मुलगी सुनिता सर्जेराव जाधव यांचा दिनांक ११ ऑगस्ट १९८४ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी याठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहुन दयावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १७/०२/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

शिक्का

**सही/-**
**(एफ.आर. शेख)**
**तहसिलदार, बार्शी**

## जाहीर नोटीस

जन्म-मृत्यु प्रकरण
अर्ज क्र. ५१/२०२५

### मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात

**१. प्रतिक्षा रावसाहेब नवले** - **अर्जदार**
रा. तडवळे, ता. बार्शी, जि.सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील विजय न. कुलकर्णी)
विरुध्द
**२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी** - **गैरअर्जदार**
**तथा ग्रामसेवक ग्रा.प. लाडोळे**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, स्वतः अर्जदार, रा. तडवळे ता. बार्शी, जि. सोलापूर यांचा मौजे लाडोळे, ता. बार्शी राहत्या घरी याठिकाणी दिनांक १९ सप्टेंबर २००४ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक १९ सप्टेंबर २००४ रोजी मौजे लाडोळे ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १७/०२/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

शिक्का

**सही/-**
**(एफ.आर. शेख)**
**तहसिलदार, बार्शी**

## जाहीर नोटीस

जन्म-मृत्यु प्रकरण
अर्ज क्र. १८७/२०२५

### मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात

**१. नौशादबी अब्दुल काझी** - **अर्जदार**
रा. ३८६८/४ भवानी पेठ, बार्शी, ता. बार्शी
(असल्यास, तर्फे वकील विजय न. कुलकर्णी)
विरुध्द
**२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी** - **गैरअर्जदार**
**तभा मुख्याधिकारी न.प. बार्शी**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, स्वतः अर्जदार, रा. ३८६८/४ भवानी पेठ, बार्शी, ता. बार्शी यांचा मौजे बार्शी स्काकने क्षेत्र ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी याठिकाणी दिनांक ०१ जुन १९६५ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ०१ जुन १९६५ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी याठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १७/०२/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

शिक्का

**सही/-**
**(एफ.आर. शेख)**
**तहसिलदार, बार्शी**

## सोलापूर जनता सहकारी बँक लि.

SJSB Multi-State Scheduled Coop.Bank
**मल्टी स्टेट शेड्युल्ड को.ऑप बँक**
'गगनभरारी' शिवस्मारक संकुल, गोल्डफिंच पेठ, सोलापूर - ४१३००७
फोन क्र.: 0217- 274 1101 ते 05 ई-मेल : info@sjsbbank.com वेबसाईट : www.sjsbbank.com

### जाहीर ताबा नोटीस

### नियम ८(१)

**(दि सेक्युरिटायझेशन रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस इन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ अन्वये)**

तमाम लोकांस, कर्जदार, गहाणकार व जामीनदार यांना सदर जाहीर ताबा नोटीसीने कळविण्यात येते की, ज्या अर्थी **सोलापूर जनता सहकारी बँक लि.** मुख्य कार्यालय, सोलापूर या संस्थेचे अधिकारी यांना उक्त अध्यादेशाच्या कलम १३(१२) अन्वये प्राप्त झालेल्या प्राधिकृत अधिकारी या अधिकारानुसार मी उपरोक्त कायद्याचे कलम १३(२) अन्वये **दि.३०/१२/२०२४** रोजी **कर्जदार/गहाणकार क्षीरसागर ट्रेडर्स प्रोप्रा.श्री.नागनाथ दत्तात्रय क्षीरसागर, पत्ता.- कलाल वस्ती, सोलापूर पुणे हायवे, मोहोळ जि.सोलापूर. जामीनदार - १) श्री.यशवंत बजरंग गुंड २) श्री.सोमेश नागनाथ क्षीरसागर ३) श्री.सुशीलकुमार नागनाथ क्षीरसागर**

यांना मागणी नोटीस पाठवून उउक कर्ज रक्कम **रु.३,१५,४८,७९५=६५** व मुदत कर्ज रक्कम रु.९२,१४,५९९=४४ असे **एकूण रक्कम रु.४,०७,६३,३९५=०९ (अक्षरी रुपये चार कोटी सात लाख त्रेसष्ट हजार तीनशे पंच्याण्णव पैसे नऊ मात्र) आणि दि.०१/१२/२०२४** पासूनचे देय असलेले पुढील व्याज व इतर खर्च अशी संपूर्ण रक्कम नोटीस मिळाल्या पासून ६० (साठ) दिवसाच्या आत भरणा करण्याचे कळविले होते. परंतु नोटीस मिळूनही सदर उपरोक्त कर्जदार / गहाणकार व जामीनदार यांनी उपरोक्त रक्कम आमच्याकडे भरण्यास कसूर केलेली आहे. त्या अर्थी सदर कर्जदार, गहाणकार व जामीनदार यांना कळविण्यात येते की, खालील सही करणार यांनी खालील परिशिष्ठात नमूद केलेल्या स्थावर मिळकतीचा **दि. १६/०२/२०२६** रोजी दि सेक्युरिटायझेशन रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस इन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ चे कलम १३(४) नियम ९ अन्वये **प्रतिकात्मक ताबा घेतलेला आहे.**

सबब उपरोक्त कर्जदार / गहाणकार / जामीनदार आणि तमाम लोकांना कळविण्यात येते की, खालील परिशिष्ठात नमूद केलेल्या मिळकती बाबत कोणीही कोणाशीही कोणत्याही प्रकारे हस्तांतर, विल्हेवाट, गहाण, विक्री, बोजा, तारण वाटणी, वहिवाट, बक्षिस अथवा अन्य कोणत्याही प्रकारे हस्तांतर करार करू नये. या उपरही तसा व्यवहार अथवा करार केल्यास तो बेकायदेशीर आहे, असे ठरवून आमच्या बँकेवर अथवा सदर मिळकतीवर सदर व्यवहार अथवा करार कायद्याने बंधनकारक राहणार नाही. याची नोंद उपरोक्त कर्जदार/ गहाणकार / जामीनदार व तमाम लोकांनी घ्यावी.

*** परिशिष्ट ***

**तारण स्थावर मालमत्ता वर्णन**

१) जामीनदार श्री.सोमेश नागनाथ क्षीरसागर व श्री.सुशीलकुमार नागनाथ क्षीरसागर यांचे मालकीची जिल्हा सोलापूर, ता.मोहोळ पैकी मोहोळ येथील गट नं.७२८, ० हे. ०३ आर, अन्नपूर्णा कॉम्प्लेक्स मधील दुकान क्र.१ ते ५ याचे क्षेत्र १००० चौ.फुट व शॉप क्र.६ ते ११ याचे क्षेत्र १५०० चौ.फुट यावर सध्या असलेले व भविष्यात होणाऱ्या बांधकामासह याची चतुःसीमा पुढीलप्रमाणे - **पूर्वेस** - गट नं.७२९, **पश्चिमेस** - रोड, **दक्षिणेस** - गट नं.७२९, **उत्तरेस** - गट नं.७३०

२) जामीनदार श्री.सोमेश नागनाथ क्षीरसागर व श्री.सुशीलकुमार नागनाथ क्षीरसागर यांचे मालकीची जिल्हा सोलापूर, ता.माढा पैकी टेंभूर्णी येथील गट नं.१/२/अ/१/क, सि.स.नं.९६२/२, याचे क्षेत्र ९२०.८० चौ.मी. फुट यावर सध्या असलेले व भविष्यात होणाऱ्या बांधकामासह याची चतुः सीमा पुढील प्रमाणे - **पूर्वेस** - ग.नं.१/२/अ/१/क पैकी विष्णू हुंबे यांची मिळकत, **दक्षिणेस** - ग.नं.१०३/२/३,**पश्चिमेस** - ग.नं.१/२/अ/१/ब **उत्तरेस** - गट नं.७३०

**दिनांक : २०/०२/२०२६**
**ठिकाण : सोलापूर**

शिक्का

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**सोलापूर जनता सहकारी बँक लि.**
**(मल्टीस्टेट शेड्युल्ड को.ऑप.बँक)**

## बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra

**प्रधान कार्यालय/ Head Office**
**लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5**
**आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur**
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal_sol@mahabank.co.in

### मागणी सूचना

खालील कर्जदारांनी आमच्या शाखेतून कर्ज घेतले होते ज्यासाठी त्यांनी विविध कागदपत्रे पूर्ण केली होती. त्यांनी आमच्या बँकेच्या नावे सुरक्षा व्याज तयार करून मालमत्ता गहाण ठेवल्या आहेत. कर्जदारांनी मुद्दल, व्याज इत्यादी हप्ते भरण्यात कसूर केली आहे आणि ०३/०२/२०२६ रोजी खाते एनपीए झाले आहे. सिक्युरिटायझेशन अँड रीस्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत मागणी सूचना खालील कर्जदारांना ६० दिवसांच्या आत रक्कम भरण्यासाठी पाठवण्यात आली आहे आणि म्हणूनच या प्रकाशनाद्वारे कर्जदारांना खाली तपशीलवार देय रक्कम भरण्याची अंतिम मागणी करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्जदाराचे / जामीनदारांचे नाव - साखरपेठ शाखा | सूचना तारीख आणि दाव्याची रक्कम | सुरक्षित मालमत्तेचा तपशील | कर्जाचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| 1 | **कर्जदार :-** **एम/एस. एस आर पवार** **प्रो.प्रा. श्री.दत्तात्रय राजेंद्र पवार** राहण्याचा पत्ता: मारुती मंदिरजवळ, ५५४ पाथरुट चौक उत्तर सोलापूर, सोलापूर ४१३००५ युनिट पत्ता: १०३८९-ए/३/३५ घर नं. ८७८ पाच्छा पेठ सोलापूर | ०५/०२/२०२६ आणि रु. १४,३२,८०२.०० /- (रुपये चौदा लाख बत्तीस हजार आठशे दोन फक्त) | मेसर्स एस आर पवार यांच्याकडे फर्निचर आणि फिक्स्चरचे गहाणखत प्रो.प्रा. श्री दत्तात्रय राजेंद्र पवार | मुदत कर्ज रु. ५.००/- लाख खाते क्रमांक ६०५२२३०९९२७ |

वरील कर्जदारांना येथे सूचना देण्यात येते की, अधिकृत अधिकारी डठऋएडख कायदा, २००२ च्या तरतुदींनुसार गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा / सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेतील आणि त्यानंतर लिलाव करतील आणि बँकेकडे उपलब्ध असलेल्या इतर कायदेशीर कारवाई सुरू करतील, जर सूचनेपासून ६० दिवसांच्या आत बँकेच्या समाधानानुसार वरील देयके भरली गेली नाहीत तर तुम्हाला कोणताही आधार मिळणार नाही. कलम १३(१३) अंतर्गत तुम्हाला विक्री, भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे सुरक्षित मालमत्तेचे हस्तांतरण करण्यास देखील मनाई आहे.

कर्जदारांचे लक्ष वेधले जाते की उपलब्ध वेळेनुसार, सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदीकडे आकर्षित व्हावे.

**दिनांक - ०५/०२/२०२६**
**ठिकाण - सोलापूर**

**सही/-**
**मुख्य व्यवस्थापक आणि अधिकृत अधिकारी**
**साखर पेठ शाखा, बँक ऑफ महाराष्ट्र**

## बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra

**प्रधान कार्यालय/ Head Office**
**लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5**
**आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur**
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal_sol@mahabank.co.in

### मागणी सूचना

खालील कर्जदारांनी आमच्या शाखेतून कर्ज घेतले होते ज्यासाठी त्यांनी विविध कागदपत्रे पूर्ण केली होती. त्यांनी आमच्या बँकेच्या नावे सुरक्षा व्याज तयार करून मालमत्ता गहाण ठेवल्या आहेत. कर्जदारांनी मुद्दल, व्याज इत्यादी हप्ते भरण्यात कसूर केली आहे आणि ०३/०२/२०२६ रोजी खाते एनपीए झाले आहे. सिक्युरिटायझेशन अँड रीस्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत मागणी सूचना खालील कर्जदारांना ६० दिवसांच्या आत रक्कम भरण्यासाठी पाठवण्यात आली आहे आणि म्हणूनच या प्रकाशनाद्वारे कर्जदारांना खाली तपशीलवार देय रक्कम भरण्याची अंतिम मागणी करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्जदाराचे / जामीनदारांचे नाव - साखरपेठ शाखा | सूचना तारीख आणि दाव्याची रक्कम | सुरक्षित मालमत्तेचा तपशील | कर्जाचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| 1 | **कर्जदार :-** **दत्तात्रय राजेंद्र पवार** पत्ता : मारुती मंदिरजवळ, ५५४ पाथरुट चौक, उत्तर सोलापूर, सोलापूर ४१३००५ | ०५/०२/२०२६ आणि रु.३०,३८,२२५.००/- (रुपये तीस लाख अडोतीस हजार दोनशे पंचवीस फक्त) | उत्तर सोलापूर, जिल्हा सोलापूर, महाराष्ट्र येथील न्यू पाच्छा पेठ येथील श्रीवत्स हाइट्स सीटीएस क्रमांक १०३८८ या फ्लॅट क्रमांक ४०२ च्या चौथ्या मजल्यावरील नोंदणीकृत गहाणखत. | गृहकर्ज रु. २९.७० लाख खाते क्रमांक ६०५०८३८४१८६ |

वरील कर्जदारांना येथे सूचना देण्यात येते की, अधिकृत अधिकारी डठऋएडख कायदा, २००२ च्या तरतुदींनुसार गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा / सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेतील आणि त्यानंतर लिलाव करतील आणि बँकेकडे उपलब्ध असलेल्या इतर कायदेशीर कारवाई सुरू करतील, जर सूचनेपासून ६० दिवसांच्या आत बँकेच्या समाधानानुसार वरील देयके भरली गेली नाहीत तर तुम्हाला कोणताही आधार मिळणार नाही. कलम १३(१३) अंतर्गत तुम्हाला विक्री, भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे सुरक्षित मालमत्तेचे हस्तांतरण करण्यास देखील मनाई आहे.

कर्जदारांचे लक्ष वेधले जाते की उपलब्ध वेळेनुसार, सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदीकडे आकर्षित व्हावे.

**दिनांक - ०५/०२/२०२६**
**ठिकाण - सोलापूर**

**सही/-**
**मुख्य व्यवस्थापक आणि अधिकृत अधिकारी**
**साखर पेठ शाखा, बँक ऑफ महाराष्ट्र**

# टी-२० विश्वचषकाचा थरार





## महत्त्वाचे

### श्रीलंकेच्या संघात जखमी पाथिरानाच्या जागी मदुशंका

**दुबई** : आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या तांत्रिक समितीने बुधवारी श्रीलंकेच्या संघात मथेशा पाथिरानाच्या जागी दिलशान मदुशंकाचा समावेश करण्यास मान्यता दिली. सोमवारी (१६ फेब्रुवारी) ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या गत सामन्यात डाव्या पायाच्या स्नायूंना ताण आल्याने पाथिरानाला बाहेर काढण्यात आले तेव्हा मदुशंकाची बदली खेळाडू म्हणून निवड करण्यात आली. कॅण्डी येथे झालेल्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या सामन्यात श्रीलंकेच्या पाथिरानाच्या डाव्या पायाच्या स्नायूंना दुखापत झाली आणि पहिल्या स्पेलमध्ये केवळ चार चेंडू टाकल्यानंतर तो लगेचच मैदानाबाहेर गेला. त्याने आपला षटक मध्यभागी सोडला आणि डावात गोलंदाजी करण्यास परतला नाही, तर दासुन शनाकाने उर्वरित षटक पूर्ण केले. ■

### आशियाई क्रॉस-कंट्री स्पर्धेसाठी १२ सदस्यीय भारतीय संघाची घोषणा

**नवी दिल्ली** : जपानमधील फुकुओका येथे २१ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या १८ व्या आशियाई क्रॉस-कंट्री स्पर्धेत भाग घेणाऱ्या १२ सदस्यीय भारतीय संघात सेनादलाच्या हरमनजोत सिंगचा समावेश असेल. भारतीय संघ बुधवारी जपानला रवाना होईल, असे भारतीय ॲथ्लेटिक्स महासंघाचे अध्यक्ष बहादूर सिंग सागू यांनी सांगितले. भारतीय खेळाडू वरिष्ठ पुरुष, महिला आणि २० वर्षांखालील गटात भाग घेतील. हरमनजोत सिंग पुरुषांच्या १० किमीमध्ये भाग घेतील. आदित्य गुर्जर, अभिनंदन सूर्यवंशी आणि करण रमेश सरनाडे पुरुषांच्या २० वर्षांखालील गटात भारताचे प्रतिनिधित्व करतील. पुरुषांच्या २० वर्षांखालील गटाचे अंतर ८ किमी आहे. महिलांच्या १० किमी संघातील सदस्य नंदनी गुप्ता, उजाला, सोनिया आणि मुन्नी देवी आहेत. महिलांच्या २० वर्षांखालील गटात वर्षा, मनी यादव, सोनम कुमारी आणि आरजू भाग घेतील. एएफआयने गत महिन्यात झारखंडमधील रांची येथे झालेल्या ६० व्या राष्ट्रीय क्रॉस-कंट्री स्पर्धेतील खेळाडूंच्या कामगिरीच्या आधारे राष्ट्रीय संघाची निवड केली, यात ३५ संलग्न राज्य संघांनी भाग घेतला होता. रेल्वे क्रीडा प्रोत्साहन मंडळाच्या (आरएसपीबी) खेळाडूंनी राष्ट्रीय क्रॉस कंट्री चॅम्पियनशिपमध्ये वरिष्ठ पुरुष आणि महिला संघाचे विजेतेपद पटकावले होते.

### आज स्वप्न पूर्ण झाले : मन्हास

**नवी दिल्ली** : आज स्वप्न पूर्ण झाले, अशा शब्दांत आनंद व्यक्त करताना बीसीसीआयचे विद्यमान अध्यक्ष मिथुन मन्हास थोडे भावूक झाले. बुधवारी जम्मू-काश्मीरने बंगालवर ६ गड्यांनी मात करून प्रथमच रणजी करंडकाच्या अंतिम फेरीत धडक मारली. २०२१ मध्ये, जेव्हा बीसीसीआयचे विद्यमान अध्यक्ष मिथुन मन्हास संकटग्रस्त जम्मू-काश्मीर क्रिकेट संघटनेचे (जेकेसीए) प्रशासक झाले, तेव्हा त्यांना गैरव्यवस्थापन व भ्रष्टाचाराच्या आरोपांना तोंड देणाऱ्या संस्थेत अनेक गोष्टींमध्ये सुधारणा कराव्या लागल्या. मी प्रशासक म्हणून पदभार स्वीकारला तेव्हा ते फार सोपे नव्हते. तत्कालीन बीसीसीआय सचिव जय शाह यांनी मला मोकळीक दिली आणि जम्मू आणि काश्मीर क्रिकेटला पुन्हा रुळावर आणण्यासाठी जे काही आवश्यक आहे ते करायला सांगितले. मी ब्रिगेडियर अनिल गुप्ता यांची मदत घेतली व त्यांनी प्रशंसनीय काम केले आहे. आम्ही प्रतिभा शोध स्पर्धा आयोजित केली. त्यांनी त्या काळात जम्मू-काश्मीर क्रिकेट प्रशासनाची देखरेख केली होती. डावखुरा वेगवान गोलंदाज सुनील कुमारने खेळाडू घडविण्यात मोठी भूमिका बजावली. जम्मू-काश्मीर संघाला सर्वोत्तम खेळाडूंशी स्पर्धा करण्यास मदत करण्यासाठी खेळण्याच्या परिस्थिती निर्माण केल्या. त्यामुळे प्रतिभावान खेळाडू मिळाले व त्याचाच हा परिणाम आहे, असे ते म्हणाले. दिल्लीचे दिग्गज मनहास यांनी १५७ प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये ९७१४ धावा केल्या आहेत.

### अल्काराझ दुसऱ्या फेरीत

**दोहा** : ऑस्ट्रेलियन ओपनच्या यशानंतर स्पेनचा युवा टेनिसपटू कार्लोस अल्काराझने दोहा येथे झालेल्या पहिल्या फेरीत आर्थर रिंडरक्नेचला ६-४, ७-६ (७/५) असे हरवून विजयी पुनरागमन केले. मेलबर्नमध्ये विजय मिळवून कारकिर्दीतील ग्रँडस्लॅम पूर्ण करणारा सर्वात तरुण खेळाडू ठरलेल्या अल्काराझने ३० व्या क्रमांकाच्या रिंडरक्नेचला दोन चुरशीच्या सेटमध्ये पराभूत केले. हे खरोखर कठीण होते. आर्थर खरोखरच धोकादायक खेळाडू आहे. पहिल्या फेरीत कोणीही त्याच्याविरुद्ध खेळू इच्छित नाही, असे अल्काराझ म्हणाला. जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकाचा खेळाडू दुसऱ्या फेरीत दुसऱ्या फ्रेंच खेळाडूशी, ६० व्या क्रमांकाच्या व्हॅलेंटाईन रॉयरशी सामना करेल. अल्काराझचा मुख्य प्रतिस्पर्धी जॅनिक सिनर ड्रॉच्या दुसऱ्या बाजूला आहे. मे २०२४ मध्ये माद्रिदमध्ये आंद्रे रुबलेव्हने ट्रॉफी जिंकल्यापासून अल्काराझ किंवा सिनर व्यतिरिक्त इतर कोणत्याही खेळाडूने टूर-लेव्हल जेतेपद जिंकलेले नाही. ■

# दक्षिण आफ्रिका सुपर एटमध्ये

### ड गटात चारही सामने जिंकले

◆ **नवी दिल्ली, १८ फेब्रुवारी**

आयसीसी पुरुष टी-२० क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत बुधवारी येथे दक्षिण आफ्रिका संघाने संयुक्त अरब अमिरातवर (यूएई) ४० चेंडू शिल्लक असताना ६ गड्यांनी विक्रमी विजय नोंदविला. दक्षिण आफ्रिकेने चारपैकी चारही सामने जिंकत ८ गुणांसह ड गटात अव्वल स्थान पटकावले व अपराजित राहून सुपर एटमध्ये प्रवेश केला.

संयुक्त अरब अमिरातने २० षटकांत ६ बाद १२२ धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेने विजयासाठी आवश्यक १२३ धावा १३.२ षटकांत काढल्या आणि आपला विजय साकार केला. १२ धावांत ३ बळी टिपणारा दक्षिण आफ्रिकेचा मध्यम वेगवान गोलंदाज कॉर्बिन बॉश सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.

दक्षिण आफ्रिकेने मार्को जानसेन, केशव महाराज व लुंगी नगिदीला विश्रांती दिली होती. त्यांच्या अनुपस्थिती कार्बिन बॉश व जॉर्ज लिंडेने (१७ धावांत एक बळी) लक्षणीय कामगिरी केली. एडेन मार्कराम, रायन रिकेल्टन व डेवाल्ड ब्रेव्हिस या तिघांनीही धावांचा यशस्वी पाठलाग केला.



डेवाल्ड ब्रेव्हिसची (३६) दमदार फलंदाजी

दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार एडन मार्करामने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. कर्णधाराचा निर्णय योग्य ठरवित दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांनी आपली जबाबदारी प्रभावीपणे बजावली व सुएईला १२२ धावांवर रोखले. दक्षिण आफ्रिकेकडून आलीशान शरफूने तेवढी ३८ चेंडूंत ५ चौकार व एका षट्काराच्या मदतीने सर्वाधिक ४५ धावांची खेळी केली. कर्णधार मोहम्मद वसीमने २२ धावांची, तर सलामीवीर आर्यांश शर्माने १३ धावांची भर घातली. इतर फलंदाज मात्र दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांचा प्रभावी माऱ्यापुढे फार वेळ टिकाव धरू शकले नाहीत.

विजयासाठी धावांचा पाठलाग करताना कर्णधार एडन मार्कराम (२८) व क्विंटन डिकॉक (१४) यांच्यासोबत ३२ धावांची सलामी भागीदारी केली. पुढे रेयान रिक्लेटन (३०) व डेवाल्ड ब्रेव्हिसनेही (३६) दमदार फलंदाजी करीत दक्षिण आफ्रिकेला विजयाच्या समीप आणून सोडले. ट्रिस्टन स्टब्स (नाबाद ६) व जेसन स्मिथ (नाबाद ३) यांनी नाबाद खेळी करत दक्षिण आफ्रिकेच्या विजयावर शिक्कामोर्तब केला.

(वृत्तसंस्था)

# पाकिस्तान सुपर एटमध्ये




सामनावीर साहिबजादा फरहान

◆ **कोलंबो, १८ फेब्रुवारी**

साहिबजादा फरहानचे नाबाद शतक आणि उस्मान तारिक व शादाब खानच्या प्रभावी फिरकीच्या बळावर पाकिस्तानने नामिबियावर १०२ धावांनी विजय मिळविला आणि आयसीसी टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या सुपर एटमध्ये स्थान मिळविले.

५८ चेंडूत नाबाद १०० धावा काढणाऱ्या साहिबजादा फरहानला सामनावीराचा पुरस्कार मिळाला. टी-२० मध्ये हे त्याचे पहिलेच शतक आहे. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या पाकिस्तानने २० षटकांत ३ बाद १९९ धावा उभारल्या. प्रत्युत्तर देताना नामिबियाचा संपूर्ण संघ १७.३ षटकांत ९७ धावांतच गारद झाला.

कोणत्याही परिस्थितीत सुपर एटमध्ये स्थान मिळवायचे, या ध्येयाने खेळताना पाकिस्तानच्या

### नामिबियावर १०२ धावांनी विजय

फलंदाजांनी दमदार फलंदाजी केली. सलामीवीर साहिबजादा फरहानने सैम अयुबच्या (१४) साथीने पहिल्या गड्यासाठी ४० धावांची भागीदारी केली. त्यानंतर साहिबजादाने कर्णधार सलमान आगासोबत दुसऱ्या गड्यासाठी ६७ धावांची भागीदारी केली. सलमान आगाने २३ चेंडूंत ३ चौकार व २ षट्कारांच्या मदतीने ३८ धावांची खेळी केली. त्यानतर ख्वाजा नताय (५) लवकरच बाद झाला, परंतु त्यानंतर साहिबजादा व शादाब खानने अखेरपर्यंत नाबाद खेळी करत पाकिस्तानला १९९ धावांचा टप्पा गाठून दिला. साहिबजादाने ५८ चेंडूंत नाबाद १०० धावांची खेळी केली, यात त्याने ११ चौकार व ४ षट्कार खेचले. शादाबने २२ चेंडूंत १ चौकार व ३ षट्कारांसह नाबाद ३६ धावांची भर घातली.

विजयासाठी धावांचा पाठलाग करताना नामिबियाची पाकिस्तानच्या गोलंदाजांचा सामना करताना भंबेरी उडाली. सलामीवीर लॉरेन स्टीरकॅम्प व ॲलेक्झांडर बुसिंग-व्होलशेकने थोडीफार झुंज दिली, परंतु इतर फलंदाज पाकिस्तानच्या फिरकीच्या जाळ्यात अडकले व एक अंकी धावसंख्येवरच बाद झाले. लॉरेनने २२ चेंडूंत २३ धावा केल्या, तर ॲलेक्झांडरने २० चेंडूंत २० धावांची भर घातली. पाकिस्तानकडून फिरकी गोलंदाज उस्मान तारिकने १६ धावांत ४ बळी, तर शाबाद खानने १९ धावांत ३ बळी घेतले. सलमान मिर्झा व मोहम्मद नवाझने प्रत्येकी एक गडी बाद केला.

(वृत्तसंस्था)

# कर्नाटक ८०२ धावांनी आघाडीवर

◆ **लखनौ, १८ फेब्रुवारी**

येथे सुरू असलेल्या रणजी करंडक क्रिकेटच्या उपांत्य सामन्यात कर्नाटकने उत्तराखंडविरुद्ध ८०२ धावांनी भक्कम आघाडी मिळविली आहे. या आघाडीच्या जोरावर कर्नाटकने २०२५-२६ रणजी करंडकाच्या अंतिम फेरीत आपले स्थान जवळजवळ निश्चित केले. चौथ्या दिवस अखेर कर्नाटकने ६३.५ षटकांत ६ बाद २९९ धावा केल्या. खेळ थांबला तेव्हा केएल राहुल नाबाद ७० धावांवर खेळत होता.

आर. स्मरनने सामन्यातील दुसरे शतक झळकावले, तर केएल राहुल आणि कृतिक कृष्णाने जलद अर्धशतके झळकावत कर्नाटकने उत्तराखंडच्या थकलेल्या आक्रमणाला उद्ध्वस्त केले.



केएल राहुल

चौथ्या दिवसाच्या अखेरीस, त्यांनी त्यांची एकूण आघाडी ८०२ धावांपर्यंत वाढवली.

स्मरन एकामागोमाग एक विक्रम नोंदवत आहे आणि मयंकविरुद्ध मोठा षट्कार मारत, तो आता आयुष दोसेजाला मागे टाकत हंगामातील सर्वाधिक धावा करणारा फलंदाज झाला आहे व या रणजी हंगामासाठी त्याने ९५० धावा केल्या आहेत.

(वृत्तसंस्था)

# जम्मू-काश्मीर प्रथमच रणजी करंडकाच्या अंतिम फेरीत

### बंगालवर ६ गड्यांनी ऐतिहासिक विजय

◆ **कल्याणी, १८ फेब्रुवारी**

जम्मू-काश्मीर संघाने प्रथमच प्रतिष्ठेच्या रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश करून इतिहास घडविला. बंगाल क्रिकेट अकादमीच्या मैदानावर बुधवारी झालेल्या उपांत्य सामन्याच्या चौथ्या दिवशी जम्मू-काश्मीर संघाने बंगालवर ६ गड्यांनी विजय नोंदविला आणि पहिल्यांदाच रणजी करंडकाच्या अंतिम फेरीत धडक मारली.मध्यम वेगवान गोलंदाज अष्टपैलू औकिब नबीने पुन्हा एकदा चांगली कामगिरी केली. औकिबने पहिल्या डावात ८७ धावांत ५ बळी व दुसऱ्या डावांत ३६ धावांत ४ बळी टिपण्याची किमया केली, त्यालाच सामनावीर पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सध्या, १८ फेब्रुवारी हा दिवस जम्मू-काश्मीरच्या क्रिकेट प्रवासात कायमचा सुवर्णाक्षरांनी कोरला जाईल. जम्मू-काश्मीर संघ आता २४ ते २८ फेब्रुवारी दरम्यान होणाऱ्या जेतेपदाच्या लढतीत कर्नाटकचा सामना करणार आहे, तर उत्तराखंड लखनौमध्ये होणाऱ्या दुसऱ्या उपांत्य सामन्यात पहिल्या डावात आघाडी घेण्यास सज्ज आहे.



विजयाचा आनंद साजरा करताना जम्मू-काश्मीरचे खेळाडू

औकिब नबी व सुनील कुमारने प्रत्येकी चार बळी घेत बंगालला तिसऱ्या दिवशी दुसऱ्या डावात ९९ धावांतच गुंडाळले व सामना जम्मू-काश्मीरच्या बाजूने वळविला. त्यामुळे जम्मू-काश्मीरसमोप विजयासाठी १२६ धावांचे सोपे लक्ष्य राहिले होते व ते त्यांनी ३४.४ षटकांत पूर्ण केले. वंशज शर्मा आणि अब्दुल समदने अनुक्रमे नाबाद ४३ आणि ३० धावांची खेळी केली.



सामनावीर औकिब नबी

जम्मू-काश्मीरने सकाळी २ बाद ४३ धावांवरून पुढे खेळण्यास सुरुवात केली., मोहम्मद शमी व आकाश दीपने प्रभावी मारा करत शुभम पुंडिर (२७) व कर्णधार पारस डोगराला (९) बाद केले. पण वंशराज शर्मा व अब्दुल समदने बंगालच्या गोलंदाजांचा धैर्याने सामना करत आपल्या संघाला विजयाच्या दिशेने नेले. समदने शाहबाज अहमदच्या गोलंदाजीवर दोन उत्तुंग षट्कार मारले व जम्मू-काश्मीरच्या धावगतीत वेग आणला.

वंशराज शर्माने सूरज सिंधू जयस्वालला तीन चौकार मारल्यानंतर, मुकेश कुमारच्या डोक्यावर षट्कार मारून विजयावर शिक्कामोर्तब केले. विजय नोंदविताच जम्मू-काश्मीरच्या खेळाडूंनी आपल्या प्रशिक्षकांना उचलले आणि आनंदोत्सव साजरा केला. काही वर्षांपासून लाल चेंडूने प्रभावी कामगिरी करणाऱ्या जम्मू-काश्मीर संघासाठी आज एक महत्त्वाचा दिवस आला.

(वृत्तसंस्था)

# असे होतील सुपर एट फेरीचे सामने

◆ **नवी दिल्ली, १८ फेब्रुवारी**

आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक २०२६ च्या सुपर ८ फेरीसाठी सज्ज झाला आहे, यामध्ये आठ संघ उपांत्य फेरीसाठी लढण्यासाठी सज्ज होत आहेत. पुढील फेरी २१ फेब्रुवारीपासून सुरू होईल आणि १ मार्चपर्यंत चालेल, यात सामने भारत आणि श्रीलंकेतील ठिकाणी विभागले जातील.

मूळ २० संघांच्या मैदानावरून, प्रत्येक गटातील अव्वल दोन संघांनी प्रगती केली आहे, त्यामुळे जगातील आघाडीच्या टी-२० राष्ट्रांमध्ये एक उच्च-दाबाची स्पर्धा निर्माण झाली आहे. पात्र संघांमध्ये भारत, वेस्ट इंडीज, झिम्बाब्वे, दक्षिण आफ्रिका, न्यूझीलंड, श्रीलंका, इंग्लंड आणि पाकिस्तान यांचा समावेश आहे.

आठ संघांना चारच्या दोन गटात विभागण्यात आले आहे. गट १ मध्ये भारत, वेस्ट इंडीज, झिम्बाब्वे व दक्षिण आफ्रिका यांचा समावेश आहे, या संघांचे सर्व सामने भारतात होणार आहेत.

गट २ मध्ये न्यूझीलंड, श्रीलंका, इंग्लंड आणि पाकिस्तान यांचा समावेश आहे, सह-यजमान श्रीलंका या सामन्यांचे आयोजन करत आहे.

स्पर्धेचा सुपर ८ टप्पा २१ फेब्रुवारी रोजी कोलंबोमध्ये न्यूझीलंडचा सामना पाकिस्तानशी होईल. २२ फेब्रुवारी रोजी इंग्लंड पल्लेकेलेमध्ये श्रीलंकेशी, त्यानंतर भारत अहमदाबादमध्ये दक्षिण आफ्रिकेशी सामना करेल. २३ फेब्रुवारी रोजी मुंबईत झिम्बाब्वे विरुद्ध वेस्ट इंडीज, तर २४ फेब्रुवारी रोजी इंग्लंडचा सामना पाकिस्तानशी होईल.



२५ फेब्रुवारी रोजी न्यूझीलंडचा सामना श्रीलंकेशी होईल. २६ फेब्रुवारी रोजी वेस्ट इंडीजचा सामना दक्षिण आफ्रिकेशी आणि भारताचा सामना झिम्बाब्वेशी होईल. २७ फेब्रुवारी रोजी इंग्लंडचा सामना न्यूझीलंडशी, त्यानंतर २८ फेब्रुवारी रोजी पाकिस्तान विरुद्ध श्रीलंका होईल. सुपर ८ टप्पा १ मार्च रोजी झिम्बाब्वे विरुद्ध दक्षिण आफ्रिका आणि भारत विरुद्ध वेस्ट इंडीज यांच्यात होईल.

सुपर ८ मध्ये चार उपांत्य फेरीतील संघ निश्चित होतील, प्रत्येक गटातील अव्वल दोन संघ बाद फेरीत पोहोचतील.

भारत सुपर ८ मध्ये गतविजेता म्हणून प्रवेश करेल, तर वेस्ट इंडीज, इंग्लंड, पाकिस्तान आणि श्रीलंका हे सर्व विजेतेपद पटकावणारे संघ आहेत. दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड हे संघ सातत्याने दावेदार आहेत, तर झिम्बाब्वे हे या स्पर्धेतील एक आश्चर्यकारक पॅकेज म्हणून उदयास आले आहे. उपांत्य फेरीतील स्थानांसह, सुपर ८ फेज टी-२० विश्वचषकातील सर्वात रोमांचक टप्प्यांपैकी एक आहे.

(वृत्तसंस्था)

# श्रीलंका, झिम्बाब्वे यांच्यात वर्चस्वासाठी लढत

◆ **कोलंबो, १८ फेब्रुवारी**

गुरुवारी येथे होणाऱ्या टी-२० विश्वचषक सामन्यात झिम्बाब्वे आणि श्रीलंका यांच्यात अभिमानास्पद कामगिरीसाठी लढत होईल. दोन्ही संघांनी सुपर ८ मध्ये आपले स्थान आधीच निश्चित केले आहे. या सामन्याचा निकाल गटात अव्वल स्थान निश्चित करेल. श्रीलंका मजबूत दावेदार म्हणून उदयास आला आहे,

दुसरीकडे, झिम्बाब्वेने ऑस्ट्रेलियावर झालेल्या जबरदस्त विजयामुळे आणि हवामानामुळे सुपर ८ मध्ये आपले स्थान मिळवले, कारण आयर्लंडविरुद्धचा त्यांचा सामना रद्द करण्यात आला होता. सामायिक गुणांमुळे, त्यांनी ऑस्ट्रेलियाच्या पुढे जाण्याच्या आशा संपुष्टात आणल्या.

(वृत्तसंस्था)

### आजचे सामने

**इटली वि. वेस्ट इंडीज**
**स्थळ** : ईडन गार्डन्स, कोलकाता
**वेळ** : सकाळी ११.०० वाजतापासून

०००

**श्रीलंका वि. झिम्बाब्वे**
**स्थळ** : आर. प्रेमदासा स्टेडियम, कोलंबो
**वेळ** : दुपारी ३.०० वाजतापासून

०००

**अफगाणिस्थान वि. कॅनडा**
**स्थळ** : एम. ए. चिदम्बरम्, स्टेडियम, चेन्नई
**वेळ** : सायंकाळी ७.०० वाजतापासून

**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# लॉयड्सच्या खेळाडूंची राज्य व जिल्हास्तरावर पदकांची कमाई

◆ **गडचिरोली, १८ फेब्रुवारी**

लॉयड्स मेटल्स अँण्ड एनर्जी लिमिटेड अंतर्गत कार्यरत लॉयड्स स्पोर्ट्स अकादमी व लॉयड्स राज विद्यानिकेतन (एलआरव्हीएन) शाळेच्या खेळाडूंनी राज्य व जिल्हास्तरीय स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले.

ब्रह्मपुरी स्पोर्टस फेस्टिव्हल २०२६ अंतर्गत चंद्रपूर येथे झालेल्या राज्यस्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेत अंडर १८ गटात मोनिका मडावी हिने लांब उडीत सुवर्ण व १०० मीटर धावण्यात रौप्यपदक पटकावत दुहेरी यश मिळवले. अंडर १४ गटात भाग्यश्री मुलमा हिने गोळाफेकमध्ये सुवर्ण व १०० मीटरमध्ये कांस्यपदक जिंकले. गडचिरोलीतील जिल्हास्तरीय तिरंदाजी स्पर्धेतही लॉयड्सच्या खेळाडूंनी वर्चस्व गाजवले. अंडर १५ मुलींत पल्लवी गोडसेलवार (सुवर्ण) व पूर्वी देबनाथ (रौप्य), अंडर १५ मुलांत सागर सरकार (सुवर्ण), अंडर १३ मध्ये उज्ज्वल दास (कांस्य), तर अंडर १० मध्ये अनिश सिंकू (रौप्य) यांनी यश मिळवले. शालेय गटातील सर्व पदक विजेते एलआरव्हीएनचे विद्यार्थी ठरले.



पदक दाखविताना लॉयड्स मेटल्सचे खेळाडू

कोनसरी येथील अकादमीच्या सौरभ राऊत (कांस्य) व गौरी गावतुरे (द्वितीय व तृतीय) यांनीही उल्लेखनीय कामगिरी केली. संरचित प्रशिक्षण, आधुनिक सुविधा व व्यावसायिक मार्गदर्शनामुळे ग्रामीण व आदिवासी भागातील खेळाडूंना मोठी संधी मिळत असून, संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक बी. प्रभाकरन यांच्या दूरदर्शी धोरणाचा सकारात्मक परिणाम आता जिल्हा व राज्यस्तरावरील यशातून दिसून येत आहे.

(तभा वृत्तसेवा)

# भारताचे ऑस्ट्रेलियाविरुद्ध टी-२० मालिका जिंकण्याचे लक्ष्य

◆ **कॅनबेरा, १८ फेब्रुवारी**

भारतीय महिला क्रिकेट संघाने ऑस्ट्रेलियाविरुद्धची तीन सामन्यांची टी-२० मालिका जिंकण्याचे ध्येय ठेवले आहे. पावसाच्या व्यत्ययात झालेल्या पहिल्या सामन्यात भारताने डकवर्थ लुईस नियमानुसार विजय मिळविला. आता हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ गुरुवारी येथे ऑस्ट्रेलियाविरुद्ध दुसरा टी-२० आंतरराष्ट्रीय सामना खेळणार आहे.

पावसाने व्यत्यय आणलेल्या पहिल्या विजयात गोलंदाजीच्या दमदार कामगिरीचा फायदा होईल. वेगवान गोलंदाज अरुंधती रेड्डीने चार बळी टिपण्याची किमया केली व यजमान संघाला धक्का दिला आणि ऑस्ट्रेलियाला २० षटके फलंदाजी करता आली नाही आणि त्यांना १३३ धावांपेक्षा कमी धावांमध्ये गुंडाळले.



हरमनप्रीत कौर

तीन एकदिवसीय आणि एक कसोटी सामन्यांचा समावेश असलेली ही लांब मालिका सुरू होताच गोलंदाजांनी चांगली कसरत केली.

नुकत्याच संपलेल्या महिला प्रीमियर लीगमध्ये खेळलेल्या बहुतांश खेळाडूंचा भारतीय संघात समावेश आहे, त्यामुळे त्यांना तयारीसाठी पुरेसा वेळ मिळालव त्यांना अपयशाची चिंता कमी आहे. गत वर्षी दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या विश्वचषक अंतिम सामन्यात उत्कृष्ट कामगिरी करणारी शेफाली व मंधानाची फलंदाजी आणि त्यानंतर जेमिमाह रॉड्रिग्ज यांच्याकडून भारत पुन्हा एकदा धमाकेदार सुरुवात करेल.

या वर्षाच्या अखेरीस इंग्लंडमध्ये होणाऱ्या महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेसह, येथील ही कठीण मालिका जागतिक स्पर्धेसाठी रंगीत तालीम म्हणून काम करते.

(वृत्तसंस्था)

# दहा स्वीकृत सदस्यत्वासाठी ६२ जणांचे अर्ज दाखल

- स्वीकृत सदस्यत्वासाठी अर्ज दाखल करण्यासाठी महापालिकेत मोठी गर्दी
- भाजपाकडून २० इच्छुकांना अर्ज भरण्याच्या सूचना
- एमआयएमसह अपक्ष इच्छुकांचे अर्ज दाखल
- भाजपच्या वतीने सामाजिक समतोल साधण्याचा प्रयत्न



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ फेब्रुवारी-**

सोलापूर महापालिकेतील १० स्वीकृत सदस्य नियुक्तीसाठी आयुक्त कार्यालयात मोठी गर्दी पाहायला मिळाली.१० जागांसाठी ६२ अर्ज दाखल झाले आहेत. भाजपने २० इच्छुकांना अर्ज भरण्याच्या सूचना दिल्या होत्या. दरम्यान, स्वीकृत नगरसेवकसाठी जोरदार रस्सीखेच असल्याचे चित्र पाहायला मिळाले. भाजप शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर, माजी नगरसेवक जगदीश पाटीलसह अनेकांनी अर्ज भरले. एमआयएम पक्षाच्या वतीनेही अर्ज दाखल करण्यात आले आहेत. भाजपकडून सामाजिक समतोल साधण्याचा प्रयत्न झाला आहे.

महापालिकेच्या नामनिर्देशित म्हणजेच १० स्वीकृत सदस्यांच्या नियुक्तीकरिता संबंधितांना आज बुधवार, दि. १८ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ ते दुपारी १.३० वाजेपर्यंत महापालिकेतील इंद्रभुवन इमारतीतील आयुक्त कार्यालयात अर्ज सादर करण्यासाठी मोठी गर्दी दिसून आली. नगरसचिव प्रवीण दंतकाळे यांनी हे अर्ज स्वीकारले. वरिष्ठ लिपिक नितीन गायकवाड यांनी त्यांना सहकार्य केले. रितसर अर्ज घेऊन त्यांना पावती देण्यात आली. सोलापूर महापालिकेची नवीन टर्ममधील पहिली सर्वसाधारण सभा दि. २० फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता बोलवण्यात आली आहे. या सभेमध्ये १० स्वीकृत सदस्य, स्थायी समितीचे १६ तर परिवहन समितीच्या १२ सदस्यांची नियुक्ती होणार आहे.

नूतन महापौर विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा होणार आहे. ही सभा शुक्रवार, २० फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता महानगरपालिकेच्या कै, यशवंतराव बळवंतराव सभागृह (कौन्सिल हॉल) येथे होणार आहे. महापालिकेचे नगरसचिव प्रवीण दंतकाळे यांनी या सभेचा अजेंडा प्रसिद्ध केला आहे. याशिवाय महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२ नुसार सोलापूर महानगरपालिकेत १० नामनिर्देशित सदस्यांची आयुक्तांच्या दि.९ फेब्रुवारीच्या टिपणीत नमूदप्रमाणे नियुक्ती करण्याचा विषय सभेपुढे ठेवण्यात आला आहे. संख्याबळानुसार भाजपाला नऊ तर एमआयएमला एक स्वीकृत सदस्य नामनिर्देशित करता येणार आहे.

दरम्यान, महापालिकेच्या नामनिर्देशित अर्थात १० स्वीकृत सदस्यत्वासाठी बुधवार, दि. १८ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ ते दुपारी १.३० वाजेपर्यंत महापालिकेतील आयुक्त कार्यालयात अर्ज स्वीकृती प्रक्रिया पार पडली. दहा जागांसाठी मोठ्या प्रमाणात अर्ज दाखल झाले आहेत. सकाळी ११.४० वाजता भाजपच्या शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर यांच्यासह इच्छुक उमेदवारांनी महापालिकेत येऊन स्वीकृत नगरसेवक पदासाठी अर्ज दाखल केले. त्याचबरोबर एमआयएम पक्षाकडूनही इच्छुकानी अर्ज दाखल केले. एकूण ६२ जणांनी आपले अर्ज दाखल केले आहेत. दरम्यान, यामध्ये भाजपाकडून विविध समाज घटकांना प्रतिनिधित्व देण्याचा प्रयत्न करण्यात आला असल्याचे दिसून येते.

### या इच्छुकांनी दाखल केले अर्ज

आज नियोजित वेळेत भाजप शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर, प्रभाकर जामगुंडे, जगदीश पाटील, शशी थोरात, अक्षय आंजिखाने, श्रीनिवास दायमा, सुधा अळ्ळीमोरे, श्रीकांत घाडगे, जवाहर जाजू, अनुप खंडेलवाल, केतन शहा, वृषाली चालुक्य, पांडुरंग दिड्डी, अॅड. राजन दीक्षित, अॅड. साधना संगवे, सूरज चव्हाण, कृष्णा झंवर, महेश तापडिया, लक्ष्मीकांत दरक, मल्लिनाथ राचेटि, सोमनाथ केंगनाळकर, रुद्रेश बोरामणी, देवेंद्र भंडारे, नागेश भोगडे, सचिन कुलकर्णी, जय साळुंखे, एमआयएमएम कडून नईम सालार, गाजी जहागिरदार,फिरदौस पटेल यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी अपक्ष म्हणून असे ६२ इच्छुकांनी अर्ज भरले आहेत.

**भाजपकडून २० इच्छुकांना अर्ज भरण्याच्या सूचना : तडवळकर**

भाजप पक्षाकडे स्वीकृत नगरसेवक पदासाठी मोठ्या प्रमाणात इच्छुकांच्या अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी २० इच्छुकांना अर्ज भरण्याच्या सूचना पक्षाने दिल्या आहेत. त्यानुसार माझ्यासह २० जणांनी अर्ज दाखल केले आहेत. येत्या २० फेब्रुवारी रोजी होणाऱ्या महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत २० पैकी नऊ जणांची नावे निश्चित करण्यात येणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्यता दिल्यानंतर ती यादी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे येईल. त्यानंतर २० फेब्रुवारीच्या सभेत ही नावे घोषित करण्यात येतील, असे भाजप शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर यांनी स्पष्ट केले.

**पक्षाने आदेश दिल्यास एक पद सोडायलाही तयार**

एक व्यक्ती एक पद या नियमानुसार काय निर्णय घेणार या प्रश्नाच्या उत्तरात भाजपा शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर म्हणाल्या, स्वीकृत नगरसेवकसाठी पक्षाने अर्ज भरण्याचे सुचित केल्यानंतर मी अर्ज दाखल केला आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण हे आमदार आहेत. त्याचबरोबर त्यांच्याकडे अध्यक्ष पदाचीही जबाबदारी आहे. यामुळे पक्षाने आदेश दिल्यास पद सोडण्यास तयार आहे, असे शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर यांनी सांगितले. दरम्यान, यावेळी माजी नगरसेवक जगदीश पाटील यांनी यापूर्वी अशोक निंबर्गी हे शहराध्यक्ष असताना ते स्वीकृत नगरसेवकही होते याची आठवण करून दिली.

**एमआयएमतर्फे नईम सालारयांचे नाव : शेख**

एमआयएम पक्षाच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांकडून स्वीकृत नगरसेवकसाठी नईम सालार यांचे नाव अधिकृतरित्या आले आहे. त्यानुसार आम्ही त्यांचा अर्ज भरला आहे. इतर कोणी अर्ज भरला असेल तर आम्हाला त्यांची माहिती नाही, असे एमआयएमच्या गटनेत्या वहिदा भंडाले - शेख यांनी सांगितले. यावेळी या पक्षाचे नगरसेवक उपस्थित होते.

## उद्यापासून दहावीची परीक्षा

**▸▸जिल्ह्यात ६४ हजार ४५४ विद्यार्थी देणार परीक्षा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ फेब्रुवारी-**

शुक्रवार, दि.२० फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत इयत्ता १० वी ची परीक्षा होणार आहे. इयत्ता १० वी साठी परीरक्षक केंद्र १५ असून, एकुण १८९ परीक्षा केंद्रामधून ६४ हजार ४५४ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पाडावी यासाठी शिक्षण, जिल्हा परिषद, महसूल, पोलीस प्रशासन समन्वयातून काम करीत असल्याची माहिती माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी दिली.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या निर्देशानुसार जिल्हास्तरीय सात भरारी पथके तयार करण्यात आलेली आहेत. यामध्ये शिक्षण विभागातील महिलां अधिकाऱ्यांचे विशेष पथक तयार करण्यात आले आहे. विभाग स्तरावर तीन भरारी पथके कार्यरत आहेत. त्यामुळे सर्व केंद्र संचालकांनी आपल्या केंद्रात कोणताही गैरप्रकार घडणार नाही. याची दक्षता घेण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत.

जिल्ह्यातील सर्व परीक्षा केंद्रावर परीक्षेशी संबंधित सर्व खोल्यांमध्ये सीसीटीव्ही उपलब्ध राहतील व सदर चित्रीकरणाची साठवणूक करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. जिल्ह्यातील सर्व अतिसंवेदनशील व संवेदनशील केंद्रांची माहिती घेवून याबाबत पोलीस प्रशासनाच्या मदतीने कडक उपाययोजना करण्यात येणार आहेत. कोणत्याही परीक्षा केंद्रावर गैरप्रकार घडल्यास गैरप्रकारांना उद्युक्त करणारे, मदत करणारे व प्रत्यक्ष गैरमार्गाचा वापर करणाऱ्यांवर दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हा दाखल करण्याबाबतची कार्यवाही करणेत येणार आहे. तसेच परीक्षा केंद्र परिसरातील सर्व झेरॉक्स सेंटर पेपरच्या वेळेत बंद ठेवणेबाबत जिल्हाधिकारी यांनी सूचना दिलेल्या आहेत.

## विहिरीत बेशुद्ध आढळलेल्या व्यक्तीचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ फेब्रुवारी-**

शेतातील विहिरीमध्ये दि. १८ फेब्रुवारी रोजी पाण्यात एक व्यक्ती बेशुद्ध अवस्थेत आढळून आला, त्यांना शासकीय रुग्णालय येथे दाखल केले असता उपचारापूर्वी मृत्यू झाल्याचे घोषित केले.

याबाबत अधिकची माहिती अशी की, खंडू राजू मोरे वय ३२, राहणार भोगाव, ता. उत्तर सोलापूर हे भोगाव गावच्या शिवारातील मारुती नागनाथ इंगळे यांच्या शेतातील विहिरी मध्ये दि. १८ फेब्रुवारी रोजी विहिरीतील पाण्यात बेशुद्ध अवस्थेत मिळून आले, त्यांना तालुका पोलीस ठाण्याचे बनसोडे यांनी शासकीय रुग्णालय येथे दाखल केले असता उपचारापूर्वी त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले अशी नोंद सिविल पोलीस चौकीत झाली आहे.




## सोलापूरच्या 'आई प्रतिष्ठान'चे आता वटवृक्षात रूपांतर

- मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांचे गौरवोद्गार
- ढोलताशाच्या गजरात मुलांकडून दादांचे स्वागत
- मोफत कौशल्य विकास केंद्राचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ फेब्रुवारी-**

सोलापुरात आई प्रतिष्ठानने काही वर्षांपूर्वी लावलेल्या कार्यरूपी वेलुचे आता वटवृक्षात रूपांतर होत असून, समाजातील माता-भगिनींसाठी अतिशय उपयुक्त उपक्रम राबविणाऱ्या या आई प्रतिष्ठानचे कार्य लोककल्याणकारी असल्याचे गौरवोद्गार राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण तसेच संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांनी काढले.

दरम्यान, विडी घरकुल येथे आई प्रतिष्ठानतर्फे सुरू करण्यात आलेल्या मोफत कौशल्य विकास केंद्राचे मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते उद्घाटन झाले. या उद्घाटन समारंभाच्या विचारमंचावर मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह त्यांच्या धर्मपत्नी अंजली पाटील, प्रिसिजन कॅम शाफ्टचे व्यवस्थापकीय संचालक यतीन शहा, प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, नगरसेवक प्रथमेश कोठे, स्त्री रोग तज्ञ डॉ. अग्रजा चिटणीस - वरेरकर, वैशाली कबाडे, डॉ. वैशंपायन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. ऋत्विक जयकर, पंचायत समितीचे सदस्य शिवराज पाटील, आई प्रतिष्ठानचे अध्यक्ष मोहन डांगरे, वर्षा डांगरे, सृष्टी डांगरे, निसर्गा डांगरे, योगेश डांगरे, राहुल डांगरे उपस्थित होते.

या देखण्या कार्यक्रमाची सुरूवात होम करून झाली. प्रारंभी आई प्रतिष्ठानच्या कौशल्य विकास केंद्रातील विद्यार्थिनींनी योग नृत्य सादरीकरण केले. याप्रसंगी मंत्री चंद्रकांत पाटील पुढे म्हणाले, समाजाबद्दल आपली बांधिलकी आहे याची जाणीव ठेवून आई प्रतिष्ठान कार्यरत आहे. दरमहा हजारो विद्यार्थिनींना लाखो सॅनिटरी नॅपकिन देणे, त्यांच्याकरिता योग, शिलाई, संगणक शिक्षण, आरोग्य शिबिरे अशा कार्यक्रमाचे आयोजन करणे कौतुकास्पद आहे.

आगामी काळात सुखदा प्रकल्पांतर्गत गरोदर महिलांची तपासणी, त्यांना पौष्टिक आहार, प्रसुती, प्रसूतीनंतर एक महिन्याचा आहार, आवश्यक शस्त्रक्रिया, रोजगार मोफत देऊन महिलांना भरघोस उत्पन्न मिळण्यासाठी आई प्रतिष्ठानला संपूर्ण सहकार्य करण्यात येईल, असेही मंत्री पाटील यांनी सांगितले.

या केंद्रात १० संगणक उपलब्ध करून देण्यात आले असून, मुलींना मोफत संगणक शिक्षण देखील मिळणार आहे. त्याचबरोबर या केंद्रात १० शिलाई यंत्रे ठेवण्यात आलेली असून, या ठिकाणी महिलांना शिलाईचे मोफत प्रशिक्षण देऊन त्यांना स्वावलंबी करण्यात येणार आहे, असेही मंत्री पाटील यांनी याप्रसंगी सांगितले.

यावेळी त्यांच्या हस्ते मुलींना मोफत कपडेही वाटप करण्यात आले. प्रारंभी मंत्री चंद्रकांतदादा पाटील व उपस्थित पाहुण्यांचे या चिमुकल्या मुलींनी ढोल-ताशांच्या गजरात जंगी स्वागत केले. प्रास्ताविक सृष्टी डांगरे यांनी तर पंचाक्षरी स्वामी यांनी सूत्रसंचालन आणि आभार मानले.



## रेल्वे महाव्यवस्थापकांनी घेतला विकासकामांचा आढावा

**सोलापूर विभागातील अनेक कामांची केली पाहणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ फेब्रुवारी-**

प्रतीक गोस्वामी, महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे यांनी दि. १८ फेब्रुवारी २०२६ रोजी सोलापूर विभागातील वाडी- सोलापूर सेक्शनमध्ये सविस्तर संरक्षा निरीक्षण करून परिचालन कार्यक्षमता, संरक्षा मानके आणि सुरू असलेल्या विकासकामांचा आढावा घेतला.

वाडी येथे क्रू लॉबी, नवीन क्रू काउन्सेलिंग रूम, रनिंग रूम व नवीन सुविधा, नूतनीकरण केलेले महिला प्रतीक्षालय तसेच नवीन पॉली क्लिनिक व संगणकीकृत रेडिओग्राफी प्रणालीच्या पाहणीने झाली. गोस्वामी यांनी ए-क्लास अपघात निवारण रेल्वेगाडी, १४० टन क्रेन, रूट रिले इंटरलॉकिंग आणि नवीन वाडी ट्रॅक्शन डिस्ट्रीब्युशन डेपोचे निरीक्षण केले. वाडी येथे गती शक्ती युनिट्स आणि वाडी यार्ड रीमॉडेलिंग योजनेवरील प्रगतीबाबत सादरीकरण करण्यात आले. तसेच वृक्षारोपण कार्यक्रमही पार पडला.कलबुरगि येथे नवीन ट्रॅक मशीन रेस्ट हाऊस आणि सिग्नल डेपोमधील नवीन QC लॅबचे निरीक्षण करण्यात आले. सिग्नल व दूरसंचार विभाग तसेच इतर विभागांच्या प्रदर्शनांचा आढावा घेण्यात आला. अल्ट्रा सोनिक फ्लॉ डिटेक्शन प्रणालीचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. महाव्यवस्थापकांनी किमी ५६४/७-८ येथील इंजिनिअरिंग इंटरलॉक्ड गेटचे निरीक्षण केले आणि लेव्हल क्रॉसिंग गेट तसेच ओव्हरहेड इक्विपमेंट मापदंडांचा आढावा घेतला. त्यानंतर पॉइंट्स आणि स्विच एक्स्पान्शन जॉइंट्स, ट्रॅक्शन सब स्टेशन आणि गौड़गांव यार्डमधील टेस्टींग व्हॅन तपासण्यात आली. दुधनी-बोरोटी सेक्शनमधील बोरी पूल तसेच बोरोटी-नागणसूर सेक्शनमधील अप लाईनवरील कर्व क्रमांक १०३चे निरीक्षण करून जक्ए मोजमापांचा आढावा घेण्यात आला. अक्कलकोट रोड येथे इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग, नूतनीकरण केलेले ट्रॅक मशीन रेस्ट हाऊस, रेल्वे कॉलनी व बागेची पाहणी करण्यात आली आणि वृक्षारोपण करण्यात आले. सोलापूर येथे नव्याने नूतनीकरण केलेल्या क्रीडा संकुल व स्केटिंग रिंकची पाहणी करण्यात आली.

तसेच सोलापूर रेल्वे रुग्णालयातील उन्नत नेत्ररोग विभागातील ऑटो केरॅटो रिफ्रॅक्टो टोनोमीटर, डिजिटल लेन्सोमीटर, डिजिटल फोटो डएऊ स्लिट लॅम्प विथ अप्लॅनेशन टोनोमीटर तसेच इलेक्ट्रो-हायड्रॉलिक क्ट्युएटर असलेले नवीन ऑपरेटिंग टेबल यांची पाहणी केली. यावेळी सोलापूर विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक डॉ. सुजीत मिश्रा तसेच मुख्यालय व सोलापूर विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## लैंगिक अत्याचारप्रकरणी २० वर्षे सश्रम कारावास

**१० हजारांचा दंड**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ फेब्रुवारी-**

लैंगिक अत्याचारी आरोपी लक्ष्मण विठठल शिंदे, वय ३० वर्षे, रा गप्ता. मोहोळ याला २० वर्षे सश्रम कारावास आणि रुपये १०,०००/- दंड डी. एन. सुरवसे, जिल्हा न्यायाधीश-३, सोलापूर यांनी ठोठावला आहे.

आईविना असणाऱ्या अज्ञान पिडीतेच्या घरातील सर्व लोक कार्यक्रमासाठी परगावी गेलेले असताना, घरात कोणी नाही यावर लक्ष ठेवून पिडीता घरात एकटी असल्याचा फायदा घेवून घराच्या पाठीमागे राहणाऱ्या आरोपी लक्ष्मण शिंदे याने दुपारी २ च्या समारास पिडीतेच्या घरी जावून घराला आतून कडी लावून पिडीता विरोध करत असतानाही तिच्यावर लैंगिक अत्याचार केला व सदरची घटना कोणाला सांगितली तर जीवे ठार मारण्याची धमकी दिली. आरोपीच्या धमकीला घाबरुन पिडीतेने सदरची घटना कोणास सांगितली नाही.

परंतु घटनेनंतर काही दिवसात पिडीतेस उलट्या व डोकेदुखीचा त्रास सुरु झाल्या मुळे तिला हॉस्पीटलमध्ये घेवून गेल्यावर ती गर्भवती असल्याबाबत डॉक्टरांनी सांगितले. आई नसलेल्या पिडीतेच्या आजीने त्याबाबत तिच्याकडे चौकशी केली असता तिने आरोपी लक्ष्मण शिंदे याने तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याची घटना सांगितली. पिडीतेने मोहोळ पोलीस स्टेशन येथे जावून फिर्याद दाखल केली. फिर्याद दाखल झाल्यावर त्यामध्ये सखोल तपास होवून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल झाले. विशेष न्यायालयात चौकशी दरम्यान पिडीता, पिडीतेची आजी, डॉक्टर यांच्या साक्षी या प्रकरणात महत्वाच्या ठरल्या. तसेच पिडीतेचा, पिडीतेच्या गर्भाचा व आरोपीचा डीएनए रिपोर्ट सारखा आल्यामुळे पिडीतेच्या साक्षीला पुष्टी मिळाली. आरोपीच्या दुष्कृत्यामुळेच पिडीता गर्भवती राहिल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे सरकारी वकील शीतल डोके यांचा युक्तिवाद ग्राह्य धरुन न्यायालयाने आरोपीस भा.दं.वि. कलम ३७६ (२) (एन) आणि बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा कलम ४ व ५ अन्वये २० वर्षे सश्रम कारावास आणि र.रु.१०,०००/- दंडाची व भा.दं.वि. कलम, ५०४, ५०६ प्रमाणे १ वर्षे सक्त मजुरीची शिक्षा सुनावली. यामध्ये सरकारतर्फे अॅड. शीतल डोके, अॅड. पी.एस. जन्नू यांनी काम पाहिले तसेच कोर्ट पैरवी म्हणून पोलीस कॉस्टेबल राजू पवार व लेडी कॉस्टेबल काळे यांनी मदत केली.

## दुचाकीची चोरी

**सोलापूर :** एसटी स्टँड जवळ पार्क केलेली दुचाकी चोरीला गेल्याचा प्रकार सोलापुरात घडला आहे. दि. १८ जानेवारी रोजी लक्ष्मण राम चौगुले राहणार पापणास नगर धाराशिव यांची ३५००० रुपयांची काळ्या रंगाची हिरो एचएफ डीलक्स एम एच २५ ए क्यू ७४८२ ही एसटी स्टँड जवळ पार्क केली असता, अज्ञात चोरट्याने चोरून नेली असल्याची नोंद पोलीस ठाण्यात झाली.

## शेतीच्या वादातून मारहाण

**सोलापूर -** शेतीच्या वादातून पाच ते सहा जणांनी मिळून दगडाने व लाथा बुक्क्यांनी दोघांना मारहाण केल्याची धक्कादायक घटना सोलापूर जिल्ह्यात घडली आहे. याबाबतची अधिक माहिती अशी की, विहाळ येथील शिवारातील राहत्या घराजवळ असताना शेतीच्या वादातून हौसराव संजय बंडगर, सुखदेव बंडगर व इतर तीन ते चार जणांनी मिळून दगडाने व लाथा बुक्क्यांनी दोघांना मारहाण केली. यामध्ये विठ्ठल विश्वंभर बंडगर वय ३३, राहणार विहाळा ता. करमाळा, जि. सोलापूर बाळासाहेब काशिनाथ बंडगर वय ५४, यांना डोक्यास जखम व सर्वांगास मुकामार लागल्याने उपचारासाठी सरकारी दवाखाना करमाळा येथे दाखल करण्यात आले होते. तेथून पुढील उपचारासाठी रेफरने शासकीय रुग्णालय सोलापूर येथे त्यांना दाखल करण्यात आले.




रवि.२२ फेब्रु.
सायं.७ वा.
हुतात्मा स्मृती मंदिर, सोलापूर
ऑनलाईन बुकिंग
bookmyshow
तिकीट विक्री
(सकाळ/संध्या.सुरु)
गुरु वठारे
9011474400

विनम्र अभिवादन



त्यागूनी स्नेहाच्या नाती गोती
अनंतात विलीन दिव्यज्योती
संस्काराच्या जगवत स्मृती
नित्य स्मरतो आपलीच मुर्ती

स्व.दलितमित्र, माजी महापौर
भीमरावजी रा. जाधव गुरुजी
यांच्या १०३ वी जयंतीदिनी
विनम्र अभिवादन

अभिवादक
श्री. सुहास जाधव,
सौ. संगिता जाधव,
श्री. सुयश जाधव
सौ. सुप्रिया गायकवाड
सौ. सायली हलकुर्गी

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महाविद्यालय परिसरात विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या हत्या चिंताजनक : अभाविप

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ फेब्रुवारी :** १६ फेब्रुवारी २०२६ रोजी, लातूरच्या पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयात काल सायंकाळच्या सुमारास महाविद्यालयातील विद्यार्थी विक्रम पांचाळ याची एका अज्ञात तरुणाने चाकूने भोसकून हत्या केली. विक्रम पांचाळ हा तंत्रनिकेतन महाविद्यालयातील वसतिगृहात राहणारा विद्यार्थी असून बांधकाम अभियंता या शाखेचे तृतीय वर्षाचे शिक्षण घेत होता. तसेच लातूर जवळील कुंभारवाडी या गावचा तो रहिवासी होता.मागील ४ महिन्यात लातूर शहरात विद्यार्थ्यांची हत्या होण्याची ही पाचवी घटना आहे. लातूरच्या एमआयडीसी परिसरात असलेल्या महिला बीसीए महाविद्यालयात डीएमएलटी प्रथम वर्षामध्ये शिक्षण घेणाऱ्या दोघा विद्यार्थ्यांवर चौघा तरूणांनी काठीने हल्ला केला, ही घटना फ्रेशर्स पार्टीच्या दरम्यान घडली यातच सुरज शिंदे नावाच्या विद्यार्थ्याचा मृत्यू झाला. त्यानंतर निलंगा तालुक्यातील आठ विद्यार्थी मागील एका महिन्यापासून अचानक बेपत्ता झालेले आहेत.अशा विविध घटना लातूर जिल्ह्यात सातत्याने घडत आहेत. यामुळे विद्यार्थी तसेच पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. कायदा व सुव्यवस्था फाट्यावर मारून काही गुंड प्रवृत्तीचे तरुण नशेच्या माध्यमातून अशा पद्धतीचे गुन्हे करत आहेत. प्रशासनाने या बाबीकडे दुर्लक्ष केल्यामुळे अशा घटना वारंवार घडतांना दिसून येत आहे. त्यामुळे प्रशासनाने या गुन्ह्यांकडे गांभीर्याने लक्ष देऊन गुन्हेगारांवर कठोरात कठोर कारवाई करावी.अशी मागणी अभाविप करत आहे.



## विविध वृत्त...

### 'संशोधन लेखन मसुदा' विषयावर एकदिवसीय कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**लातूर :** दयानंद एज्युकेशन सोसायटी संचलित दयानंद कॉलेज ऑफ कॉमर्स, लातूर येथील पी.जी. प्रोजेक्ट रिसर्च कमिटीच्या वतीने ''संशोधन लेखन मसुदा'' या विषयावर एकदिवसीय मार्गदर्शक सत्राचे आयोजन करण्यात आले. हे सत्र नुकतेच पार पडले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. सतीश लक्ष्मणराव कुंडलवार, सहयोगी प्राध्यापक, शिवनेरी महाविद्यालय, शिरूर अनंतपाळ यांनी संशोधन लेखनाची रूपरेषा, लेखन पद्धती, संशोधनातील महत्त्वाचे घटक तसेच संशोधन लेख सादरीकरणाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. जी.आर. लहाने, डॉ. बी.टी. चव्हाण व डॉ. एम.एस. आष्टेकर यांची विशेष उपस्थिती लाभली. प्रस्तावना डॉ. बी.जी. कळंबे यांनी केली. सूत्रसंचालन रेश्मा सय्यद यांनी केले, तर आभार प्रदर्शन वर्षा पाटील यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. विशाल वर्मा, डॉ. रूपा गिल्डा, डॉ. अनुजा कांबळे, प्रा. ऐश्वर्या कुलकर्णी, प्रा. साक्षी पाटील, प्रा. सुहाना शेख व प्रा. अमृता बनसोडे यांनी विशेष परिश्रम घेतले. हे सत्र विद्यार्थ्यांसह संशोधन करणाऱ्या अभ्यासकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरले असून, संशोधन लेखनाबाबत नवे दृष्टिकोन मिळाल्याची प्रतिक्रिया उपस्थितांनी व्यक्त केली..

### दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी, येथे मेगा रक्तदान शिबिर संपन्न

**लातूर :** ''रक्त हेच जीवन'' या विचाराची प्रचिती देणारे मेगा रक्तदान शिबिर दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर येथे उत्साहात पार पडले. दयानंद शिक्षण संस्था व संस्थेशी संलग्नित आठ महाविद्यालये तसेच एम.व्ही.पी.एम.एलुमनी पुणे यांच्या संयुक्त पुढाकारातून या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.मानवी जीवनासाठी रक्त हे अमूल्य द्रव्य असून अपघात, शस्त्रक्रिया, प्रसूती, थॅलेसेमिया व इतर गंभीर आजारांमध्ये रक्ताची तातडीची गरज भासते. कृत्रिमरीत्या रक्ताची निर्मिती शक्य नसल्याने रक्तदान हाच एकमेव पर्याय आहे. ''रक्तदान हीच सर्वश्रेष्ठ मानवसेवा'' या भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला विद्यार्थ्यांनी,प्राध्यापकवृंद आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.कार्यक्रमाचे उद्घाटन दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमणजी लाहोटी यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. यावेळी संस्थेचे सचिव रमेशजी बियाणी, सहसचिव विशाल लाहोटी,सदस्य चैतन्यजी भार्गव,सदस्य सागर मंत्री,डॉ. भालचंद्र ब्लड सेंटर चे पदाधिकारी नितीन भराडिया,श्रीकांत करवा उपस्थित होते. संस्थेशी संलग्नित विविध महाविद्यालयांचे प्राचार्य डॉ. क्रांती सातपुते, डॉ.पुनम नाथानी,डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे,डॉ. वाजीद चाउस यांचीही प्रमुख उपस्थिती होती.

### विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयाचा बाह्यरुग्ण विभाग आज बंद

**लातूर :** छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त सार्वजनिक सुट्टी असल्याने विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभाग गुरुवार, १९ फेब्रुवारी २०२६ रोजी बंद राहील. तसेच शुक्रवार, २० फेब्रुवारी २०२६ पासून बाह्यरुग्ण विभाग (ओ.पी.डी.) नियमित वेळेप्रमाणे सुरु राहील, असे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन गरड यांनी कळविले आहे. तसेच रुग्णालयाची आपत्कालीन सेवा २४ तास सुरु राहील.

### 'राजमाता जिजामाता'च्या एम. ए. एज्युकेशनच्या विद्यार्थिनीला सुवर्णपदक

**लातूर :** येथील राजमाता जिजामाता अध्यापक महाविद्यालयाची विद्यार्थिनी आरती पांडुरंग कोल्ले यांनी एम.ए. एज्युकेशन मार्च २०२५ परीक्षेत नाशिकच्या यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठात प्रथम क्रमांक पटकावत सुवर्णपदकाच्या मानकरी ठरल्या आहेत. यामुळे 'लातूर पॅटर्न'च्या यशात मानाचा तुरा रोवला गेला आहे. याबद्दल राजमाता जिजामाता अध्यापक महाविद्यालयातर्फे संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते फेटा, शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले.नाशिकच्या यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ अंतर्गत लातूरच्या राजमाता जिजामाता अध्यापक महाविद्यालयात २०२२ पासून एम.ए. एज्युकेशन केंद्र सुरू आहे. हा अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या शिक्षकांना २४ वर्षांची वेतनश्रेणी मिळते. मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून राजमाता जिजामाता अध्यापक महाविद्यालयाची विद्यार्थिनी आरती पांडुरंग कोल्ले यांनी विद्यापीठात प्रथम क्रमांक पटकावत त्या सुवर्णपदकाच्या मानकरी ठरल्या आहेत. या यशाबद्दल विद्यापीठात कुलगुरू डॉ. सोनवणे, प्र. कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, लेखाधिकारी कटलाकुटे व विभाग प्रमुख डॉ. संजीवनी महाले यांच्या उपस्थितीत दीक्षांत समारंभात सुवर्णपदक देऊन गौरविण्यात आले. या परीक्षेचा महाविद्यालयाचा शंभर टक्के निकाल लागला आहे. या यशाबद्दल महाविद्यालयातर्फे आरती कोल्ले यांचे कौतुक करण्यात आले. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, एम.ए. एज्युकेशन केंद्राच्या समन्वयक स्वाती केंद्रे, प्रा. अश्विनी केंद्रे, प्राचार्य जी. आर. मुंडे, प्रा. विजयकुमार लोहारे, परमेश्वर गित्ते, शिवकांत वाडीकर, विष्णू कराड आदी उपस्थित होते.

## देशपातळीवर लातूरचा डंका; रिलायन्स लातूर पॅटर्न व श्री त्रिपुरा कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयाचा JEE Main सत्र-१ मध्ये घवघवीत यश


**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ फेब्रुवारी :** राज्यात गुणवत्तेची परंपरा जपणाऱ्या Reliance Latur Pattern व श्री त्रिपुरा कनिष्ठ विज्ञान महाविद्यालय, लातूर यांनी यावर्षीही अभूतपूर्व यश संपादन करत महाराष्ट्रातील सर्वोत्तम निकालाची परंपरा कायम राखली आहे.

NTA द्वारे घेण्यात आलेल्या गएए चरळप २०२६ परीक्षेच्या पहिल्या सत्रात (दि. २१ ते २८ जानेवारी २०२६) देशभरातून सुमारे १४.५० लाख विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धात्मक परीक्षेतून दि. १७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत प्राप्त निकालानुसार महाविद्यालयातील खालील विद्यार्थी प्रतिष्ठित IIT-JEE Advanced परीक्षेसाठी पात्र ठरले आहेत.

यामध्ये चि. श्रीनिवास अजमेरा यांनी ९९.०५ पर्सेन्टाइल मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. तर चि. ह्दियांश सोनी (९८.५७ पर्सेन्टाइल) यांनी द्वितीय क्रमांक मिळवून उल्लेखनीय कामगिरी केली.

तसेच चि. सोहम भरोसे (९८.११), चि. सक्षम सोनवणे (९७.९९), चि. ओम लाडेकर (९७.२३), चि. अनमोल खरे (९५.५७) चि. अथर्व जामगडे (९५.१५), चि. देवानंद निकम (९४.६४), कु. स्नेहा ढमाले (९४.३७), चि. श्रेयश दंडनाईक (९३.३२), कु. प्रांजल कांबळे (९२.२५), कु. प्रणाली कुंभार (९१.४७) आदी विद्यार्थ्यांनीही उल्लेखनीय यश संपादन केले.




या यशामागे विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण परिश्रम, प्राध्यापकांचे मार्गदर्शन आणि संस्थेची शिस्तबद्ध शैक्षणिक पद्धत यांचा मोठा वाटा आहे. इयत्ता दहावीमध्ये अत्यंत सामान्य गुणवत्ता असतानाही अवघ्या दोन वर्षांत देशपातळीवर यश संपादन करणे हीच 'लातूर पॅटर्न'ची खरी ओळख असल्याचे संस्थाध्यक्ष प्रा. उमाकांत होनराव यांनी सांगितले.

यावेळी संस्थेच्या सचिव तथा प्राचार्या मा. सुलक्षणा केवळराम मॅडम, कोषाध्यक्ष मा. प्रेरणा होनराव, कार्यकारी संचालक श्री. ओंकार होनराव अकॅडेमिक प्रमुख प्रा. संगम खराबे, प्रा. सुनील कुमार वर्मा, प्रा. जितेंद्र कुमार, प्रा. विकास कुमार सोनी, प्रा. मांगीलाल चौधरी, प्रा. रोहित यादव, प्रा. मयंक कुमार, प्रा. सतिष पाटील, प्रा. प्रसाद कुलकर्णी, प्रा. मीरा मुंडे व सर्व प्राध्यापकवृंद यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

रिलायन्स लातूर पॅटर्न – शाश्वती आदर्श शिक्षणाची !

### अक्षरनंदन व SGP इंटरनॅशनल स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ फेब्रुवारी :** येथील अक्षरनंदन प्राथमिक विद्यालय व SGP इंटरनॅशनल स्कूल, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा शनिवार, दिनांक १४ फेब्रुवारी २०२६ रोजी कातळे नगर येथील नंदादीप विद्यालयाच्या प्रांगणात उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाचे उद्घाटन स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांनी केले तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी गोविंद माने होते. प्रमुख पाहुणे म्हणून नूतन जिल्हा परिषद सदस्या योगिता उमाकांत जाधव, माऊली प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा या वर्षीचे क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार प्राप्त शिक्षक डॉ. उमाकांत जाधव, गांधी चौक पोलीस स्टेशन वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक बाबू गित्ते उपस्थित होते.

याप्रसंगी व्यासपीठावर संस्था सचिव कालिदास माने, अध्यक्ष भागवतराव माने, कोषाध्यक्ष सुरेखाताई माने, प्रकाश माने, प्रकाश जाधव, प्रशासकीय अधिकारी उषा आडे व नागोराव कांबळे मुख्याध्यापिका स्मिता भोसले उपस्थित होते.

याप्रसंगी उपस्थित पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर नूतन जिल्हा परिषद सदस्य योगिता उमाकांत जाधव, डॉक्टर उमाकांत जाधव, पोलीस उपनिरीक्षक बाबू गित्ते यांनी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कलाविष्कारांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. या वार्षिक स्नेहसंमेलनाचे प्रास्ताविक संस्था सचिव कालिदास माने यांनी केले तर आभार मुख्याध्यापिका स्मिता भोसले यांनी मानले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन गणेश परळे, मीनाक्षी यादव व शिवकांत मुर्गे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाचे जेईई मेन्स परीक्षेत उज्ज्वल यश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ फेब्रुवारी :** महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर व्दारा संचलित महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान शाखेतील विद्यार्थी ठाकूर दत्ता दिगंबरसिंग (९५.०७ पर्सेंटाइल), दीक्षित वारद वसंत (८९.५१ पर्सेंटाइल), शिंदे वेदांत वसंत (८८.४६ पर्सेंटाइल) आणि जाजे वैष्णवी शिवकुमार (८१.४७ पर्सेंटाइल) यांनी जेईई मेन्स (पहिले सत्र) परीक्षेत घवघवीत गुण संपादित करून उज्ज्वल यश संपादन केले आहे.



हे सर्व विद्यार्थी सर्वसामान्य कुटुंबातील आहेत. आमच्या महाविद्यालयात घेण्यात आलेल्या नियमित तासिका, नियमित सराव परीक्षा आणि त्यातील अडचणी व उपाय योजना, संस्था पदाधिकारी, आई-वडील, प्रभारी प्राचार्य, मुख्य समन्वयक, पर्यवेक्षक, सीईटी सेल मुख्य समन्वयक, बोर्ड समन्वयक आणि विज्ञान शाखेचे सर्व शिक्षक यांच्या मार्गदर्शनामूळे हे उज्ज्वल यश प्राप्त झाले आहे अशा भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्या आहेत.

त्यांनी मिळविलेल्या या उज्ज्वल यशाबद्दल महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष माधवराव पाटील तपसेचिंचोलीकर, सचिव माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर, कार्यकारी संचालक प्रदीपकुमार दिंडेगावे आणि इतर सर्व सन्माननीय संस्था पदाधिकारी, प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. आनंद शेवाळे, मुख्य समन्वयक डॉ. भास्कर रेड्डी नल्ला, पर्यवेक्षक प्रा. नितीन वाणी, सीईटी मुख्य समन्वयक प्रा. वनिता पाटील, बोर्ड समन्वयक डॉ. गुणवंत बिरादार, स्टाफ सचिव, विभाग प्रमुख, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

## सिध्देश्वर यात्रा महोत्सवातील शेतकरी मदत व शेती माहिती कक्षाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ फेब्रुवारी :** श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या वतीने यात्रा महोत्सव पार पडत आहे. या महोत्सवाच्या निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या अंतर्गतच यात्रा महोत्सवातील शेतकरी मदत व शेती माहिती कक्षाचे उद्घाटन जिल्हा कृषी अधिक्षक आर. एस. कदम व देवस्थानचे प्रशासकीय अधिकारी सचिन जांबूतकर यांच्या हस्ते करण्यात आले.




सिध्देश्वर यात्रा महोत्सवात विविध धार्मिक, सामाजिक व मनोरंजनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. त्याच बरोबर शेतकऱ्यांसाठी विविध उपक्रमही या यात्रेदरम्यान राबविण्यात येतात. जिल्हा कृषी विभागाच्या वतीने या यात्रा महोत्सवाचे औचित्य साधून यात्रा परिसरात शेतकरी मदत व शेती माहिती कक्षाची उभारणा करण्यात आली आहे. या कक्षाचे उद्घाटन आज मंगळवार दि. १७ रोजी करण्यात आले आहे. हा उद्घाटन सोहळा जिल्हा कृषी अधिक्षक आर. एस. कदम यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी तालुका कृषी अधिकारी प्रमोद राठोड, उपाधिक्षक सूर्यकांत लोखंडे, देवस्थानचे प्रशासक सचिन जांबूतकर, कृषी अधिकारी आर. आर. येवले, विशाल झांबरे, अजित देशमुख, विनायक बारबोले, महादेव घुले अमोल बनसोडे यांची उपस्थित होती.

या माहिती कक्षाच्या माध्यमातून आधुनिक शेती तसेच उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी राबविण्यात येणारे नवनविन प्रयोग याबाबत माहिती शेतकऱ्यांना देण्यात येणार आहे. त्याचबरोबर कमी पाण्यात अधिक उत्पादन देणारी शेती कशी करावी याबाबतची माहिती अवगत करण्यात येणार आहे. सदर कक्ष सकाळी १० ते संध्याकाळी ६ या दरम्यान सुरु राहणार असून याठिकाणी कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थित राहणार आहे. या कक्षाचा लाभ जिल्ह्यातील अधिकाधिक शेतकऱ्यांनी घ्यावा, असे आवाहन कृषी विभाग व देवस्थान समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

### श्री केशवराज ज्युनिअर कॉलेजचे JEE MAINS-2026 परीक्षेत घवघवीत यश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ फेब्रुवारी :** राष्ट्रीय स्तरावर घेण्यात येणाऱ्या गएए चरळपी २०२६ या परीक्षेमध्ये भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या श्री केशवराज ज्युनिअर कॉलेज, लातूर येथील विद्यार्थी विशेष प्रविण्यासह उत्तीर्ण झाले. यामध्ये महाविद्यालयातील चि. कृष्णा शाम कच्छवे ९९.६०टक्के, चि. ईशान शशिकांत मोगरेकर ९६.३१ टक्के, चि. हर्षवर्धन लक्ष्मणराव लोमटे ९५.६४ टक्के, चि.प्रसाद गजानन चव्हाण ९२.८९ टक्के चि.श्रीनिधी योगेश ताशी ९२ टक्के, चि.आशिष बालाजी कुलकर्णी ८७.६७ टक्के, चि.रोहन विनायक गोसावी ८६.६३ टक्के, चि रमण नवनाथ गुरले ८६ टक्के, चि.सार्थक धनंजय कुलकर्णी ८५.९० टक्के, गुण मिळविले आहेत.



या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलूरकर, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रवीण सरदेशमुख, जितेश चापसी, राम कुलकर्णी, संजय गुरव, मुख्य प्रशासकीय समन्वयक प्रा. चंद्रकांत मुळे, स्थानिक समन्वय समिती अध्यक्ष धनंजय तुंगीकर, कार्यवाह शैलेश कुलकर्णी, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष गंगाधर खेडकर, कॉलेजचे प्राचार्य बालासाहेब केंद्रे, केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, विभाग प्रमुख रेखा पुरी तसेच सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

## राज्य शासनाच्या उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार – २०२५ साठी प्रवेशिका पाठविण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ फेब्रुवारी :** माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा, उत्कृष्ट छायाचित्रकार, समाज माध्यम आणि स्वच्छता अभियानाबाबत केलेल्या जनजागृतीपर लेखनासाठी पुरस्कार स्पर्धा जाहीर करण्यात येत आहे. या स्पर्धेसाठी दिनांक १ जानेवारी, २०२५ ते ३१ डिसेंबर, २०२५ पर्यंतच्या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या लेखन/छायाचित्रे/वृत्तकथा यांच्या प्रवेशिका मागविण्यात येत आहेत. प्रवेशिका पाठविण्याचा अंतिम दिनांक १५ मार्च, २०२६ असा आहे.

राज्यातील विविध भागातील स्पर्धकांनी संबंधित जिल्हा माहिती कार्यालयाकडून तर मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील इच्छुकांनी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, तळमजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२ येथून विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त करुन घ्यावयाचे आहेत. अर्जाचे नमुने वसळीं. ारहरीरीहींीर.र्सीं.ळप या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**अटलबिहारी वाजपेयी राष्ट्रीय पत्रकारिता पुरस्कार (राष्ट्रस्तरीय)**

रु.१ लाख रुपये, (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), बाळशास्त्री जांभेकर पुरस्कार (मराठी) (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), अनंत गोपाळ शेवडे पुरस्कार (इंग्रजी) (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), बाबूराव विष्णू पराडकर पुरस्कार (हिंदी) (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), मौलाना अबुल कलाम आझाद पुरस्कार(उर्दू) (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), यशवंतराव चव्हाण पुरस्कार शासकीय गट (मराठी) (माहिती व जनसंपर्क) (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), पु.ल.देशपांडे उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा पुरस्कार(राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), तोलाराम कुकरेजा उत्कृष्ट वृत्तपत्र छायाचित्रकार पुरस्कार (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), केकी मूस उत्कृष्ट छायाचित्रकार पुरस्कार शासकीय गट (माहिती व जनसंपर्क) (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), समाज माध्यम पुरस्कार (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), स्वच्छ महाराष्ट्र जनजागृती पुरस्कार (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), पत्रकार सुधाकर डोअीफोडे अग्रलेखन पुरस्कार (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र).

**विभागीय पुरस्कार**

दादासाहेब पोतनीस पुरस्कार, (नाशिक विभाग)

५१ हजार रुपये , (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र,

या व्यतिरिक्त रुपये १० हजार दै.गावकरीने पुरस्कृत केले आहेत.), अनंतराव भालेराव पुरस्कार, (छत्रपती संभाजीनगर आणि लातूर विभाग) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), आचार्य अत्रे पुरस्कार, (मुंबई विभाग) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), नानासाहेब परूळेकर पुरस्कार, (पुणे विभाग) ५१ हजार रुपये, (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), शि.म.परांजपे पुरस्कार, (कोकण विभाग) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), ग.गो.जाधव पुरस्कार, (कोल्हापूर विभाग) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), लोकनायक बापूजी अणे पुरस्कार, (अमरावती विभाग) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), ग.त्र्यं.माडखोलकर पुरस्कार, (नागपूर विभाग) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र)

# मच्छिंद्र नागरगोजे यांनी निवडणुकीतील आश्वासनाची केली वचनपूर्ती

## सात दिवसांतच राचन्नावाडी सांडोळ रस्त्यावरील पुलाचे भूमिपूजन, सर्व स्तरातून कौतूक

**तभा वृत्तसेवा**

**चाकूर, दि. १८ फेब्रुवारी :** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत मच्छिंद्र नागरगोजे यांनी राचन्नावाडी येथील जनतेला दिलेल्या आश्र्वासनाची निवडून आल्यानंतर अवघ्या सात दिवसांतच पुलाच्या कामाचे भुमीपुजन करून कामाला सुरुवात करण्यात आली असून दिलेल्या आश्र्वासनाची पुर्तता केली आहे.

राजकारणात दिलेली आश्र्वासने पाळायची नसतात अशी राजकीय परिस्थिती अनुभवाची असताना रोहिणा पंचायत समिती गणाच्या जयश्री नागरगोजे या नवनिर्वाचित सदस्यांनी निवडणूकीत दिलेल्या आश्र्वासनाची सोमवारी (ता. १६) रोजी पूर्तता करत पुलाच्या बांधकामाचे भूमिपूजन करुन राचन्नावाडी (ता.चाकूर) येथील मतदारांना सुखद धक्का दिला आहे.

नुकत्याच झालेल्या निवडणुक प्रचारादरम्यान राचन्नावाडी येथील महिलांनी व पुरूषांनी राचन्नावाडी सांडोळ रस्त्यावरील पुलाची उणीव बोलून दाखवली आणि जे उमेदवार या कामाची जबाबदारी घेतील त्यांनाच मतदान मिळेल अशी भूमिका घेतली असता माजी जिल्हा परिषद सदस्य सुदर्शन मुंढे यांचे वडील निवृत्ती मुंढे यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या उमेदवारांच्या वतीने सदर पुलाच्या बांधकामाची जबाबदारी घेऊन शब्द दिला आणि पाठीशी उभे राहण्याचे आवाहन केले. त्यानुसार निवडणूक पार पडली आणि मोठ्या मताधिक्याने राष्ट्रवादीचे उमेदवार विजयी झाले. सात तारखेला मतदान, नऊ तारखेला निकाल तर सोळा तारखेला कामाचा शुभारंभ. या तत्परतेने नागरिक भाराऊन गेले आहेत. निवडणूकीत गावकऱ्यांनी दिलेल्या साथीच्या जोरावर विजयश्री मिळाली म्हणून नवनिर्वाचितांनी मतदारांचे आभार मानले तर गावकऱ्यांनी बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले या संत वचनाप्रमाणे आपण निवडलेल्या लोकप्रतिनिधींचा जाहीर सत्कार केला आणि भविष्यात अशाच कामांची अपेक्षा व्यक्त केली. यावेळी मच्छिंद्र नागरगोजे, उषा कांबळे ,चेअरमन शिवाजी वागलगावे, पोलिस पाटील गुणवंत पाटील, सरपंच पती संपत मलिशे, ग्रामपंचायत सदस्य भानुदास वागलगावे, मजी सरपंच बंकट मलिशे, ग्रामपंचायत सदस्य मारोती पाटील, बालाजी मलिशे, मारोती माडगे, नरसिंग वागलगावे, शंकर सुरवसे, दगडू सुरवसे, रामकिशन चिंचोळे, काशिनाथ पाटील, संजेराव चिंचोळे, पांडुरंग पाटील, केशव सुरवसे, सोमनाथ वागलगावे, संतराम वागलगावे, बळीराम वागलगावे, रामकिशन वागलगावे, गिरीधर सुरवसे, सुदर्शन नंदगावे, दिपक वागलगावे, बालाजी सागावे, बालाजी वागलगावे आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने या भुमीपुजनास उपस्थित होते.



### सांडोळ रस्त्यावरील आवश्यक पुल

सांडोळ जाणाऱ्या वहिवाटेच्या रस्त्यावर तिरु नदीला मिळणारा मोठा ओढा आहे. पाण्याची पातळी आणि गती जास्त असल्याने गत पावसाळ्यात दोघे वाहून जाण्याचा धोका निर्माण झाला होता.महिलांना शेताकडे जाण्यासाठी खुप त्रास होता ते काम नागरगोजे यांनी सुरू केल्याने महिलांनी जयश्री नागरगोजे यांचे आभार मानले.राचन्नावाडी गावांतील लोकांची पुला संदर्भात अनेक वर्षांपासूनची मागणी होती. आश्र्वासनं भरपूर मिळाली मात्र पुर्तता झाली नव्हती. निवृत्ती मुंढे, मच्छिंद्र नागरगोजे, सुदर्शन मुंढे यांनी जबाबदारी घेतली अन् ती पूर्णही केले आणि कामाला सुरुवात झाली असल्याने मच्छिंद्र नागरगोजे यांचे सर्व स्तरातून कौतूक केले जात आहे.

## संक्षिप्त...

### डॉ.होमी भाभा बाल वैज्ञानिक संत ज्ञानेश्वर विद्यालयाचे यश

**अहमदपूर :** बॉम्बे टीचर्स असोसिएशन तर्फे घेण्यात आलेल्या डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धा परीक्षेच्या दुसऱ्या फेरीचा निकाल नुकताच जाहीर झाला असून इयत्ता सहावीच्या दोन विद्यार्थ्यांची निवड तिसऱ्या व चौथ्या फेरीसाठी झाली आहे. त्यात श्रेयश अमोल देशमुख व अभिजीत गोविंद चाटे या दोन विद्यार्थ्यांची कृती संशोधन (प्रबंध) व मुलाखतीसाठी निवड झाली आहे. डॉ.होमी भाभा बाल वैज्ञानिक परीक्षा ही विज्ञान विषयातील कठीण मानली जाणारी परीक्षा आहे.याची प्रथम फेरी म्हणजे लेखी चाचणी, द्वितीय फेरी म्हणजे प्रात्यक्षिक परीक्षा, तृतीय फेरी म्हणजे कृती संशोधन व चौथ्या फेरीत मुलाखत असते. श्रेयस व अभिजीत या विद्यार्थ्यांनी लेव्हल दोन मध्ये यश संपादन करून बाल वैज्ञानिक परीक्षेत भक्कम पाऊल टाकले आहे. या गुणवंत विद्यार्थ्यांना प्राजक्ता भोसले, प्रथमेश लाडके, वैष्णवी शिंगडे,नरेश वाघमारे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले आहे. या यशाबद्दल संस्थाध्यक्ष गणेश दादा हाके पाटील, संस्था सचिव प्राचार्या रेखाताई हाके पाटील उपाध्यक्षा एडवोकेट मानसी हाके, मुख्याध्यापक आशा रोडगे, मुख्याध्यापक मीना तोवर सह सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व सर्व पालक यांनी अभिनंदन व कौतुक केले आहे.

### बाजारादिवशी कारवाई, वाहनधारकांची कोंडी; रोडवर आरटीओंचा खडा पहरा



**किनगाव :** किनगाव येथे दर बुधवारी आठवडी बाजार भरतो, बाजारादिवशी अहमदपूर अंबाजोगाई हायवेवर आरटीओच्या खड्यापाहार्याने वाहनधारकांची तारामाळ उडत आहे. त्यामुळे वाहनधारकांची धावपळ व धास्तीने अपघाताची भीती वर्तवली जात आहे. हा परिसर तसा ग्रामीण असून शेतकरी, शेतमजूर, मिस्त्री, कामगार असा असून कोणाच्या गाडीचे लायसन नसते तर कोणाकडे वाहनधारकाचे लायसन नसते कोणाच्या मोटरसायकलला नंबर प्लेट नसते अशा घाही गडबडीतील दंड बसतो. मग आरटीओ ची गाडी समोर दिसली की, तारा माळ उडत आहे. मग या रस्त्याने पळू की, त्या रस्त्याने पळू असे भयभीत होऊन सैरावैरा धावत सुटल्याने अपघात होण्याची भीती वर्तवली जात आहे .


### राज्यस्तरीय गायन स्पर्धेची भजन संध्याने सांगता




**औसा :** औसा येथील माऊली प्रतिष्ठान आणि माऊली संगीत विद्यालयाच्या वतीने दोन दिवस राज्यस्तरीय भजन गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. भजन सम्राट पं. बाळासाहेब वाईकर आणि पं. विठ्ठलराव जगताप यांच्या भजन संध्याने सांगता झाली. या स्पर्धेत ११० स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. बाल गटातील १५ तर खुल्या गटातील १९ विजेत्यांना विभागून रोख रक्कम बक्षीस आणि प्रमाणपत्र देण्यात आले. बालगटातील रितेश कदम,सृष्टी श्रृंगारे, प्रयूता मुनी,स्वरांजली पांचाळ,मानवी भोसले,अनुजा करपुडे, शौर्य इंजे, ज्ञानेश्र्वरी चव्हाण, श्रावणी कलशेट्टी, स्नेहा मुरकुटे, प्रथमेश भांडेकरी, प्रथमेश बिराजदार, शौर्य नलगे, आनंदी गुंडीबोयनेआणि नरेंद्र ढोले यांच्यासह खुल्या गटातील १९ विजेत्यांना बक्षीस वितरण करण्यात आले.या कार्यक्रमाला मंडळाचे पदाधिकारी सुनील हुकिरे,जनार्दन गुडे , नगरसेवक आकाश उटगे,व्यंकटराव राऊत राव, हणमंत लोकरे यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी विजयकुमार धायगुडे, नागनाथ पाटील आणि वेदांग धाराशिवे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. प्रा. युवराज हालकुडे यांनी सूत्रसंचालन केले तर पं. शिवरुद्र स्वामी यांनी आभार मानले

### दीपक आचार्य यांना पीएच.डी.पदवी प्रदान

**पानगांव :** येथील रहिवाशी दीपक तुकाराम आचार्य यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने समाजशास्त्र विषयात नुकतीच पीएच.डी.पदवी प्रदान करण्यात आली.



ऑनलाईन मौखिक परीक्षेवेळी अध्यक्ष म्हणून डॉ.बाबासाहेब आंबडेकर मराठवाडा विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागातील प्रा.लक्ष्मणसिंग साळोखे,उपस्थित होते.बहिस्थ परीक्षक म्हणून डॉ.ज्ञानेश्र्वर चव्हाण ' .तर प्रा.डॉ. कालिदास भांगे हे संशोधक मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. डॉ. दीपक आचार्य यांच्या संशोधन प्रबंधाच्या विषयांमध्ये ग्रामीण भागातील शेतीवर काम करणाऱ्या सालगड्यांच्या समस्यांचा समाजशास्त्रीय अभ्यास (लातूर जिल्हा संदर्भ) हा होता. हे संशोधन कार्य करण्यासाठी प्रा.डॉ. लक्ष्मणसिंग साळोक,प्रा.डॉ. संजय साळुंखे ' प्रभारी कुलगुरु प्रा.डा. वारिसक सरवदे . प्रा.डॉ. संजय सावेल, प्रा.डॉ. कोल्हापूरे, प्रा.डा. डॉ. जगन कराडे इत्यादींचे मार्गदर्शन लाभले. दीपकक आचार्य यांनी पीएच डी पदवी प्रदान केल्या बद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन,कौतुक होत आहे.

# राष्ट्रीय बाल परिषद राज्यातील शाळेत यशवंत विद्यालयाचा सहभाग

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. १८ फेब्रुवारी :** राष्ट्रीय स्तरावर आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय बाल परिषदेमध्ये अहमदपूर येथील यशवंत विद्यालयाने उल्लेखनीय सहभाग नोंदवत तालुक्याचा मान उंचावला आहे. सलाम मुंबई फाउंडेशन आयोजित राष्ट्रीय बाल परिषद मध्ये महाराष्ट्र राज्यातून केवळ नऊ शाळांची निवड झाली होती. त्यामध्ये यशवंत विद्यालयाचा समावेश होणे ही अभिमानास्पद बाब ठरली आहे.

या राष्ट्रीय बाल परिषदेत देशातील १० राज्यातून १,६०,००० हजार विद्यार्थी, शिक्षक बांधव, व अधिकारी यांनी सहभाग नोंदविला होता.यात विद्यालयातील कु. समीक्षा तुडमे हिला थेट संवाद साधण्याची संधी मिळाली. तिने शिक्षण विभागाच्या प्रतिनिधींना विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सुविधा, आरोग्यदायी वातावरण व व्यसनमुक्ती संदर्भातील उपक्रमांबाबत थेट प्रश्र्न विचारले. तिच्या आत्मविश्र्वासपूर्ण मांडणीमुळे विद्यालयाच्या कार्याची विशेष दखल घेण्यात आली.

यशवंत विद्यालयातील कलाशिक्षक महादेव खळुरे यांनी व्यसनमुक्तीसाठी उपक्रम राबविले असून ऑल इंडिया रेडिओ च्या माध्यमातून सहा वेळा व्यसनमुक्ती वर संवाद तसेच विद्यार्थ्यांना सुद्धा आकाशवाणीवर संवाद साधण्याची संधी उपलब्ध करून देणे,आरोग्य विभागामार्फत जनजागृती रॅली, जिल्हास्तरीय वेबीनार,कार्यशाळा, तालुकास्तरीय कार्यशाळेतील सहभाग, पोस्टर जनजागृती रॅली, जागतिक तंबाखू विरोधी दिन, जागतिक कर्करोग दिन, डॉक्टर डे, या दिनाच्या औचित्याने ज्वलंत सामाजिक समस्येवर जनजागृती करण्यात आले. यामुळे तंबाखूमुक्त शाळा अभियान तसेच व्यसनमुक्ती जनजागृतीसाठी आयोजित विविध उपक्रमांची यशोगाथा परिषदेत व्हिडिओ व ऑडिओच्या माध्यमातून सादर करण्याची संधी प्राप्त झाली. विद्यार्थ्यांमध्ये व्यसनांविषयी जागरूकता निर्माण करणे, पालकांपर्यंत संदेश पोहोचवणे, शपथ विधी, पत्रलेखन, चित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा आदी उपक्रमांमुळे विद्यालयाने एक आदर्श निर्माण केला आहे.

विद्यालयाच्या या सातत्यपूर्ण आणि प्रभावी कार्याची दखल घेत राष्ट्रीय बाल परिषदेत सहभागाची संधी देण्यात आली.

सलाम मुंबई फाउंडेशनच्या दिनांक ६ फेब्रुवारी रोजी झालेल्या ऑनलाईन राष्ट्रीय बाल परिषदेत उल्लेखनीय सहभाग नोंदवल्याबद्दल लातूर जिल्हा समन्वयक दिप्तीशा शिंदे यांनी राष्ट्रीय बालपरिषदेतील सहभागी चैतन्य उगले, आदिती गिरी, आराध्या पाटील, स्नेहल साखरे व समीक्षा तुडमे या पाच विद्यार्थ्यांसह उपक्रमशील कलाशिक्षक महादेव खळुरे यांचे विद्यालयात येऊन बक्षीस देऊन गौरव केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उप मुख्याध्यापक माधव वाघमारे सूत्रसंचालन गुरप्पा बावगे तर आभार खळुरे यांनी मानले.

या यशाबद्दल राज्य शैक्षणिक संशोधन व परीक्षा परिषद पुणे येथिल कला व क्रीडा विभागाचे उपसंचालक डॉक्टर अरुण जाधव, लातूर डायटचे प्राचार्य डॉ मारोती सलगर, माध्यमिक शिक्षणाधिकारी दत्तात्रय मठपती,प्राथमिक शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे,शल्य चिकित्सा विभागाचे डॉक्टर उतीकर,गटशिक्षणाधिकारी रामलिंग काळे,बबनराव ढोकाडे,सलाम मुंबई फाऊंडेशनचे दिपक पाटील,लातूरचे समन्वयक दीप्तीशा शिंदे,सारीका कदम, विशेष साधन व्यक्ती श्रीमती इंदुमती जोगदंड, टागोर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ.अशोक सांगवीकर,सचिव डी.बी. लोहारे गुरुजी, उपाध्यक्ष डॉ.भालचंद्र पैके,सहसचिव डॉ.सुनिता चवळे,प्राचार्य गजानन शिंदे, उपमुख्याध्यापक माधव वाघमारे, पर्यवेक्षक रामलिंग तत्तापुरे,शिवाजी सुर्यवंशी,अरुण मोरे,मुख्य लिपिक राजेंद्र सूर्यवंशी यांनी अभिनंदन केले.

विद्यालयाचा हा सहभाग इतर शाळांसाठी प्रेरणादायी ठरत असून व्यसनमुक्त आणि सुदृढ समाज घडविण्याच्या दिशेने टाकलेले हे महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे.

### पाणी सोडणाऱ्या कर्मचाऱ्यांची उपासमार; पाच महिन्यांपासून रखडले मानधन; काम बंदचा इशारा

**लातूर :** महापालिकेच्यावतीने शहराच्या घरोघरी नळाद्वारे पाणी सोडण्यात येते. जे कर्मचारी पाणी सोडतात, त्यांनाच मागील पाच महिन्यांपासून पगार देण्यात आल्या नाहीत. यामुळे अशा सुमारे ७० कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे. महापालिकेने लवकर पगार करावा, अशी मागणी करीत मंगळवारी (दि.१७) सर्व कर्मचाऱ्यांनी महापालिकेत येऊन आयुक्तांशी चर्चा केली. पगार लवकर दिला नाही तर काम बंद करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. शहरवासियांना नियमितपणे पाणी सोडणाऱ्या महापालिकेच्या सुमारे ७० कर्मचाऱ्यांना मागील पाच महिन्यांपासून पगार देण्यात आला नाही. एवढे दिवस पगार रखडल्याने अनेक कर्मचाऱ्यांना सावकारांचे उंबरठे झिजविण्याची वेळ आली आहे. तब्बल पाच महिन्यांपासून पगार नसल्याने अनेकांना उसनवारीवर चरितार्थ भागवावा लागत आहे. तरीही महापालिका प्रशासनाला जाग येत नाही. यामुळे मंगळवारी पाणी सोडणारे सर्व कर्मचारी महापालिकेत जमा झाले होते. पालिका आयुक्त मानसी यांची भेट घेऊन पगारी करण्याची मागणी त्यांनी केली. येत्या दोन दिवसांत पगारी न केल्यास कामबंद ठेवण्याचा इशाराही या कर्मचाऱ्यांनी दिला आहे.

# उदगीर येथील बसस्थानक पुर्नबांधणी कामासाठी ३ कोटी ५० लक्ष रुपयाचा निधी मंजूर

## माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. १८ फेब्रुवारी :** उदगीर शहरात गेल्या वर्षभरापासून अत्याधुनिक बस स्थानकाचे काम सुरू असून यामध्ये राहिलेल्या सुविधा व उदगीर व जळकोट मतदार संघात ये - जा करणाऱ्या महामंडळाच्या एस.टी. बसेसची कमतरता आदीसह राहिलेले उर्वरित प्रश्र्न तात्काळ सोडून उदगीर व जळकोट मतदार संघातील प्रवाशांची होणारी गैरसोय दूर करावी अशी मागणी माजी मंत्री तथा उदगीर जळकोट मतदार संघाचे आमदार संजय बनसोडे यांनी राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची मंत्रालयात भेट घेऊन केली होती. त्यांच्या मागणीला यश आले असुन उदगीर येथील बसस्थानक पुर्नबांधणी कामासाठी ३ कोटी ५० लक्ष रुपयाचा निधी मंजूर करण्यात आला असल्याची माहिती माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांनी दिली आहे.

उदगीर मतदार संघ हा तीन राज्याच्या सीमेवर असल्याने येथे नागरिकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते.

या निधीमुळे उदगीर येथील बसस्थानकाचे काम लवकर होवून प्रवाशांच्या सेवेत अत्याधुनिक बसस्थानक निर्माण होणार आहे. यामुळे विद्यार्थी व नागरिकांची सोय होईल असा विश्र्वास आ.संजय बनसोडे यांनी व्यक्त केला आहे.

याचबरोबर महामंडळाच्या उपलब्ध असणाऱ्या बसेस ह्या कमी पडत आहेत तर काही बसेस नादुरुस्त व काही मोडकळीस आले असल्याने या भागातील प्रवाशांना प्रवास करताना अडचण निर्माण होत आहे. उदगीर व जळकोट शहरात बस स्थानकाचे काम सुरू असून त्या कामाचा आढावा घेऊन राहिलेले उर्वरित प्रश्र्न सोडवणार असल्याचेही आ.संजय बनसोडे यांनी सांगितले आहे.

उदगीर बसस्थानकाला निधी मंजूर केल्याबद्दल परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे आ.संजय बनसोडे यांनी आभार व्यक्त केले आहेत तर उदगीर बसस्थानकाला निधी मंजूर करुन घेतल्याबद्दल आ.संजय बनसोडे यांचे उदगीर मतदार संघातील जनतेने अभिनंदन करुन आभार व्यक्त केले आहेत.

### प्रियंका मुंढेचे तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत सुयश

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. १८ फेब्रुवारी :**सार्वजनिक शिवजन्मोत्सव समिती उदगीरच्या वतीने आयोजित केलेल्या आणि पंचायत समिती उदगीर येथे संपन्न झालेल्या तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत टाइम्स पब्लिक स्कूल उदगीरच्या इयत्ता ८ वी च्या वर्गात शिकणारी प्रियंका ज्ञानोबा मुंढे हिने घवघवीत यश मिळवले. प्रियंकाच्या या यशाबद्दल आयोजित बक्षीस वितरण समारंभाच्या कार्यक्रमात महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध शिवशाहीर अरविंद घोगरे व उदगीर तालुक्याचे तहसीलदार राम बोरगावकर यांच्या शुभ हस्ते व अनेक मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये २०००/- रोख रक्कम,दोन हजार रु. व प्रमाणपत्र देऊन प्रियंका मुंढेचा सत्कार करण्यात आला. प्रियंका ही गट साधन केंद्र उदगीर येथील विषयसाधनव्यक्ती डॉ. ज्ञानोबा मुंढे यांची मुलगी आहे. प्रियंकाच्या या यशाबद्दल टाइम्स पब्लिक स्कूल उदगीरचे अध्यक्ष ईश्वरप्रसाद बाहेती,सेक्रेटरी विजयकुमार कप्पीकेरे, कोषाध्यक्ष मंगला कप्पीकेरे, प्राचार्य अभिजित नळगीरकर, उपप्राचार्य शिवकांता शेटकार,मार्गदर्शक शिक्षक स्वाती पामपट्टीवार, देविदास गायकवाड, अर्जुन शेकसारे, नंदकुमार पाटील, पांडुरंग काजबा, एम एस खान, प्रशांत तगरे, अँथनी राहेल, फइम शेख, नम्रता पाटील,बबिता मसगले, मधुमती बिरादार, काव्या सोंत व सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले.

# विद्यार्थ्यांच्या अंगी सामाजिक उत्तरदायित्व पार पाडण्याची जाणीव गरजेची - माजी प्राचार्य शिवाजीराव जाधव

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. १८ फेब्रुवारी :** महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या अंगी आपले दैनंदिन अध्ययन व करिअर सिद्धी यासोबतच सामाजिक उत्तरदायित्व पार पाडण्याची जाणीव निर्माण होणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन शारदोपासक शिक्षण संस्थेचे संचालक तथा माजी प्राचार्य शिवाजीराव जाधव यांनी केले.




तालुक्यातील औराद शहाजनी येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या मौजे तांबरवाडी, ता.निलंगा येथे संपन्न विशेष वार्षिक श्रमसंस्कार शिबीराच्या दि.१७ फेब्रुवारी रोजी आयोजित समारोप कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.शंकर कल्याणे होते. व्यासपीठावर शारदोपासक शिक्षण संस्थेचे संचालक मडोळय्या मठपती, मुख्याध्यापक व्यंकट जाधव, चंद्रकांत वलांडे, दयानंद मठपती, रामभाऊ बिरादार इत्यादी उपस्थित होते.

पुढे बोलताना शिवाजीराव जाधव यांनी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाची देदीप्यमान वाटचाल व आपल्या सेवाकाळातील विविध अनुभव सांगितले. समाजशील व्यक्तिमत्त्व, शिस्त, स्वावलंबन, श्रमसंस्कार, आपुलकी इत्यादी सद्गुणांच्या जोपासनेत रासेयोचे योगदान मोलाचे आहे. मन परिवर्तन, ग्रामविकास, कौशल्य विकास याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे प्रबोधनपर गीत सादर केले. अध्यक्षीय समारोप प्र.प्राचार्य डॉ.शंकर कल्याणे यांनी केले. याप्रसंगी जि.प.प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक दयानंद मठपती, रामभाऊ बिरादार, माधव सावरे, आदेश हुबारे, गायत्री पुरी, अनन्या मोरे, रोहिणी कांबळे, जयश्री डोंगरगावे, शिवकांता सावरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोहिणी कांबळे व डॉ.विनोद जाधव यांनी केले. रासेयो शिबीराचे अहवालवाचन रा.से.यो.कार्यक्रमाधिकारी डॉ.विनोद जाधव यांनी केले. उपस्थितांचे आभार रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी डॉ.सुचिता किडीले यांनी मानले. प्रस्तुत शिबीर समारोप कार्यक्रमास डॉ.जाफर चौधरी, डॉ.सचिन हंचाटे, प्रो.मोहन बंडे, डॉ. आनंद मुसळे, डॉ.विजयकुमार पवार, डॉ.अशोक नारनवरे, प्रा.बलभीम सातपुते, प्रशांत मरगणे, विलासराव बिरादार, राजेंद्र बेलुरे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, रा.से.यो. स्वयंसेवक व ग्रामस्थ मोठ्या संख्येत उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजनेच्या तांबरवाडी येथील सात दिवशीय निवासी शिबीरात सेंद्रिय शेती, आर्थिक साक्षरता, महिला सक्षमीकरण, अंधश्रद्धा निर्मूलन व व्यसनमुक्ती, नेत्रदान व देहदान, सांस्कृतिक कार्यक्रम, समाज प्रबोधनपर कीर्तन व भारूड, पशू आरोग्य तपासणी इत्यादी सामाजिक उपक्रमांसह श्रमदान, वृक्षारोपण, शाळा व परिसर स्वच्छता करण्यात आले. यावेळी ग्रामस्थांनी मौलिक सहकार्य केले.

**जाहीर समन्स प्रसिध्दीकरण**

नियमित दिवाणी दावा क्र. ५५१/२०२४
पुढील नेमलेली तारीख :-०/०५/२०२६
निशान क्र. ९

**बार्शी येथील मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, यांचे न्यायालयात**

बियामा इरफान अलुरे (विवाहानंतरचे नांव),
बियामा म. हनिफ लांडगे (विवाहापुर्वीचे नांव),
वय- ३१ वर्षे, धंदा- घरकाम, रा. कालन गल्ली, आझाद चौक, औसा, ता. औसा, जि. लातुर. ह.मु. ७०७, महेदी नगर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर — वादी

विरुध्द

इरफान मुस्तफा अलुरे, वय- ३६ वर्षे,
धंदा- ड्रायव्हींग, रा. कालन गल्ली,
आझाद चौक, औसा, ता. औसा, जि. लातुर — प्रतिवादी

ज्याअर्थी यातील वादी यांनी वादी व प्रतिवादी यांचेतील दि. १७/०४/२०१३ रोजीचे मुस्लिम धर्म शास्त्राप्रमाणे झालेल्या विवाहाचे विवाह विच्छेदन (तलाक) होऊन मिळणेकरीता दावा दाखल केला असून, प्रतिवादी हे दाव्यात नमुद केलेप्रमाणे नमुद पत्यावर राहत असून देखील सदर दाव्याचे समन्स अदयाप प्रतिवादी यास वजावणी न झाल्याने वादी यांनी दि. २२/१२/२०२५ रोजी या मे. न्यायालयात प्रतिवादीस प्रस्तुत प्रकरणाचे समन्स जाहीर प्रसिध्दीकरणाद्वारे प्रसिध्द करण्याचा अर्ज दाखल केल्याने व सदर प्रकरणाची पुढील तारीख दि.०१/०४/२०२६ अशी नेमलेली असून, यातील प्रतिवादी याने वादीचे दाव्यास स्वतः अथवा विधीज्ञांमार्फत हजर राहुन म्हणणे दाखल करावे.

अन्यथा, सदर वादीचे दाव्यायावत प्रतिवादी याची कोणतीही कसलीही हरकत, तक्रार नाही, असे समजण्यात येऊन प्रतिवादी विरुध्द योग्य ते आदेश पारीत करण्यात येतील. त्यामुळे प्रतिवादी याने सदर प्रकरणातील जाहीर प्रसिध्दीकरणापासून ३० दिवसाच्या आत किंवा पुढील नेमलेल्या दि.०१/०४/२०२६ या तारखेस न्यायालयात हजर राहुन कागदपत्रांसह लेखी हरकत नोंदवावी. अन्यथा प्रतिवादी याची कसलीही हरकत नाही, असे समजुन सदर प्रकरणी न्यायालय पुढील योग्य ते निर्णय पारीत करतील.

हे जाहीर प्रसिध्दीकरण दिले असे. दि. १८/०२/२०२६.

**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, बार्शी**

कोर्ट शिक्का

**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, बार्शी**

CMYK

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## रायखेल येथे शालेय व्यवस्थापन समितीचे नव्याने गठन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ फेब्रुवारी -**
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रायखेल येथील शालेय व्यवस्थापन समितीचा कार्यकाल संपल्याने सन २०२६ ते २०२८ या कालावधीसाठी नवीन समितीची निवड करण्यात आली.

पालकांच्या सर्वसाधारण सभेत समितीचे गठन करण्यात आले. अध्यक्षपदी विश्वनाथ भैय्या जंगाले, तर उपाध्यक्षपदी रेश्मा खोसे यांची निवड झाली.

सदस्य म्हणून शितल लक्ष्मण गायकवाड, विजया दयानंद दांगट, लक्ष्मण कांबळे, श्रीकृष्ण बापूराव मगर, इर्शाद फिरोज शेख यांची पालक प्रतिनिधी म्हणून निवड करण्यात आली. शिक्षक प्रतिनिधी म्हणून सुवर्णा पवार, विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून आयुष हनुमंत मगर व समीक्षा शिवाजी मगर यांची निवड झाली. शाळेचे मुख्याध्यापक हे पदसिद्ध सचिव राहणार आहेत.

नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयंत सरवदे यांनी केले, तर मुख्याध्यापक खंडू माळी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी पालक, ग्रामस्थ व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## घरपोच सेवा देणे हा लोकसेवा हक्क आयोगाचा प्रमुख उद्देश : आयुक्त जाधव

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ फेब्रुवारी -**
सर्वसामान्य ग्रामस्थांना शासनाच्या सेवा वेळेत व घरपोच पद्धतीने उपलब्ध करून देणे हा लोकसेवा हक्क आयोगाचा प्रमुख उद्देश असल्याचे प्रतिपादन किरण जाधव यांनी केले.



आयुक्त जाधव यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव येथे भेट देऊन महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत महसूल शाखेमार्फत दिल्या जाणाऱ्या विविध सेवांचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी किर्ती किरण पूजार, मैनाक घोष, ज्योती पाटील व स्वाती शेंडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत १५० दिवसांच्या कार्यालयीन मूल्यमापनात जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव यांना राज्यात तिसरा क्रमांक मिळाल्याबद्दल आयुक्तांनी जिल्हाधिकारी व सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. तसेच नागरिकांना तत्पर सेवा दिल्याबद्दल कळंब तहसील कार्यालय, परंडा तहसील कार्यालय तसेच वाशी पंचायत समिती येथील अधिकाऱ्यांचा प्रमाणपत्र व पुष्प देऊन सत्कार करण्यात आला.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ नुसार जाहीर सेवांची पूर्तता विहित कालमर्यादेत करणे संबंधित विभागासाठी बंधनकारक असून, विलंब झाल्यास जबाबदारी निश्चित केली जाईल, असेही आयुक्तांनी स्पष्ट केले. सेवा अर्जांची वेळेत नोंद, निर्धारित मुदतीत निकाली काढणे, अपील प्रक्रिया व पारदर्शक माहिती देण्याबाबत काटेकोर अंमलबजावणीच्या सूचना जाधव यांनी दिल्या.

जिल्हा प्रशासनाने विकसित केलेल्या व्हॉट्सप चॅटबोट व 'तुळजाई' तक्रार नोंदणी पच्या माध्यमातून नागरिकांना सुलभ सेवा उपलब्ध करून दिल्याबद्दल आयुक्तांनी विशेष कौतुक केले. जिल्हाधिकारी किर्ती किरण पूजार यांनी या डिजिटल उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. बैठकीस विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

## तृतीयपंथीय सक्षमीकरणाचा आदर्श उपक्रम
## 'आपले सरकार' सेवा केंद्रास आयुक्तांची भेट



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ फेब्रुवारी -**
किरण जाधव यांनी १७ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव परिसरातील 'आपले सरकार' सेवा केंद्रास भेट देऊन कामकाजाची माहिती घेतली. यावेळी किर्ती किरण पूजार, डॉ. मैनाक घोष, ज्योती पाटील तसेच स्वाती शेंडे आदी उपस्थित होते.



जिल्ह्यातील तृतीयपंथीयांना रोजगाराच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने जिल्हा प्रशासनाने महत्त्वपूर्ण पुढाकार घेतला आहे.

त्याअंतर्गत देवांशी प्रकाश काकडे या तृतीयपंथीय व्यक्तीस दि.१ मे २०२५ रोजी 'आपले सरकार' सेवा केंद्राचा परवाना देण्यात आला. या माध्यमातून तृतीयपंथीय सक्षमीकरणाचा आदर्श उपक्रम राबविण्यात येत आहे.

आयुक्त जाधव यांनी केंद्राच्या कामकाजाचा आढावा घेतला असता, दि. १ मे २०२५ पासून आतापर्यंत विविध प्रमाणपत्रांचे मोठ्या प्रमाणावर वितरण झाल्याची माहिती देवांशी काकडे यांनी दिली. त्यामध्ये वय, अधिवास व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्रे २४९, अल्पभूधारक प्रमाणपत्रे १५, भूमिहीन प्रमाणपत्रे ७, जात प्रमाणपत्रे १०२, आर्थिक दृष्ट्या मागास (राज्य) प्रमाणपत्रे ४२ व (केंद्रीय) ३६, सर्वसाधारण प्रतिज्ञापत्रे १२२, उत्पन्न प्रमाणपत्रे १,०४१, श्रावणबाळ योजनेची प्रमाणपत्रे २२, नॉन-क्रीमीलेअर प्रमाणपत्रे १५२ तसेच केंद्रीय जात प्रमाणपत्रे २४ वितरित करण्यात आल्याची नोंद आहे.

तृतीयपंथीयांना संधी देत प्रशासनाने सामाजिक समावेशकतेचा आदर्श निर्माण केला असून, 'आपले सरकार' सेवा केंद्राच्या माध्यमातून नागरिकांना वेळेत व पारदर्शक सेवा उपलब्ध होत असल्याचे यावेळी स्पष्ट झाले.

## स्वयंशासन दिन व निरोप समारंभ संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१८ फेब्रुवारी -**
उमरगा येथील जिल्हा परिषद हायस्कूलमध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांचा स्वयंशासन दिन व निरोप समारंभ उत्साहात संपन्न झाला. हा कार्यक्रम मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा शकुंतला मोरे व सुजाता मोरे उपस्थित होत्या.

प्रमुख पाहुणे म्हणून महंमद रफी शेख, बशीर शेख, विद्यानंद सुत्रावे व धनराज तेलंग यांनी उपस्थिती लावली.

स्वयंशासन दिनानिमित्त दहावीच्या विद्यार्थ्यांनी एक दिवस शाळेचा कारभार सांभाळत विविध पदांची जबाबदारी पार पाडली. मुख्याध्यापक म्हणून माहीन शानेदिवान व आर्शियान शेख, उपमुख्याध्यापक म्हणून अश्विनी जाधव, तर पर्यवेक्षक म्हणून अफसाना नदाफ यांनी कामकाज पाहिले. विद्यार्थ्यांना शाळा चालवण्याचा अनोखा व नाविन्यपूर्ण अनुभव मिळाला.

शैक्षणिक गुणवत्तेतील उत्कृष्ट कामगिरीबद्दल 'बेस्ट स्टुडन्ट अवॉर्ड' देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांनी केले. सूत्रसंचालन माहीन आदित्य सगर यांनी तर आभार प्रदर्शन अस्मिता भोसले यांनी केले. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

## पोदार प्रेप धाराशिव येथे उत्साहात शिवजयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ फेब्रुवारी -**
पोदार प्रेप धाराशिव येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शाळेच्या मैदानावर विशेष प्रार्थना सभेचे आयोजन करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात शिवजयंती साजरी केली. शिक्षिका प्राजक्ता कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी शिवरायांच्या पराक्रमाचे नाट्यरूपांतर सादर केले. या सादरीकरणाला पालक व शिक्षकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



पोदार प्रेपच्या मुख्याध्यापिका रेश्मा संकपाळ यांनी आपल्या मनोगतात शिवाजी महाराजांचे शौर्य, धैर्य आणि स्वराज्याची प्रेरणा याविषयी मार्गदर्शन केले.

त्यांनी विद्यार्थ्यांना शिवरायांच्या आदर्शांचा अंगीकार करून प्रामाणिक, शिस्तबद्ध व राष्ट्रप्रेमी नागरिक बनण्याचे आवाहन केले.

## शिवजयंती नाचून नाही तर वाचून; आढाळा शाळेचा उपक्रम चर्चेत

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१८ फेब्रुवारी -**
शिवजयंतीनिमित्त सर्वत्र उत्साहाचे वातावरण असताना कळंब तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आढाळा येथे शिवजयंतीच्या पूर्वसंध्येला अभिनव उपक्रमाने साजरी करण्यात आली. शिवजयंती नाचून नाही तर वाचून या संकल्पनेतून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण करण्याचा अभिनव उपक्रम राबविण्यात आला.



मुख्याध्यापक राजेंद्र बिक्कड यांच्या मार्गदर्शनाखाली सहशिक्षक महादेव खराटे, तुकाराम कराळे, शिवनंदा स्वामी, बलभीम राऊत तसेच स्वयंसेवक बापू हगारे यांच्या पुढाकारातून हा उपक्रम पार पडला.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज आणि राजमाता जिजाऊ यांच्या कार्यावर आधारित एकूण १११ पुस्तके (सुमारे साडेतीन हजार रुपये किमतीची) शिक्षकांच्या आर्थिक सहकार्यातून शाळेला भेट देण्यात आली.

उपक्रमाबद्दल गटशिक्षणाधिकारी धर्मराज काळमाते, शिक्षण विस्तार अधिकारी सुशील फुलारी, केंद्रप्रमुख सोमनाथ चंदनशिव तसेच शिक्षणप्रेमी नागरिक व पालकांनी समाधान व्यक्त करून शाळेचे अभिनंदन केले.



## हुतात्मा दिनानिमित्त मा. मंत्री मधुकरराव चव्हाणांकडून अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१८ फेब्रुवारी -**
नळदुर्ग येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात हुतात्मा दिनाचे औचित्य साधून हुतात्मा बाबुराव बोरगांवकर व हुतात्मा निलय्या स्वामी यांना अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी बालाघाट शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा माजी मंत्री मधुकरराव चव्हाण, संस्थेचे सचिव उल्हास बोरगांवकर, कार्याध्यक्ष रामचंद्र आलुरे, हुतात्म्यांचे नातू निलय्या स्वामी व रोहिणीताई बोरगांवकर यांनी हुतात्म्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी नगराध्यक्षासंह आदी मान्यवर उपस्थित होते.

## डिजिटल युगात मोबाईलचा वापर गुणवत्ता वाढीसाठीच व्हावा : सुजितसिंह ठाकूर



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१८ फेब्रुवारी -**
सध्याच्या डिजिटल युगात विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर केवळ गुणवत्ता वाढीसाठी करावा. नवीन एआय (ख) तंत्रज्ञान भविष्यात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावणार असून त्यासाठी सर्वसमावेशक प्रयत्न होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन सुजितसिंह ठाकूर यांनी केले.

ते श्रीकृष्ण बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ, परंडा संचलित कल्याणसागर माध्यमिक विद्यालय, परंडा येथे इयत्ता दहावीतील विद्यार्थ्यांसाठी आयोजित शुभेच्छा समारंभात बोलत होते. कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थितीत कल्याणसागर समूहाच्या सचिवा प्रज्ञा कुलकर्णी, समूहाचे मार्गदर्शक व भाजप धाराशिव जिल्हा सरचिटणीस विकास कुलकर्णी तसेच हेमा (भाभी) ठाकूर उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन, दीपप्रज्वलन व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. स्वयंशासन दिनानिमित्त विविध पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये मुख्याध्यापक श्रेयश कदम, शिक्षणाधिकारी (मा.) आक्सा खान, उपशिक्षणाधिकारी श्रावणी लवटे, उपमुख्याध्यापक वीर मिश्रा, गटशिक्षणाधिकारी जान्हवी कुलकर्णी, विस्तार अधिकारी आलफिया चाँद पठाण, केंद्रप्रमुख निकिता मदने, लिपीक प्राची जाधव तसेच विद्यार्थी व शिक्षक प्रतिनिधींचा समावेश होता. विद्यालयातील सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांचाही यावेळी गौरव करण्यात आला.

कार्यक्रमप्रसंगी विकास कुलकर्णी व हेमा ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक किरण गरड यांनी केले. सूत्रसंचालन अनुष्का माळी, सानिया नदाफ व समीक्षा भिसे यांनी केले तर आभार प्रदर्शन अनुष्का माळी हिने मानले. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

## हुतात्मा स्मारकाला गतवैभव प्राप्त करून देणार : धरणे



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१८ फेब्रुवारी -**
नळदुर्ग शहरातील हुतात्मा स्मारकाला गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी नगरपालिका कटिबद्ध असून नळदुर्गकरांना अभिमान वाटावा अशा प्रकारे स्मारकाचे सुशोभीकरण व विकास करण्यात येईल, असे प्रतिपादन बसवराज धरणे यांनी हुतात्मा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात केले.

सालाबादाप्रमाणे यंदाही दि.१८ फेब्रुवारी रोजी नळदुर्ग येथे हुतात्मा दिन साजरा करण्यात आला. बाबुराव बोरगावकर व निलय्या स्वामी यांच्या स्मरणार्थ शहरातील व्यापाऱ्यांनी दुकाने बंद ठेवून आदरांजली वाहिली.

निजाम राजवटीत रझाकारांच्या सशस्त्र हल्ल्यात दि.२२ फेब्रुवारी १९४८ रोजी नळदुर्गचे दोन सुपुत्र बाबुराव बोरगावकर व निलय्या स्वामी यांनी नळदुर्ग किल्ला प्रवेशद्वारावर प्राणार्पण केले. त्यांच्या स्मरणार्थ दरवर्षी हुतात्मा दिन साजरा केला जातो. दि.१५ फेब्रुवारी रोजी कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय प्रांगणातील हुतात्म्यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. तसेच चावडी चौकात व्यापारी मंडळाच्या वतीने कार्यक्रम घेऊन हुतात्म्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

मुख्य कार्यक्रम हुतात्मा स्मारकात पार पडला. नगराध्यक्ष बसवराज धरणे, मुख्याधिकारी रामकृष्ण जाधवर व नगरसेवकांच्या हस्ते हुतात्म्यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पचक्र अर्पण करण्यात आले. यावेळी जेष्ठ नागरिक शिवाजीराव वऱ्हाडे, तानाजी जाधव, मारुती खारवे, पांडुरंग पुदाले, सतीश पुदाले, किशोर नळदुर्गकर यांच्यासह आजी-माजी नगरसेवक, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## व्ही. पी. एज्युकेशनल कॅम्पसमध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त व्याख्यान

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ फेब्रुवारी -**
छत्रपती संभाजीनगर रोडवरील व्ही. पी. एज्युकेशनल कॅम्पस येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थापक अध्यक्ष डॉ. वेदप्रकाश पाटील व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.



यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. वेदप्रकाश पाटील यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराजांचा जीवनपट प्रचंड घडामोडींनी भरलेला आहे. अवघ्या सोळाव्या वर्षी सर्व जाती-धर्मातील लोकांना एकत्र करून त्यांनी स्वराज्याची स्थापना केली. सर्वधर्मसमभाव जपत आदर्श राज्यकारभार उभारला. लढायांमध्ये गनिमी काव्याचा प्रभावी वापर करून शत्रूला चकवा दिला. महिलांविषयी सन्मानपूर्वक दृष्टिकोन ठेवत अनेक अनिष्ट रूढी-परंपरा बंद केल्या.

शिवाजी महाराजांचा संघर्ष कोणत्याही धर्माविरोधात नसून वाईट प्रवृत्तीविरोधात होता, हे त्यांनी अधोरेखित केले.

स्वराज्यात कोणतीही व्यक्ती बेरोजगार किंवा उपाशी राहणार नाही, अशी लोककल्याणकारी व्यवस्था त्यांनी निर्माण केली होती. आजच्या युवकांनी त्यांच्या विचारांचा आदर्श घेऊन तो आचरणात आणावा, असे आवाहन डॉ. पाटील यांनी केले.

कार्यक्रमास आर.पी. फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गाझी शेख, एस.बी.एन.एम. फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरज ननवरे, एस. पी. पॉलिटेक्निकचे प्राचार्य अमरसिंह कवडे, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील, बी.एड. महाविद्यालयाचे प्राचार्य ऋषिकेश लोमटे, वेलनेस कॉलेज ऑफ फिजिओथेरपीच्या प्राचार्या डॉ. पूजा आचार्य, कृषी महाविद्यालयाचे व्यवस्थापक प्रा. हरी घाडगे, डेरी महाविद्यालयाचे व्यवस्थापक प्रा. बालाजी वाघमारे, आयटीआयचे व्यवस्थापक प्रा.डी.एम. घावटे, कॅम्पसचे लेखापाल योगेश मंडलिक तसेच सर्व महाविद्यालयांचे प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## समीर देसाई यांना उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१८ फेब्रुवारी -**
महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ - डिजिटल मीडिया, पुणे जिल्हाध्यक्ष समीर देसाई यांना नुकताच उत्कृष्ट पत्रकार हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते सांगली-मिरज येथील संजय भोकरे ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट येथे आयोजित सोहळ्यात देण्यात आला.



या कार्यक्रमास राजकीय विश्लेषक अशोक वानखेडे, ज्येष्ठ पत्रकार संजय भोकरे, मंदार फणसे तसेच संघाचे प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ भोकरे आदी उपस्थित होते. समीर देसाई यांच्या सातत्यपूर्ण, निर्भीड व समाजाभिमुख पत्रकारितेची दखल घेत हा पुरस्कार देण्यात आला असून त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

### उमरगा येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर, यांच्या न्यायालयात.

वाद प्रश्न नक्की करण्यासाठी समन्स (नियमकम ५. नियम १.५)

**नि.दि.दा.क. ८२४/२०२३ नसीमा वि. हारुण नि.क्र.२९**

**प्रति,**
**हारुण उर्फ तय्यबअली ईस्माईल शेख,**
**वय-५७ वर्ष रा. देसाई नगर, शांत कॉलनी, गेवराई हायस्कूल जवळ, सोलापूर ता. जि. सोलापूर**

ज्याअर्थी वादी **नसीमा हारुण उर्फ तय्यबली शेख वय ४७ वर्ष रा. मुन्शी प्लॉट उमरगा, ता. उमरगा जि. धाराशिव** यांनी सोबतच्या नकलेप्रमाणे यासाठी तुमच्या विरुध्द या न्यायालयात वाद दाखल केला आहे. त्याअर्थी हया वादासंबंधी तुम्हाला जे काही सांगावयाचे असेल ते सांगण्यासाठी **दिनांक १०/११/२०२५ रोजी दिवसा १०.३० वाजता** तुम्ही स्वतः किंवा ज्यास योग्यरित्या सुचना दिलेल्या आहेत व जो वादासबंधीच्या महत्वाच्या सर्व प्रश्नाची उत्तर देवू शकेल अशा वकिलामार्फत किंवा अशा सर्व प्रश्नांचे उत्तर देवू शकणारा एखादा इसम बरोबर असलेल्या वकिलामार्फत या न्यायालयात उपस्थित होण्यासाठी याद्वारे तुमच्यावर समन्स बजावण्यात येत आहे आणि याद्वारे तुम्हाला असा निर्देश देण्यांत येत आहे कि, त्या दिवशी तुम्ही तुमच्या बचावाचे लेखी निवेदन दाखल करावे. व त्याच दिवशी तुमचा बचाव किंवा उलट वाद (सेट ऑफ किंवा प्रतिवाद (काउंटर क्लेम) ज्या दस्त आधारलेला असेल असे तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेले सर्व दस्त ऐवज सादर करावे आणि जर तुम्ही तुमच्या बचावाच्या किंवा उलट वादाच्या (सेट ऑफ) किंवा प्रतिवादाच्या (काउंटर क्लेम पृष्ठयर्थ पुरावा म्हणून तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेल्या किंवा नसलेल्या इतर कोणत्याही दस्तऐवजावर विसंबून असाल तर अशा दस्तऐवजाचे एक सुची करुन ती सुची तुमच्या बचावाच्या लेखी निवेदनास जोडावे.

तुम्हास नोटीस देण्यांत येत आहे की, वर नमुद केलेल्या दिवशी उपस्थित राहण्यास कसूर केल्यास तुमच्या अनुपस्थितीत वादाची सुनावणी केली जावून त्याचा निर्णय केला जाईल. आणखी अशी नोटीस देण्यांत येत आहे की, वर नमुद केलेल्या तारखेस किंवा तत्पूर्वी बजावणीकरिता तुमचा पत्ता दाखल करण्यात तुम्ही कसूर केल्यास तुमचा बचाव रद्द केला जाण्यास पात्र ठरेल.

**आज दि.१५/१०/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.**

**स्वाक्षरित/-**
**(सी.एम. रणदिवे)**
**वरिष्ठ लिपीक**

**स्वाक्षरित/-**
**(अ.ज.सय्यद)**
**सहा. अधिक्षक**

**दिवाणी न्यायाधीश, व स्तर, उमरगा**

CMYK


# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## धाराशिव जिल्ह्यात पुन्हा गूढ आवाज!; नागरिकांत भितीचे वातावरण

**धाराशिव, दि.१८ फेब्रुवारी -**

धाराशिव, तुळजापूर, कळंब, ढोकी, तेर तसेच परिसरात आज बुधवारी सकाळी ठीक ८ वाजून ३ मिनिटांनी भूगर्भातून सलग तीन वेळा प्रचंड मोठा आवाज आल्याची घटना घडली. या अचानक झालेल्या आवाजामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून अनेकांनी घाबरून घराबाहेर धाव घेतली. काही नागरिकांनी हा भूकंप असल्याचा अंदाज व्यक्त केला आहे.



प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, सकाळच्या सुमारास अचानक मोठा स्फोटासारखा आवाज झाला आणि त्यानंतर काही क्षण जमीन हलल्याचा व कंपन जाणवल्याचा अनुभव काही नागरिकांनी सांगितला. हा आवाज नेहमीपेक्षा अधिक तीव्र आणि वेगळा असल्याचेही अनेकांनी नमूद केले. त्यामुळे परिसरात काही काळ संभ्रम आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. विशेष म्हणजे, यापूर्वीही सुमारे पंधरा दिवसांपूर्वी धाराशिव जिल्ह्यात अशाच प्रकारचा भूगर्भातून मोठा आवाज झाल्याची घटना घडली होती.



## संक्षिप्त वृत्त...



### अभिनेत्री प्राजक्ता गायकवाड यांनी घेतले आई तुळजाभवानी मातेचे दर्शन

**तुळजापूर, दि.१८ फेब्रुवारी -**

महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवानी मंदिर येथे सिने अभिनेत्री प्राजक्ता गायकवाड यांनी सहकुटुंब भेट देत विधिवत पूजाअर्चा केली. यावेळी त्यांनी आई तुळजाभवानी मातेस साकडे घालत, मी नवीन आयुष्याला सुरुवात केली आहे. तुझा आशीर्वाद सदैव पाठीशी राहू दे. सर्वांना सुखी-समाधानी ठेव, अशी प्रार्थना केली. तसेच पुढील महिन्यात महाराष्ट्रभर प्रदर्शित होणाऱ्या मराठी चित्रपट भिडे वाडा मध्ये त्या सावित्रीबाई फुले यांची भूमिका साकारणार असून, या चित्रपटाला प्रेक्षकांचे भरघोस प्रेम लाभावे व आपली भूमिका सर्वांपर्यंत पोहोचावी, अशीही प्रार्थना त्यांनी केली. यावेळी पती शंभूराज कुटवड, बंधू सौरभ गायकवाड, आई संगीता गायकवाड, पुजारी सचिन क्षीरसागर, रोहित पडवळ, आकाश मुंडे, अनिकेत माऊली असलेकर तसेच मंदिर संस्थानचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत आरळीच्या सानिका बंडगर यांचा सहभाग

**तुळजापूर, दि.१८ फेब्रुवारी -**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या वतीने घेण्यात आलेल्या 'डेक्स्टर इनोफेस्ट या राष्ट्रीयस्तरावरील स्पर्धेत सानिका कालिदास बंडगर यांचा उल्लेखनीय सहभाग नोंदवला. या स्पर्धेत सानिका कालीदास बंडगर यांनी पोस्टर प्रेझेंटेशन, पेपर प्रेझेंटेशन, प्रोग्रॅमिंग या विभागात सहभाग नोंदवून आपली गुणवत्ता सिद्ध केली. देशभरातून आलेल्या स्पर्धकांमध्ये त्यांनी आत्मविश्वासाने सादरीकरण करून उत्कृष्ट कामगिरी केली. या स्पर्धा सोलापूर विद्यापीठातील संगणक विज्ञान विभागाद्वारे घेण्यात आल्या. विजेत्या स्पर्धकांना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांच्या हस्ते सानिका बंडगर यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या यशामुळे महाविद्यालय व कुटुंबीयांचा अभिमान वाढला असून सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.





### उपासे यांना पीएच.डी. पदवी प्रदान

**तुळजापूर, दि.१८ फेब्रुवारी -**

तालुक्यातील जि.प. प्रशाला मुळज येथील प्राथमिक पदवीधर शिक्षिका सरीता उपासे यांना सोलापूर येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाकडून पीएच.डी. (विद्यावाचस्पती) पदवी प्रदान करण्यात आली आहे. उपासे यांनी वालचंद कला व वाणिज्य महाविद्यालय, सोलापूर येथील प्रा.डॉ. मनोहर जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली इंग्रजी विषयात मायथालॉजीकल अॅन्ड फेमिनिस्ट परस्पेक्टिव्हज ऑफ कविता काणेज नोवेल्स या विषयावर संशोधन प्रबंध विद्यापीठास सादर केला होता. त्यांच्या या शैक्षणिक यशाबद्दल सर्वस्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.



### छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर सामान्य ज्ञान चाचणी

**धाराशिव, दि.१८ फेब्रुवारी -**

हिंदुस्थानचे आराध्य दैवत श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्यकर्तृत्वाचा उजाळा शालेय विद्यार्थी विद्यार्थिनींना व्हावा या उद्देशाने धाराशिव शहरातील आर्य चाणक्य माध्यमिक विद्यालयात सामान्य ज्ञान चाचणी घेण्यात आली. यानिमित्ताने प्रशालेतील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींनी या सामान्य ज्ञान चाचणीत सहभागी होऊन श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन चरित्र तसेच त्यांच्या कार्यकर्तृत्वावर विचारलेल्या विविध प्रश्नांना आपल्या ज्ञान कौशल्यातून साकारले. या सामान्य ज्ञान चाचणी परीक्षेत प्रशालेतील इयत्ता पाचवी ते नववी मधील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. अशा प्रकारचा हा नावीन्यपूर्ण उपक्रम यावर्षी प्रशालेत पहिल्यांदाच आयोजित करण्यात आला होता.

### १.२० लाखांची कॉपर वायर चोरी

**धाराशिव, दि.१८ फेब्रुवारी -**

तालुक्यातील सुकटा शिवारात रामगंगा मध्यम प्रकल्पाच्या परिसरातून अज्ञात चोरट्यांनी १ लाख २० हजार रुपये किमतीची कॉपर वायर चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. फिर्यादी त्रिंबक शेषेराव गलांडे (वय ६५, रा. सुकटा, ता. भुम, जि. धाराशिव) तसेच अन्य १३ शेतकऱ्यांच्या शेतगट क्र. १८४ मधील सुमारे ४,८०० फूट कॉपर वायर अज्ञात व्यक्तीने लंपास केली.

# धाराशिवात होणार ६ मजली भव्य जिल्हा न्यायालय साकारणार

**८९ कोटींची तरतुद... १६ कोर्ट... प्रशस्त सभागृह : आ. राणाजगजीतसिंह पाटील यांची माहिती...**



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ फेब्रुवारी -**

धाराशिव जिल्ह्याच्या वाढत्या विस्ताराचा आणि नागरिकांच्या सोयी सुविधांचा विचार करून, शहरात अत्याधुनिक व नवीन सहा मजली जिल्हा व सत्र न्यायालय इमारत उभारली जाणार आहे. या भव्य प्रकल्पासाठी ८९ कोटी ७६ लाख रुपयांच्या खर्चाला उच्च स्तरीय समितीची मंजुरी मिळाली आहे. तुळजापूर येथील वातानुकूलित न्यायालय इमारती पाठोपाठ आत ही इमारतही जिल्ह्याची ठळक ओळख ठरणार असल्याचा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या देखरेखीखाली होणारी ही इमारत पूर्णपणे 'हायटेक' असणार आहे. 'तळमजला अधिक ६ मजले' असे सुसज्ज न्यायभवन उभारण्यात येणार आहे. यामध्ये एकूण १६ कोर्ट हॉल असतील, ज्यात विशेष पोक्सो कोर्ट, लोक न्यायालय आणि हाय सिक्युरिटी कोर्टाचाही समावेश असणार आहे. पक्षकार आणि वकिलांच्या सोयीसाठी ३ आणि न्यायाधीशांसाठी स्वतंत्र ३ अशा एकूण ६ लिफ्ट या इमारतीमध्ये बसवण्यात येणार आहेत. सर्वात महत्वाची बाब म्हणजे ही इमारत 'हरित संकल्पनेवर' आधारित असेल.

यात सौर ऊर्जा आणि रेन वॉटर हार्वेस्टिंगची विशेष तरतूद करण्यात आली आहे. संपूर्ण परिसर सीसीटीव्ही कॅमेरा निगराणीखाली राहणार असून सक्षम आणि आधुनिक आग प्रतिबंधक यंत्रणाही याठिकाणी बसवली जाणार आहे. प्रशस्त अंतर्गत रस्ते, संरक्षक भिंत, सुसज्ज फर्निचर आणि पिण्याच्या पाण्यासाठी स्वतंत्र बोअरवेलची व्यवस्थाही इमारत आराखड्यात करण्यात आली आहे.

सध्याची जुनी इमारत स्ट्रक्चरल ऑडिटमध्ये कमकुवत झाली असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे नवीन इमारतीचे बांधकाम पूर्ण होताच, नियमानुसार जुन्या इमारतीचे पाडकाम केले जाईल, जेणेकरून सुरक्षिततेचा कोणताही प्रश्न राहणार नसल्याचेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे. धाराशिव शहरात होऊ घातलेल्या या भव्य न्यायालय इमारतीसाठी मोठ्या प्रमाणात निधी मंजूर केल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा ताई पवार, पालकमंत्री प्रतापराव सरनाईक यांचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी जिल्हावासियांच्या वतीने आभार मानले आहेत.

### इमारत शहराचे 'लँडमार्क' ठरणार...



मुंबई उच्च न्यायालयाने निर्धारित केलेल्या निकषानुसार व मानांकनानुसार ही इमारत साकारली जाणार आहे. मुंबई येथील मुख्य वास्तुशास्त्रज्ञांनी या इमारतीच्या नकाशांना आणि आराखड्यांना मंजुरीही दिली आहे. एकूण १५ हजार ८२३ चौरस मीटर क्षेत्रफळात ही देखणी आणि भव्य वास्तू उभारली जाणार आहे. ही इमारत शहराचे एक महत्त्वाचे 'लँडमार्क' ठरेल, असा विश्वास असून न्यायालयाच्या या नवीन इमारतीमुळे वकील बांधव आणि ग्रामीण भागातून येणाऱ्या हजारो पक्षकारांना हक्काची आणि सोयीची जागा उपलब्ध होणार आहे. कुलस्वामिनी तुळजाभवानी मातेच्या तुळजापुर नगरीत संपूर्ण वातानुकूलित न्यायालय इमारतीचे नुकतेच लोकार्पण झाले आहे. आता धाराशिव शहरातही एक भव्य आणि आकर्षक वास्तू लवकरच पहायला मिळणार असल्याचे आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.

## पोलादपूर येथे क्षत्रिय मराठा कदम परिवाराचे राज्यस्तरीय कुलसंमेलन





मागील ९ वर्षापासून सबंध देशभरात विविध राज्यातील कदम बंधूंना एकत्र आणून त्यांचा एकमेकांचा परिचय व्हावा, वैभवशाली इतिहासाची ओळख करून देण्यासाठी तसेच आपला अप्रकाशित इतिहास सर्वांसमोर यावा तसेच कदम बंधू आणि भगिनींनी मिळवलेल्या विविध क्षेत्रातील उत्तुंग यशाबद्दल कौटुंबिक कौतुकासह विखुरलेले कदम घराणे एकत्र यावे यासाठी कदम घराण्यांचे वार्षिक कुलसंम्मेलन आयोजन करण्याचा हेतू आहे.

**- अमरराजे कदम,** प्रदेशाध्यक्ष

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ फेब्रुवारी -**

क्षत्रिय मराठा कदम परिवार, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने ८वे राज्यस्तरीय कुलसंमेलन रायगड जिल्ह्यातील पोलादपूर तालुक्यातील वडघर येथे दि. २१ व २२ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आले आहे.

या संमेलनासाठी धाराशिव जिल्ह्यातील समस्त कदम बंधू-भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन परिवाराचे प्रदेशाध्यक्ष अमरराजे कदम यांनी केले आहे. राज्यस्तरीय कुलसंमेलनाचे उद्घाटन माजी मंत्री रामदास कदम यांच्या शुभहस्ते होत आहे.

याप्रसंगी गृहराज्यमंत्री योगेश कदम, माजी आमदार संजय कदम, आमदार राम कदम, माजी आमदार रमेश कदम, अपर आयुक्त आदिवासी विभाग गोपीचंद कदम, तहसीलदार उद्धव कदम यांची उपस्थिती आहे.

कदम घराण्याचा गौरवशाली इतिहास जतन करणे आणि विखुरलेल्या कदम परिवाराला एकत्र आणणे, या उद्देशाने राज्यस्तरीय कुलसंमेलनांची परंपरा सुरू करण्यात आली. या परंपरेची सुरुवात कुलदैवत श्री तुळजाभवानी यांच्या पवित्र स्थान असलेल्या तुळजापूर येथून झाली.

## मलकापूर येथे शालेय व्यवस्थापन समितीची निवड

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.१८ फेब्रुवारी -**

कळंब तालुक्यातील मलकापूर येथील जिल्हा परिषद शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीची निवड प्रक्रिया उत्साहात पार पडली. अध्यक्षपदी सुधीर लोमटे तर उपाध्यक्षपदी समाधान मते यांची एकमताने निवड करण्यात आली.

समितीच्या सदस्यपदी सैलानी शेख, अश्विनी चव्हान, प्रमोद लोमटे, सुधीर पायाळे व वैशाली पायाळे यांची निवड झाली. नवीन समिती शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी, विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी तसेच शैक्षणिक सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी सकारात्मक कार्य करेल, असा विश्वास ग्रामस्थ व पालकांनी व्यक्त केला.

अध्यक्ष सुधीर लोमटे यांनी शाळेतील भौतिक सुविधा व शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्नशील राहण्याची ग्वाही दिली.

यावेळी मुख्याध्यापक भंडारे बळीराम, शिक्षिका गाडे नंदा, पालक व ग्रामस्थ उपस्थित होते. नव्या पदाधिकाऱ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

## रुईभर येथे श्रीदत्त मंदिर संस्थानमध्ये भव्य कलशारोहण सोहळा





**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ फेब्रुवारी -**

तालुक्यातील रुईभर दत्त नगर येथील श्रीदत्त मंदिर संस्थानमध्ये भव्य आणि दिव्य अशा कलशारोहण सोहळ्याचे आयोजन शुक्रवार, दि.२० फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता करण्यात आले आहे. शके १९४७, विश्वावसु नाम संवत्सर, उत्तरायण, फाल्गुन शुक्ल तृतीया या शुभमुहूर्तावर हा ऐतिहासिक सोहळा पार पडणार असून संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

या सोहळ्याचे प्रमुख आकर्षण म्हणजे प.प. जगद्गुरु श्री शंकराचार्य श्री विद्यानृसिंहभारती स्वामीजी (करवीर पीठ) यांच्या शुभ हस्ते कलशारोहण होणार आहे. तसेच प.पू. श्रीदत्त महाराज रुईकर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. संतांच्या पावन सान्निध्यात हा सोहळा अधिकच मंगलमय होणार आहे.

*** भागवत सप्ताहाची ग्रंथदिंडीने मिरवणूकीने होणार आज सांगता...**
*** हेलिकॉप्टरद्वारे होणार पुष्पवृष्टी...**

कलशारोहणाच्या पूर्वसंध्येला १३ ते १९ फेब्रुवारी या कालावधीत श्रीमद्भागवत सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. दररोज सकाळी ७ ते १२ या वेळेत विविध याग, होम व धार्मिक विधी पार पडतील. दुपारी २.३० ते ६ या वेळेत भागवत कथा आणि प्रवचनांचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहात परिसरातील तसेच बाहेरील हजारो भाविक सहभागी होण्याची अपेक्षा आहे.

गुरुवार, दि.१९ फेब्रुवारी रोजी भागवत सप्ताहाची सांगता भव्य ग्रंथदिंडी आणि मिरवणुकीने होणार आहे. सकाळी ९ वाजता निघणाऱ्या या मिरवणुकीदरम्यान हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी करण्यात येणार असून हा सोहळा आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरणार आहे. पारंपरिक वाद्ये, भगव्या पताका आणि हरिनामाच्या गजरात संपूर्ण परिसर दुमदुमणार आहे.

शुक्रवार, दि.२० फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता मंदिराच्या कळसावर विधीवत पूजाअर्चा करून कलशारोहण करण्यात येईल. संतांच्या आशीर्वादानंतर उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे.

कार्यक्रमाची सांगता हत्तीवरून साखर वाटप करून करण्यात येणार आहे, अशी माहिती संस्थानच्या वतीने देण्यात आली.

या ऐतिहासिक आणि धार्मिक सोहळ्यासाठी परिसरात मोठ्या प्रमाणावर तयारी सुरू असून भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या मंगल प्रसंगाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीदत्त मंदिर संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

### नळदुर्गमध्ये घरफोडी; सुमारे २.९८ लाखांचा ऐवज लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ फेब्रुवारी -**

नळदुर्ग पोलीस ठाणे हद्दीत घरफोडीची घटना उघडकीस आली असून अज्ञात चोरट्याने दोन घरांतून एकूण २ लाख ९८ हजार २५० रुपयांचा ऐवज लंपास केला आहे.

फिर्यादी ईश्वर अशोक जाधव (वय ४४, रा. धर्मवीर संभाजीनगर जळकोट, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) व मैनोद्दीन बाबुलाल बागवान यांच्या राहत्या घरांचे दरवाज्याचे कडी-कोंड तोडून अज्ञात व्यक्तीने दि. ८ फेब्रुवारी घरात प्रवेश केला. चोरट्यांनी घरातील कपाटातून रोख रक्कम १ लाख ७८ हजार रुपये, मोबाईल फोन तसेच मैनोद्दीन बागवान यांच्या घरातील ५० हजार रुपये रोख, ३४ ग्रॅम सोन्याचे दागिने व ११ तोळे चांदीचे दागिने असा एकूण २,९८,२५० रुपयांचा ऐवज चोरून नेला.

## कळंब तालुक्यात ५० किलो अफू जप्त



### तिघांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ फेब्रुवारी -**

जिल्ह्यातील अवैध अफू लागवडीविरोधात पोलिसांनी मोठ्या प्रमाणात मोहीम सुरू केली असून दररोज विविध तालुक्यांत धाडी टाकून लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त केला जात आहे.

कळंब तालुक्यातील शिराढोण पोलीस ठाणे हद्दीतील लोहटा पश्चिम शिवारात सुरू असलेल्या बेकायदेशीर अफू शेतीचा पोलिसांनी पर्दाफाश करत तब्बल ५० किलो ११ ग्रॅम अफू जप्त केली. या मुद्देमालाची अंदाजे किंमत ७ लाख ५१ हजार ६५० रुपये इतकी आहे.

दि.१७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास गट क्रमांक १७५, २३६ व २२७ येथील शेतांवर छापा टाकण्यात आला. अधिकृत परवानगी न घेता आर्थिक फायद्यासाठी प्रतिबंधित अफू पिकाची लागवड व जोपासना केल्याचे उघड झाले. कारवाईदरम्यान अफूची बोंडे, फुले व पाने असा एकूण मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी शिराढोण पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३३/२०२६ अन्वये कलम ८(सी), १८, एनडीपीएस अॅक्ट १९८५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अशोक ज्ञानोबा अडसूळ (वय ४६), नरसिंग अच्युत अडसूळ (वय ५५) व निलेश शिवाजी पवार (वय ३४, सर्व रा. लोहटा पश्चिम, ता. कळंब) यांना १८ फेब्रुवारी रोजी पहाटे अटक करण्यात आली.

## अखेर धाराशिवचे पोस्ट मुख्यालय पुन्हा धाराशिवात

### खा. ओम राजेनिंबाळकर यांच्या पाठपुराव्याला यश...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ फेब्रुवारी -**

जिल्ह्याच्या अस्मितेचा आणि प्रशासकीय हक्काचा महत्त्वपूर्ण निर्णय अखेर प्रत्यक्षात आला आहे. सन २०१७ मध्ये लातूर येथे स्थलांतरित करण्यात आलेले धाराशिवचे पोस्ट मुख्यालय पुन्हा अधिकृतपणे धाराशिवमध्ये परत आले आहे.

खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी केंद्र सरकार व टपाल विभागाकडे सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे हा निर्णय शक्य झाले आहे.

२०१७ पासून लातूरमधून सुरू असलेला धाराशिव जिल्ह्याचा पोस्ट कारभार आता स्वतंत्रपणे धाराशिवमधूनच चालणार आहे. विशेष म्हणजे लातूर जिल्ह्यासाठीही स्वतंत्र पोस्ट विभाग व मुख्यालयाला मंजुरी मिळाली असून, दोन्ही जिल्ह्यांचे विभाग ३१ जानेवारी २०२६ पासून स्वतंत्ररित्या कार्यान्वित झाले आहेत. मुख्यालय लातूरला हलवल्यानंतर जिल्ह्यातील नागरिक व कर्मचाऱ्यांना विविध प्रशासकीय अडचणींना सामोरे जावे लागत होते. कामकाजासाठी लातूरला जावे लागणे, निर्णय प्रक्रियेत विलंब आणि स्थानिक समन्वयाचा अभाव या समस्या वारंवार पुढे येत होत्या. या पार्श्वभूमीवर खासदार निंबाळकर यांनी संसदेत तसेच संबंधित मंत्रालयाकडे प्रशासकीय सुलभतेची गरज आणि जिल्ह्याचा हक्क याबाबत ठोस भूमिका मांडली होती.



### कामकाजाला येणार वेग...

या निर्णयामुळे टपाल सेवांतील कामकाज अधिक वेगवान होणार, नागरिकांची कामे स्थानिक पातळीवरच पूर्ण होणार, कर्मचारी व प्रशासनातील समन्वय सुधारेल, दोन्ही जिल्ह्यांच्या विकासाला चालना मिळेल, प्रशासकीय विकेंद्रीकरणामुळे सामान्य माणसाची कामे आता अधिक सोयीस्कर होतील.

जिल्ह्याचा हक्क जिल्ह्यातच राहिला पाहिजे या भूमिकेवर ते ठाम राहिल्याने अखेर केंद्र सरकारने स्वतंत्र मुख्यालयाचा आदेश जारी केला.